
# साहित्य

फेब्रुवारी–मार्च–एप्रिल २०२२



९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष भारत सासणे.

**अभिनंदन**

# साहित्य

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक

स्थापना : जानेवारी १९४७

---

**फेब्रुवारी-मार्च-एप्रिल २०२२**

संपादक

**नारायण लाळे**

सहसंपादक

रेखा नार्वेकर

प्रकाशक

उज्ज्वला मेहेंदळे

मुखपृष्ठ / आतील चित्र / मुद्रितशोधन : सौजन्य - ग्रंथाली

अक्षरजुळणी : ग्रंथाली छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई-४०००३१

■ मूल्य तीस रुपये. वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. २००/-
द्वैवार्षिक वर्गणी रु. ३००/-

■ धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावे असावा.

■ NEFT S/B A/C No. 002200100046717
IFSC : SRCB0000002
Bank Name - The Saraswat Co-op. Bank, Girgaum

**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४. दूरध्वनी : २३८७६१५८, २३८५६३०३
इमेल : sahityasangha@gmail.com & sahityasangh@mtnl.net.in
वेबसाइट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** १०४, सीतामाई, अयोध्या नगरी, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१ ● (मो. ९९८७९२४१९९)

या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

# साहित्य : फेब्रुवारी, मार्च, एप्रिल २०२२

## अनुक्रम


■ संपादकीय / २

■ लेख – भारत सासणे : माणूसपणाच्या वाटेवर लेखकाचा शोध / ३
डॉ. पृथ्वीराज तौर

■ लेख – लता मंगेशकर... एक शाश्वत स्वर... / १०
डॉ. मृदुला दाढे जोशी

■ लेख – संतसाहित्यातील सर्जन-प्रेरणा / १५
रेखा रमेश नार्वेकर

■ लेख – शब्दांच्या मरणाची कारणमीमांसा / २१
डॉ. केशव सखाराम देशमुख

■ ललितलेख – पावसाळी पहाटवाट / २६
नीती मेहेंदळे

■ कथा – बरसन लागी बदरिया / ३२
चित्रा वाघ

■ लेख – राम गणेशांच्या नाटकातील शब्दप्रभुत्व आणि भाषावैभव / ३७
अरविंद पिळगांवकर

■ **कविता –** संगीता अरबुने, विजय जोशी, मोहन कुंभार, कीर्ती पाटसकर, विलास गावडे, संजय शिंदे, सुजाता पाटील / ४७ ते ५०

■ पुस्तक परीक्षण – राजीव जोशी / ५१

■ अभिप्राय – डॉ. गणेश देवी, प्रा. स्मिता पाटील, मोनिका गजेंद्रगडकर / ६१

■ पुरस्कार, अभिनंदन, नवे काही / ६३

■ कार्यवृत्तान्त – उज्ज्वला मेहेंदळे / ६६

■ साभार पोच / ६९

■ श्रद्धांजली / ७२

# संपादकीय

जानेवारी १९४७ साली, मुंबई मराठी साहित्य संघाने वा.रा. ढवळे यांच्या संपादनाखाली 'साहित्य' द्वैमासिक सुरू केले. जोपर्यंत एखादे मासिक चांगली कामगिरी करीत आहे तोपर्यंतच जगण्याचा त्या मासिकाला हक्क आहे. ज्या क्षणाला त्या मासिकाचा वाङ्मयीन दर्जा बिघडतो त्याच्या दुसऱ्या क्षणापासून त्या मासिकाला जगण्याचा हक्क नाही, असं वा.रा. ढवळे यांनी 'साहित्य'च्या पहिल्या अंकात संपादकीय मध्ये म्हटले आहे. ७५ वर्षांपूर्वी वा.रा. ढवळे यांनी दिलेला इशारा 'साहित्य'ने आजही लक्षात ठेवला आहे व त्यानुसार 'साहित्य'चा वाङ्मयीन दर्जा सांभाळला आहे.

जागतिक स्तरापासून ते थेट आपल्या घरापर्यंत पसरलेले मृत्यूचे थैमान, जागोजाग दबा धरून बसलेली असुरक्षितता, बेधडक वावरणारी दहशत, प्रत्येक दिशेला पसरलेली संभ्रमितावस्था, साहित्यक्षेत्रासह प्रत्येक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या टोळ्या आणि त्यांचे टोळीयुद्ध अशा भयग्रस्त वातावरणातही एक लेखक म्हणून, एक संपादक म्हणून कुठल्याही कलाक्षेत्रातील दर्जा सांभाळणं म्हणजे नक्की काय, याचे भान ठेवणे मला महत्त्वाचे वाटते. टोळ्यांऐवजी एकमेकातील नातेसंबंध, सुसंवाद दृढ होण्यासाठी सभानता निर्माण होण्याची गरज आहे, असे मला वाटते. जसे कवयित्री नीरजा, एका अध्यक्षीय भाषणात 'स्व'कडून 'सार्वत्रिका'कडे जाण्याचा मार्ग सांगते. त्याच वेळी लुईस ग्लुक या नोबेल पुरस्कार प्राप्त (२०२०) कवयित्रीचा 'स्व अस्तित्वाला वैश्विक ओळख मिळवून देणारी कवयित्री' म्हणून उल्लेख होतो आणि ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष भारत सासणे एका मुलाखतीत म्हणतात, 'सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून अशा माणसाचा शोध माझ्या लेखनातून मी घेत असतो.' अशीच सभानता सर्वत्र पसरली तर, कुठल्याही संकटाला नामोहरम करणे, समृद्ध जगणे आणि प्रत्येक कलाक्षेत्रातील दर्जा सांभाळणे सहज शक्य होईल.

माझ्या व सहसंपादक म्हणून श्रीमती रेखा नार्वेकर यांच्या संपादकीय जबाबदारीतून प्रकाशित होणारा 'साहित्य' फेब्रुवारी– मार्च– एप्रिल २०२२ चा हा पहिलाच अंक आहे. तुम्ही त्याचे स्वागत कराल, अशी आशा बाळगतो. प्रथितयश आणि नवोदित असा साहित्यिक भेदाभेद न करता दर्जेदार, सृजनशील साहित्याला प्राधान्य देण्याचा आमचा प्रयत्न असेल. त्याचेच प्रतिबिंब 'साहित्य'च्या या अंकात वाचकांना दिसेल.

वाचक, वर्गणीदार, अभ्यासक यांच्या प्रतिसादाची तसेच सुसंवादाची अपेक्षा ठेवतो. धन्यवाद.

**– नारायण लाळे**

# भारत सासणे :
# माणूसपणाच्या वाटेवर लेखकाचा शोध

डॉ. पृथ्वीराज तौर

पंचवीस वर्षांपूर्वीची घटना. मी त्यावेळी पदवी प्रथम वर्षाचा विद्यार्थी होतो. अभ्यासक्रमात भारत सासणे यांची 'सये तुझे डोळे' ही कथा अभ्यासाला होती. त्याच काळात अरविंद जगताप आणि इतर मित्रांनी 'दिंडी' या नावाचा एक उपक्रम सुरू केलेला होता. गुरुवारी संध्याकाळी महाविद्यालयाच्या सभागृहात एखादा नाटकाचा तुकडा, एखादा गायनाचा अंश, एखादा नृत्याविष्कार विद्यार्थी सादर करत असत. या उपक्रमात अरविंद जगतापने नाट्यरूपांतर केलेली 'सये तुझे डोळे' ही कथा सादर करण्यात आली. इतक्या वर्षांनीही या कथेतील पात्रं भुरळ घालतात. खिडकीशी असणारा जयराम, झिम झिम संधिप्रकाशापलीकडे चोरट्यासारखी उभी असणारी कमल, मागच्या दारी पायऱ्यावर बसून गप्पा मारणाऱ्या बहिणी, मृदंगाचा आवाज, अक्का अशा कितीतरी गोष्टी लख्ख स्मरणात आहेत. या गोष्टी स्मरणात राहिल्या कारण मी पाहिलेला 'सये तुझे डोळे' हा एकांक. भारत सासणे यांचं नाव कळलं आणि लक्षात राहिलं, तो हा प्रसंग. एखादा लेखक विशेषतः कथालेखक त्याच्या पात्रांनी समजून द्यावा असं काही या नाट्यानुभवामुळे घडलं.

देवगिरी महाविद्यालयात थोडं पुढे शिकत असणारा उदय महाजन हा मित्र. त्याच्या वडिलांचं टाईपरायटिंगचं दुकान होतं. उदयलाही उत्तम टाईपरायटर बडवता येत असे. एके दिवशी कळलं की दररोज संध्याकाळी उदय हा भारत सासणे यांच्या घरी जातो. सासणेसर येतात आणि कथा सांगायला लागतात. ते तास-दीड तास कथा सांगत राहतात, आणि उदय ती कथा टाइपरायटरवर टाईप करत जातो. परतीची वेळ होताच सासणेसर आपलं कथा सांगणं थांबवतात, दुसऱ्या दिवशी पुन्हा सहा वाजता ज्या ठिकाणी कथा थांबलेली आहे, त्या ठिकाणाहून पुढे सुरू होते. कथालेखक आपली कथा कशी लिहितो, हे समजून घेणं मोठं गमतीचं वाटलं होतं. सासणे यांची एक-दोन पुस्तकं तोपर्यंत माझ्या वाचनात आली होती आणि अशा दीर्घ पल्ल्याच्या कथा लिहिणारा एखादा लेखक, काल ज्या ठिकाणी थांबला होता त्या ठिकाणाहून

नेमकं सूत्र पकडून पुन्हा कसा नेमकेपणानं व्यक्त होत असेल, याबद्दल खूपच उत्सुकता लागून राहिली होती.

एम.ए.च्या दिवसांत मराठीतील इतर कथाकार अधिक चांगल्या पद्धतीनं कळत गेले, त्याचवेळी भारत सासणे यांचीही कथा नव्या नव्या आशयासह मला उलगडत गेली. आवडणाऱ्या कथा लेखकांच्या यादीमध्ये भारत सासणे हे नाव त्यावेळी कायमचं येऊन बसलं.

कथाकार म्हणून कथांमधून भेटणारे भारत सासणे प्रत्यक्षात तसे अबोल आहेत. फारसे कुणात न मिसळणारे. बोललेच तर एखादं वाक्य खूप वेळानंतर उच्चारणारे. माझं पीएच.डी.चं संशोधन सासणे यांच्या उपलब्ध लेखनावर करत होतो. त्या संशोधनाच्या काळातही त्यांच्याशी भेटण्याचे व बोलण्याचे प्रसंग आले नाहीत. नंतरचा एक प्रसंग, त्यावेळी भारत सासणे हे बीड येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. ललित अधाने हा मित्र बीडच्या बलभीम महाविद्यालयात त्यावेळी मराठीचा प्राध्यापक म्हणून कार्यरत होता. एनएसएसची जबाबदारीही त्याच्याकडे होती. एका शिबिरासाठी त्यानं गावातील एका कार्यकर्त्याला बोलावलं होतं. कार्यकर्ता आणि त्याची पत्नी एड्सग्रस्त मुलांसाठी काम करत असत. त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीनं ललित भारावून गेला. कार्यकर्त्याला येणाऱ्या अडचणी नंतरच्या चर्चेत त्याला कळून आल्या. ललितला वाटलं की या अडचणी सोडवण्यासाठी आपण पाऊल उचललं पाहिजे. म्हणून एका संध्याकाळी ललित आणि मी जिल्हाधिकारी महोदयांच्या बंगल्यावर गेलो. बाहेरच्या छानशा हिरवळीवर आम्ही खुर्च्या मांडून बसलो होतो. ललितनं त्याला आलेला अनुभव भारत सासणे यांना सांगितला आणि विनंती केली की हा जो कार्यकर्ता आहे तो अत्यंत निष्ठेनं काम करत आहे. एड्स झालेल्या मुलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन फारसा चांगला नाही, सकारात्मक नाही आणि त्यामुळे त्यांना पदोपदी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. किरायानं घरदेखील मिळत नाही. किंवा ज्या घरामध्ये ही मंडळी राहतात, त्या गल्लीतील इतर माणसं त्यांना तिथून पळून लावण्यासाठी नेहमीच टपलेली असतात. या कार्यकर्त्याला थोडी जमीन हवी आहे आणि त्यांनी जमीन मागणारा एक अर्ज दोन-तीन वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दिलेला आहे. ललित अधाने यानं गळ घातली की सासणेसरांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालावं आणि संबंधित कार्यकर्त्याला जागा मिळवून द्यावी. जेणेकरून एड्सग्रस्त मुलांसाठी काम करणारी संस्था आणि एड्सग्रस्त मुलं यांना आगामी काळात एक बरं भविष्य असू शकेल. भारत सासणे यांनी त्याचक्षणी काही फोन केले. जिल्हाधिकारी म्हणून दुसऱ्या दिवशी संध्याकाळी चार वाजता संबंधित जागेवर सगळ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसह भेट दिली. पुढे महिनाभर पाठपुरावा करून भारत सासणे

यांनी बीडच्या डोंगरावरची जागा त्या संस्थेला मिळवून दिली. आज तुम्ही कधी बीडला गेलात तर बिंदुसरा नदीच्या काठी असणाऱ्या एका टेकडीवर 'आनंदवन' नावाची ही जागा तुम्हाला दिसेल. ज्या ठिकाणी असणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावर फुललेले हसू तुम्हाला पाहता येईल.

भारत सासणे यांच्या संदर्भात असणारे हे दोन-तीन प्रसंग खूप वैयक्तिक आहेत, तरीही मला सांगावेसे वाटतात. कारण इतरांना माहिती नसणारा एक लेखक'माणूस' या घटनांतून सातत्यानं व्यक्त होताना दिसतो. एक लेखक जो महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आवडतो, एक लेखक जो त्याच्या प्रकाशाच्या, पावसाच्या, धुक्याच्या, सर्पाच्या संदर्भामुळे लक्षात राहतो, एक लेखक जो लेखक म्हणून समाजाचे प्रश्न समजून घेतो आणि अधिकारी होऊन त्या प्रश्नांची सोडवणूक करतो.

एका लेखिकेच्या आत्मचरित्रात मी एक वाक्य वाचलं होतं, 'एक चांगला माणूस हा एक चांगला लेखक असू शकतो, पण एक चांगला लेखक हा एक चांगला माणूस असू शकेल असं नाही.' लेखिकेनं केलेल्या विधानाच्या पार्श्वभूमीवर भारत सासणे यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहू लागतो, त्यावेळी मला लेखक म्हणून आणि माणूस म्हणून अशा दोन्ही पातळ्यांवर असणारे भारत सासणे यांचं श्रेष्ठत्व जाणवत राहतं.

भारत सासणे हे अफलातून प्रतिभा असणारे लेखक आहेत. लघुकथा, दीर्घकथा, बालसाहित्य, नाटक, कादंबरी, चिंतन, भाषांतर अशा निरनिराळ्या साहित्यप्रकारांमध्ये सासणे यांनी अत्यंत महत्त्वाचं लेखन केलेलं आहे. सासणे यांच्या नावावर चार नाट्यसंहिता आहेत, पण त्यांच्याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही इतक्या त्या महत्त्वाच्या आहेत. राज्यनाट्य स्पर्धांमध्ये या संहितांना लेखनाची पारितोषिकंही मिळालेली आहेत. नाट्यलेखनाच्या इतिहासात सासणे यांची स्थाननिश्चिती कोणी केलेली नसली तरी, कोणी या पद्धतीचे प्रयत्न करू लागेल त्यावेळी नाट्यलेखक म्हणून सासणे यांचं स्थान अव्वल दर्जाचं आहे असं नोंदवावं लागेल.

लेखक म्हणून सासणे यांचे जाणवणारं एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, रचनाबंधांची त्यांना असणारी सूक्ष्म जाणीव. आपल्याला काय लिहायचं आहे, आणि कुठल्या पद्धतीनं अभिव्यक्त व्हायचं आहे, यासंदर्भात सासणे हे अत्यंत प्रयोगशील आणि काटेकोर आहेत. सासणे यांनी आठ लघुकथासंग्रह लिहिलेले आहेत. या लघुकथासंग्रहातील कथांमध्ये कुठेही पुनरावृत्ती आढळत नाही. किंवा तेवढ्याच संख्येनं त्यांनी नंतर दीर्घकथासंग्रह लिहिले, एखाद्या लघुकथेची पुढील संग्रहामध्ये दीर्घकथा झाली आहे अथवा एखाद्या दीर्घकथेची कादंबरी झाली आहे, असं सासणे यांच्या बाबतीत आढळत नाही. अनुभवाचं स्वरूप कसे आहे, हे लक्षात घेऊन त्या अनुभवाची कथा, दीर्घकथा, लघुकादंबरी, कादंबरी वा नाटक यापैकी कोणत्या

वाङ्मयप्रकारांना हात घालायचा आहे हे सासणे अगोदरच ठरवतात आणि नंतर त्याची अंमलबजावणी होते असं आपल्याला लक्षात येईल.

दीर्घकथा या एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे याची जाणीव ज्या मराठी लेखकांनी १९८० च्या दशकात रुजवण्याचा प्रयत्न केला त्यापैकी भारत सासणे हे एक आहेत. लघुकथा आणि दीर्घकथा हे कथेच्या व्यापक अवकाशात दोन स्वतंत्र बिंदू आहेत आणि त्यांचा स्वतंत्रपणेच विचार केला जावा असा सुरुवातीपासून त्यांचा आग्रह राहिलेला दिसतो. १९८२साली 'कॅम्प आणि बाबीचे दुःख' हा त्यांचा पहिला दीर्घकथासंग्रह प्रकाशित झाला. नंतरच्या काळात 'चिरदाह', 'अस्वस्थ विस्तीर्ण रात्र', 'अनर्थ', 'रात्र... क्षितिजावरची रात्र', 'अदृष्ट', 'ऐसा दुस्तर संसार', 'त्वचा' हे दीर्घकथासंग्रह प्रकाशित झाले. 'दीर्घकथेकडे दीर्घकथा म्हणून पाहिलं पाहिजे' अशी भूमिका त्यांनी 'चीरदाह'च्या निमित्तानं १९८६ मध्ये सर्वप्रथम मांडली. दीर्घकथा हा फॉर्म म्हणून कथेच्या प्रांगणात असला तरी तिचा आस्वाद वेगळ्या पद्धतीनं लघुकथेपासून थोडा दूर जाऊन घेतला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी 'अस्वस्थ विस्तीर्ण रात्र'मध्ये मांडली होती. 'ऐसा दुस्तर संसार' या दीर्घ कथासंग्रहात एकूण सात दीर्घकथा आहेत. 'दीर्घकथांच्या विविध शक्यता अजमावून पाहणाऱ्या विविध तंत्रशैलींच्या शक्यतांबद्दल मला अपार कुतूहल वाटत आले आहे.' असे 'दोन शब्द' त्यांनी या संग्रहाच्या निमित्तानं व्यक्त केले आहेत. दीर्घकथेची अशी सलग मांडणी करणारे अपवादात्मक लेखक आपल्याला समकालीन मराठीमध्ये दिसतात.

माणसांचा जीवनविषयक झगडा, गुमनामीच्या अंधारामध्ये त्याचं जगणं, स्वतःच्याच मानसकोशामध्ये गुंतणं, एकूणच जीवन रहस्यमय असणं अशी काही सूत्रं भारत सासणे यांच्या एकूण लेखनामध्ये आपल्याला आविष्कृत झालेली दिसतात. कथा, कादंबरी, नाटक, इतकंच काय तर बालसाहित्यातही हे सूत्र नव्या स्वरूपात भारत सासणे व्यक्त करत राहिलेले आहेत.

आपल्या काही पुस्तकांना सासणे यांनी एखाद-दोन परिच्छेदांच्या भूमिका लिहिलेल्या आहेत. जे बोलायचं आहे ते संहिता सांगेल यावर विश्वास असल्यामुळे सासणे स्वतंत्र स्पष्टीकरण देत नाहीत. 'जॉन आणि अंजिरी पक्षी' या पहिल्या कथासंग्रहाच्या वेळी छोट्या तीन परिच्छेदातून त्यांनी स्वतःचं मनोगत व्यक्त केलं होतं. या कथासंग्रहात त्यांनी स्वतःच्या लेखनाविषयी आशावाद व्यक्त केलेला आढळून येतो. १९८० साली त्यांनी लिहिलं होतं, की 'ही प्रवासाची सुरुवात आहे. यापेक्षा चांगलं लिखाण हातून होईल असा विश्वास बाळगून आहे.' मागील चार दशकांचा भारत सासणे यांचा लेखनप्रवास पाहिला तर स्वतःविषयी व्यक्त केलेला विश्वास सार्थ झाला आहे असं म्हणता येतं. सतत प्रयोगशील राहून प्रकटीकरणाच्या नव्या वाटा,

नव्या शक्यता शोधणं भारत सासणे यांनी केलं. लेखक म्हणून तंत्रशरण न होऊ देण्याचं आव्हानही त्यांनी पेललेलं दिसेल. प्रयोगशील लेखक म्हणून सासणे हे महत्त्वाचे लेखक आहेत, असं असलं तरी सासणे यांनी केलेले प्रयोग हे ठरवून केलेले आहेत असं वाटत नाही तर आशयाच्या अंतःकरणातून ते सहजपणे उमलून आलेले दिसतात.

'वाटा आणि मुक्काम' हे भारत सासणे यांचं स्व-संवादाचं किंवा मुलाखतीचं छोटेखानी पुस्तक. आशा बगे, भारत सासणे, सानिया, मिलिंद बोकील या लेखकांनी स्वतःला काही प्रश्न विचारले आणि लेखक म्हणून, कलावंत म्हणून, त्याची उत्तरं शोधली. लेखक भारत सासणे समजून घेण्यासाठी 'वाटा आणि मुक्काम' हे पुस्तक महत्त्वाचं वाटतं. या पुस्तकाइतकाच 'सटवाईचा लेख' हा ललितलेखांचा संग्रह लेखक सासणे यांना समजून घेण्यास उपयुक्त आहे. 'खिडकीतून आकाश', 'स्वतः साहित्य आणि भोवताल' या उपशीर्षकाअंतर्गत असणाऱ्या लेखांमधून सासणे यांचं व्यक्तिमत्त्व पुन्हा पुन्हा व्यक्त झालेलं आहे. छोट्या छोट्या प्रसंगाकडे पाहण्याची कलावंताची दृष्टी किती अपूर्व असू शकते, याचा प्रत्यय हे ललितलेख वाचताना येतो. या पुस्तकातील 'यक्षनगरीच्या आठवणी' हा धुळे शहरावरील लेख अत्यंत विलक्षण आहे. धुळे यासारखं शहर एखाद्याच्या नजरेतून ते किती सुंदर दिसू शकते किंवा एखाद्याच्या स्मृतीमध्ये ते किती सुंदर असू शकतं हे लेख वाचताना जाणवत राहतं.

भारत सासणे यांनी बालकुमारांसाठी लेखन केले आहे. समशेर कुलूपघरे हा त्यांनी निर्माण केलेला नायक एकविसाव्या शतकातील कुमारांचा आवडता नायक आहे. 'चल रे भोपळ्या' आणि 'हंडाभर मोहरा' या प्रयोगक्षम नाटिका, 'जंगलातील दूरचा प्रवास', 'टुनटुन बेडकाचा प्रवास' या  कादंबऱ्या कुमारांसाठी महत्त्वाच्या आहेत. प्रौढांसाठी लेखन करणारे मराठी लेखक बालकांबाबत प्रचंड उदासीन असतात. या पार्श्वभूमीवर सासणे यांनी मुलांसाठी लिहिणं त्यांच्या वेगळेपणाचे निदर्शक आहे.

कादंबरीकार भारत सासणे आणि भाषांतरकार भारत सासणे ही दोन्ही व्यक्तिमत्त्वं पुन्हा अशीच विलक्षण आहेत. समाजवास्तवाकडे पाहण्याची दृष्टी 'दोन मित्र'सारख्या कादंबरीमध्ये आपल्याला बदललेली दिसेल. 'राहीच्या स्वप्नांचा उलगडा'पर्यंतचे सासणे आणि 'दोन मित्र'नंतरचे सासणे यांच्यामध्ये लेखक म्हणून झालेला बदल आपल्याला तपासता येऊ शकतो. सामाजिक प्रश्नांच्या मुळाशी जाण्याचा व त्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न भारत सासणे यांनी 'दोन मित्र'मध्ये जसा केला तसा तो पुढील काळात 'उघडा! दरवाजे उघडा' या नाटकाच्या अनुवादातून केला आहे. सासणे यांच्या लेखकीय व्यक्तिमत्त्वात झालेलं हे स्थित्यंतर निरनिराळ्या दृष्टीनं तपासून घ्यायला हवं.

एक प्रतिभावंत लेखक हा साहित्यप्रकाराच्या संकल्पनांना हादरे देत असतो.

साहित्यप्रकाराची पारंपरिक संरचना, तिची मोडतोड करत असतो आणि नवा आकृतिबंध मांडत असतो. प्रतिभावंत भारत सासणे यांच्या लेखनानं हे केलं आहे.

रमेश राऊत यांनी संपादित केलेल्या 'पहिलं पुस्तक' या ग्रंथामध्ये सासणे यांनी आपल्या सुरुवातीच्या लेखनाविषयी भाष्य केलं आहे. 'जगण्याच्या सामान्य पातळीवरून पहिलं पुस्तक लेखकाला थोडंसं वर करतं. 'बुल फायटिंग'च्या रिंगणात आणून सोडतं. आता पुढची झुंज तुमची तुम्हालाच लढायची असते. घायाळ व्हायचं असतं आणि घायाळ करायचं असतं. अस्वस्थता इथे अंतरात असतेच. बैल कुठे वेगळा असा नसतोच. तो तुमच्यातच असतो. अस्वस्थ टोकदार शिंगांचा...' असं सासणे यांनी या लेखामध्ये म्हटलं आहे.

भारत सासणे यांचं माणूस म्हणून असणारं आणि लेखक म्हणून असणारं व्यक्तिमत्त्व समजून घेत असताना मला बुलफायटिंगचा संदर्भ आणि स्वतःला घायाळ करून घेण्याची लेखकाची वृत्ती सातत्यानं जाणवत राहते. ही वृत्ती असते म्हणून लेखक माणूसपणाच्या पातळीवरून स्वतःच्या भोवतालाला समजून घेतो. भारत सासणे या जिल्हाधिकारी माणसाला एड्सग्रस्त मुलांचा प्रश्न समजला आणि त्यांच्यातील अधिकाऱ्यानं तात्काळ पावलं उचलली ती त्यांच्यात दडलेल्या लेखकामुळे.

उदगीर येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी एका मोठ्या लेखकाची निवड झाली आहे. त्यासोबतच एका मोठ्या माणसाचीदेखील निवड झाली आहे, असं मला म्हणूनच वाटतं.

**– डॉ. पृथ्वीराज तौर**

भ्रमणध्वनी : ९५७९१३६४६६

(डॉ. पृथ्वीराज तौर हे नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक आहेत.)

सूचना :
'साहित्य' अंकाची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.
त्यासाठी साहित्य संघाचा बँक अकाउंट नंबर
तसेच IFSC Code कव्हर २ वर दिलेला आहे.
ऑनलाइन वर्गणी भरल्यास, तुमचा पोस्टल ॲड्रेस, पिनकोडसहित
९८३३४४४३६९ या मोबाइल नंबरवर पाठवावा.



एका शाश्वत स्वराला विनम्र अभिवादन

# लता मंगेशकर... एक शाश्वत स्वर...

## डॉ. मृदुला दाढे जोशी

**लताबाईंनी** आजवर शेकडो संगीतकारांकडे हजारो गाणी गायली. संगीतकारांची शैली, त्यांचा स्वरविचार स्वतःच्या गळयातून अभिव्यक्त करताना, वेगवेगळ्या कवींच्या शब्दांचा विचार, अर्थाचा विचार त्या कवीच्या भूमिकेत जाऊन करताना त्यांच्या स्वतःच्या बुद्धिमत्तेचा किती कस लागला असेल? वरकरणी, बारा स्वर आणि भाषेतले सगळे मिळून काही हजार शब्द, याच्या पलीकडे काय होतं? संगीतकार कितीही प्रतिभाशाली असला तरी १२ स्वरांच्या बाहेर तो जाऊ शकत नाही... आणि कवीच्या हाती असलेल्या अक्षराचांच क्रम बदलतो... शब्दसंख्या मर्यादितच... पण हा झाला सामान्य लोकांचा गरीब, दारिद्र्यरेषेखालचा विचार...जिथे आपली बुद्धी संपते. तिथे प्रतिभावान कलाकारांचा प्रांत सुरू होतो. आपल्या अशा मर्यादित बुद्धीमुळेच पटकन कुणालातरी प्रतिलता, स्वरसम्राज्ञी वगैरे म्हणण्याचं भयंकर विनोदी धाडस आपण करू शकतो. हा आवाज, ही बुद्धी, ही समज आणि ही कुवत.. हा श्वास... हा संयम; हा उच्चार, हे गाण्याला व्यापून टाकणं...नसतं हो असं सहज. ते समजून घेण्याचीसुद्धा पात्रता अंगी बाणवावी लागते. पण एकदा त्या चरमसुखाला पोचलो की स्वतःचा हेवा करावा असंच ते सुख असतं. लताबाई ज्या संगीतकारांकडे गायल्या, त्या संगीतकारांच्या टेंपरामेंटमध्ये जाऊन त्यांनी ती गाणी गायली.. म्हणून हा आवाज, एकसारखा, मोनोटोनस वाटला नाही. त्या भावनेत भिजूनच तो आला. लताबाईंनी आवाजातून साकारलेल्या वेगवेगळ्या नायिका, त्यांचे मूड, त्यांच्यासाठी त्यांनी आवाजात केलेले बदल... या नायिका ...कुणी अनुरागिता होत्या. कुणी मुग्धा होत्या, व्यथिता, विरहिणी, अभिसारिका होत्या, लताबाईंनी त्या संगीतकाराची शैली तर आपल्या आवाजानं अधिक खुलवलीच, शिवाय स्वतःच्या आवाजातून मॉड्युलेशनच्या साहाय्यानं त्या भूमिकासुद्धा एका उंचीवर नेऊन ठेवल्या. कित्येकदा त्या अभिनेत्रींना मुद्राभिनयाची गरज वाटू नये इतका अभिनय त्या आवाजात आधीच उतरला. त्याचाच आस्वाद घेऊया...

*अनुरागिता*

रजनीगंधा फूल तुम्हारे

चित्रपट – रजनीगंधा

गीत – योगेश

संगीत – सलील चौधरी.

सलील चौधरीचं सांगीतिक मन हे गुंतागुंतीचंच, तरीही त्यातल्या त्यात कमी गुंतागुंत असलेलं हे गाणं! संपूर्ण गाण्याला व्यापून उरलाय तो निशिगंधाचा प्रमाथी सुगंध. पण ही प्रेमाची अगदी सुरुवातीची अवस्था. सर्वस्व त्याच्या अस्तित्वात विरघळून टाकावं असा कोणीतरी भेटलाय तिला. आणि हे सगळं ती फक्त एका निशिगंधेला सांगतेय. ही कल्पनाच किती रोमँटिक!

तिच्या भावविश्वात महत्त्व आहे ते फुलांना.. त्या गंधाला.. कारण तो गंध त्याची चाहूल घेऊन येतो. त्या गंधाचं आणि त्याच्या अस्तित्वाचं नातं खूप घट्ट आहे, 'यूँही महके प्रीत तुम्हारी मेरे अनुरागी मन में' हे गाताना त्या आवाजात एक आतुरता आहे. कुणाच्यातरी अस्तित्वात स्वतःचं अस्तित्व विरघळवून टाकण्याचीच आस, ऊर्मी. मला हे वेगळेपण, हे स्वातंत्र्य नकोच. 'अधिकार ये जबसे साजन का हर धडकन पर माना मैने!' माझ्या काळजाच्या प्रत्येक ठोक्यावर तुझं अस्तित्व दिसू दे, तुझा अधिकार असू दे आणि इथे, अवचित एक गुपित सापडल्याचा भास लताबाई आवाजात देतात, 'मै जबसे उनके साथ बंधी. ये भेद तभी जाना मैने, कितना सुख है बंधन में.' माहीत नव्हतं हे बंधन किती हवंहवंसं आहे ते..त्यातलं सुख आता समजलं! 'रजनीगंधा' हे संबोधन आहे. इथे लताबाई आपल्या आवाजाचा थ्रो बदलतात. हर पल मेरी इन आँखोमे बसे रहते हैं सपने उनके...मन कहता है मैं रंगों की इक प्यारभरी बदली बनके; बरसूँ उनके आंगन में... हेसुद्धा किती नाजूक स्वप्न.. प्रेमातली असोशी. त्याच्यासाठी एक सुंदर आनंदघन बनून का जाऊ नये? बरसावं आणि आपणही रिक्त व्हावं त्याच्यासाठी. प्रत्येक वेळी लताबाईंचा आवाज इथे बारीक होत जातो आणि 'रजनीगंधा'चा 'नी' म्हणताना तो इतका सुंदर वळवला जातो. 'हाँ यूँही महके प्रीत पियाकी मेरे अनुरागी मनमें' ही ओळ अगदी आतलं गुपित सांगण्यासाठीच जणू अशी खाली खर्जात जाते. अगदी वेगळ्याच टोनमध्ये गायलेलं गाणं आहे हे. आणि वाद्यमेळसुद्धा किती मर्यादित. एका गिटारवर सगळं गाणं उभं आहे. गिटार त्या गाण्याला आणखी रोमँटिक बनवतं हे खरं असलं तरी मुळात सगळा अनुराग लताबाईंच्या आवाजात आहे.

*मुग्धा*
कुछ दिल ने कहा
चित्रपट – अनुपमा
गीत – कैफी आझमी
संगीत – हेमंतकुमार

काही गाणी लताबाईंनी अगदी वेगळ्या आवाजात गायली. त्याचं कारण पटकथेत दडलेलं असायचं. ज्या भूमिकेला त्या आवाज देत असत त्या व्यक्तीचा स्वभाव कसा आहे, गाताना तिची भावनिक अवस्था कशी आहे हे जाणून त्याप्रमाणे त्या आवाजाचा पोत ठरवत असत. एकाच प्रमुख भावनेच्याही ज्या अनेक छटा आहेत त्यांचं दर्शन त्यांच्या त्या आवाज लावण्याच्या पद्धतीत होत असे. 'अनुपमा'मधलं 'कुछ दिल ने कहा' हे याचं अगदी बोलकं उदाहरण. ती अनुपमा अबोल आहे. मुग्ध आहे. कधीही खुलून न बोलणारी. आक्रमकपणा तर तिच्या स्वभावात औषधालाही नाही. मनातलं सांगताना लताबाई सगळं गाणं कुजबुजत्या आवाजात गायल्या आहेत. गाण्यात काही जागा अशा येतात की भावनेच्या आवेगात आवाजातली उत्तेजना वाढते..पण किंचितच. कारण दुसऱ्याच क्षणी ती आवाज लगेच आत घेते. तिला वाटतं की जरा धिटाई जास्तच झाली की! ..बघा...कलियोंसे कोई पूछता, हँसती है या रोती है..! हा आवेग जरा जास्त आहे. मग हा मोती हळूच शिंपल्यात स्वतःला मिटून घेतो. तिथे चढलेला आवाज पुन्हा 'ऐसी भी बातें होती है'ला अस्फुट आणि आत्ममुग्ध होतो. एकाच वेळी ती स्वतःशी बोलते आहे आणि निसर्गाशीही. कारण कैफीच्या शब्दांतला तो भेद त्या स्वरांतून जाणवतो. 'ऐसी भी' आणि 'ऐसे भी'.. फरक आहे दोन्हींत.. असा संवाद असतो आणि अशा प्रकारेही संवाद होतो..यातला हा फरक आहे. किती सूक्ष्म हा विचार आहे आणि तितक्याच सूक्ष्मपणे लताबाई तो पोचवतात त्यांच्या आवाजातून.

*व्यथिता*
आज सोचा तो आंसू भर आये
गीत – कैफी आझमी
संगीत – मदनमोहन

मदनमोहन हा एक जखमीच मन घेऊन आलेला. त्याच्या चाली गाताना तो विशिष्ट दर्द, लताबाईंच्या आवाजात दिसला नाही तरच नवल. दर्द दिसला म्हणणंही चुकीचंच. त्या ठसठसत्या वेदनेत भिजून तो आवाज आला. आज सोचा तो आंसू भर आये...कैक वर्षं झाली, मी हसलेच नाही! काय असतं ते? आज त्या विचारानं डोळे भरून येताहेत. यात आयुष्यात एक मोठी पोकळी राहून गेली, हा भाव आहे. कसा व्यक्त

होतो हा भाव? 'आज' हा शब्द नीट ऐकला तर त्यात लावलेला उतरी कोमल निषाद आपल्याला जाणवतोच! ते वैफल्य! 'दिल की नाजूक रगें टूटती है, याद इतना भी कोई न आये'... या ओळी तर अक्षरशः जीव घेतात. यात लताबाई इतना या शब्दाचा उच्चार विशिष्ट तऱ्हेने करतात. 'त'वर किंचित जोर देऊन. 'इतना' असा. नको ती तुझी आठवणही. इतका नको छळूस तुझ्या आठवांनी... की काळजाचे धागे तुटून जावेत! आज सोचा तो आंसू भर आये!

*विरहिणी...*
चाँद फिर निकला
चित्रपट – पेइंग गेस्ट
गीत – मजरूह सुलतानपुरी
संगीत – सचिन देव बर्मन

सचिन देव बर्मन खरं तर एक खुशमिजाज हिरवागार संगीतकार. फार कमी गाणी अशी होती की ज्यात तीव्र दु:ख आहे. पण, एक गाणं असं दिलं बर्मनसाहेबांनी की काळजाचं पाणी पाणी झालं ऐकताना. कारण लताबाईंनी त्या विरहाला ज्या उंचीवर नेऊन ठेवलं त्याला तोड नाही. चाँद फिर निकला.. मगर तुम न आये.. जला फिर मेरा दिल, करूँ क्या मैं हाये... किती विद्ध असा आवाज लावलाय लताबाईंनी. काय करू मी? तोच चंद्र.. तशीच रात्र..पण तू नाहीच आलास... माझं काळीज होरपळून निघालं, पण तू नाही आलास..'जला गये तन को बहारों के साये!' ही बहार मला अंतर्बाह्य जाळून गेली. तरीही तू नाही आलास. 'चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी.. कान्हो वनमाळी वेगी भेटवा..!' हीच स्थिती.. आणि 'सुलगते सीनेसे धुंआ सा उठता है'... या जळणाऱ्या काळजातून हा भावनांचा निघणारा धूर... गुदमरून टाकणारा... आता तरी ये... अंत पाहू नकोस–! हा घुसमटलेपणा आवाजातून दाखवणं या विश्वाच्या अफाट पसाऱ्यात फक्त एकाच व्यक्तीला शक्य आहे. यातल्या त्या 'दम घुटता है'... आणि 'हाये'..या शब्दावरून किती जीव ओवाळावेत ते कमीच आहेत. लताबाईंमुळे या पातळीला आपलं मन तरी पोचतं. त्या तर जगल्यात ही भावना.

*अभिसारिका*
तू चंदा मैं चाँदनी
चित्रपट – रेश्मा और शेरा
गीत – बालकवी बैरागी
संगीत – जयदेव

जयदेव हा समजायला कठीण संगीतकार. सहज गाता येणार नाहीत अशाच रचना.

पण पटकन तुमच्याच मनासमोर आरसा धरणारे शब्द आणि त्यांना भावनेत लपेटून टाकणाऱ्या स्वररचना. मनातला कल्लोळ शब्दांत आणि स्वरांत अचूक उमटवण्यासाठी लागणारी प्रतिभा ठासून भरली होती जयदेवमध्ये. जयदेवसाठी गाताना लताबाईसुद्धा आवाजाचा थ्रो वेगळा ठेवतात. तू चांद मै चांदनी गाणारी नायिका ही अभिसारिका आहे. प्रियकराला भेटायला आतुर झालेली. सतत त्याचं आणि आपलं नातं कसं युगानुयुगांचं आहे हे सांगणारी. अखंड एकत्र राहण्यासाठीच जन्माला आलो... तू बादल, मै बिजुरी! बिजुरी म्हणताना बिऽऽजुरी असं गातात त्या.. तेव्हाच त्या ढगातच आपलं तेजस्वी अस्तित्व जपणारी सौदामिनी तळपून जाते. तू पक्षी असशील रे पण मी तुझे पंख बनून असेन तुझ्याच सोबत.. तू वृक्ष असलास तर मी शाखा बनून तुझ्याच अस्तित्वाचा भाग बनून राहीन. आवाजातली ती धार, मीलनोत्सुक भाव कसा गडद होत जातो बघा. पहिल्या अंतऱ्यात 'कहा बुझे तन की तपन....?' हे सुचवलंय. तेव्हासुद्धा आवाजात अती धिटाई नाही. तर सूचक भाव आहे. नंतर 'तुझे आंचलमें रखुंगी ओ सावरे, काली अलकोंसे बांधूंगी ये पाँव रे'.. अशी आमिषं आहेत. या मोहपाशातून तो निघू शकेल का? लताबाईंचा आवाज या शब्दांवर इतका मोहक, आणि त्याच्यातला प्रियकर जागा करणारा आहे, की त्या सुखाच्या कल्पनेनंच तो धावत आला नाही तरच नवल. 'गल बैया वो डालूँ के छूटे नहीं.'.. त्या प्रिय सखीनं गळ्यात घातलेले हेच ते चांदण्यांचे हात. या बाहुपाशातून तो सुटणार कसा आणि का..? या ओळींना बाई ती किंचित जास्त आतुरता दाखवतात आणि हळूहळू हे गाणं द्वैताकडून अद्वैताकडे जाताना तो आवाजही तसाच... समरस होण्याच्या पातळीवर पोचतो. 'ओ मेरे सावन सजन.. ओ मेरे सिंदूर... चार पहर की चाँदनी मेरे संग बिता.. अपने हाथोंसे पिया मोहे लाल चुनर ओढा..केसरिया धरती लगे अंबर लालम लाल रे' ...बघ सगळं कसं एकाच लाल रंगात न्हायलंय. ही धरती, आकाश. माझी ओढणी! यातच तूपण मिसळून जा.. आता दूर राहू नकोस.. 'अंग लगाकर सायबा कर दे मुझे निहाल रे!' हा 'निहाल' शब्द बाई असा काही उच्चारतात की द्वैतापासून अद्वैतापर्यंतचा हा प्रवास चरमबिंदूला पोचतो. आधी चंद्र-चांदणी..बादल-बिजुरी, पक्षी-पंख, वृक्ष-फांदी.. ही प्रतीकं हळूहळू एकाकार होत जातात, आणि लताबाई त्यांच्या आवाजातून या सुखबिंदूकडे आपल्याला नेतात. शब्दांची भाषा तर केव्हाच संपली. आता आहे ते एकच अस्तित्व. त्या केसरिया धरेत आणि अवकाशात विरून जाणं...ते क्षितिजही त्याच रक्तिमेत एकरूप होणं! हीच ती मधुरा...! हीच मीरा!... हेच अद्वैत.. हाच मोक्ष...! आणि हाच आहे शाश्वत आवाज... सगळ्या निकषांच्याही पलीकडे जाणारा!

**– डॉ. मृदुला दाढे जोशी**
mrudulasjoshi@gmail.com

# संतसाहित्यातील सर्जन-प्रेरणा

**रेखा रमेश नार्वेकर**

महाराष्ट्रातील साहित्य-संस्कृतीचं शिल्प संतमहंतांनी, कवी-कलावंतांनी आणि विचारवंतांनी घडवलं. मराठी साहित्यावर तर संतांच्या विचारांची 'अक्षरमुद्रा' उमटलेली दिसते. संतांच्या लेखणीनं समाजमनाच्या भूमीत अमूल्य अशा विचारांची पेरणी केली. 'ग्यानबा-तुकाराम' हा घोष भाबडेपणाचा नसून त्याच्यामागे संत ज्ञानदेव-तुकाराम आदी सर्व संतांविषयी एक कृतज्ञता व्यक्त करणारी आपलेपणाची भावना आहे. मराठी मनाचं सामर्थ्य, त्याचं तेज आणि ओज हे खरं तर संतसाहित्याचं फलित आहे. संतसाहित्यातून मिळणारी उज्ज्वल-उदात्त प्रेरणा समाजजीवनात जोपासण्याचा प्रयत्न गेली कित्येक शतकं सहजतेनं होताना दिसतो आहे.

महाराष्ट्रातल्या संतपरंपरेचा मेरुमणी म्हणजे संत ज्ञानेश्वर. त्यांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरीचा अर्थबोध घेताना अध्यात्माशी वेगळं नातं जडतं. शिवाय भोवतालच्या परिसरातले अनेक प्रतिभात्मक आविष्काराचे दाखले मिळताना अनेक प्रश्नांची मालिका समोर येऊन उभी राहते. पंचज्ञानेंद्रियांमार्फत रस, गंध, नाद, स्वादाची माहिती माणसाच्या मनापर्यंत पोहोचते. आणि मग त्याहीपलीकडे असणाऱ्या ज्ञानाची जाणीव होते ती आत्म्याला. या विश्वात सर्वव्यापी असलेलं चिरंतन तत्त्व कोणतं? क्षणात सृजननिर्मिती किंवा लय-क्षय कोण घडवतं? मी कुठून आलोय? कुठे जाणार? माझ्या अस्तित्वाचं प्रयोजन ते कोणतं? या संपूर्ण चराचरसृष्टीशी नातं कोणतं? अनेक प्रश्न. या प्रश्नांची उत्तरं शोधणं, स्वत:च स्वत:ला प्रगत करत राहाणं आणि या सगळ्या प्रश्नांची उत्तरं समजावून सांगत - निसर्गातील अनेकानेक उदाहरणं देत 'ज्ञानेश्वरी' तुमच्या पाठीशी उभी राहतं. साध्या-सोप्या-रसाळ भाषेत अनाकलनीय गोष्टी समजावून सांगते.

हे उपजे आणि नाशे। ते मायावशे दिसे।
येऱ्हवी तत्त्वता वस्तू जे असे। ते अविनाशाचे।।१०५
जैसे पवने तोये हलविले। आणि तरंगाकार जाहले।
तरी कवण के जन्मले। म्हणो ये।।१०६
(अध्याय दुसरा)

जन्म आणि मृत्यू यांच्या वास्तव किंवा तात्त्विक प्रक्रियेच्या स्वरूपाचं वर्णन सृष्टीतील अनुभवांशी संमीलित करताना ज्ञानदेव म्हणतात, – 'वाऱ्याच्या झुळकीनं पाण्यावर तरंग उठतो आणि काही क्षणानंतर विरून जातो, त्याप्रमाणे या संपूर्ण विश्वात नित्य काहीतरी नवं निर्माण होत असते आणि काही काळानं ते नष्ट होऊन जाते. तरंग उठला आणि नाहीसा झाला तरी मूळ पाणी असावयाचे तसेच असते. कोट्यवधी मृत्यू आणि कोट्यवधी जन्म असं सृजननिर्मिती–लयाचं चक्र अनादीकाळ फिरत रहाणार आणि यासाठी जन्म म्हणजे आनंद आणि मृत्यू म्हणजे दु:ख मानण्याचं काहीच कारण नाही – ज्ञानदेव समजावून सांगतात.

मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे।
अलौकिक नोहावे। लोकांप्रति।। (अ. ३–१७१)

कितीही सुखसमृद्धी, अनुभव–ज्ञान प्राप्त झालं तरी स्वत:ला मोठं न समजता संपूर्ण समाजातील माणसांमध्ये मिळून–मिसळून राहणं आणि सर्वांना सहकार्य करून प्रगतिपथावर आणण्यासाठी प्रयत्न करणं हेच आपले कार्य आहे – याची जाणीव नित्य ध्यानी–मनी असावी, असा मोलाचा संदेश ज्ञानदेवांप्रमाणे सर्वच संतांनी दिला आहे.

इसवी सन १३ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि १४ व्या शतकाचा पूर्वार्ध हा ज्ञानदेव–नामदेव यांचा काळ होता. हा कालखंड वारकरी संप्रदायाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याच्या योग्यतेचा आहे. पूर्वापार चालत आलेल्या या भक्तिपंथात ज्ञानदेवांनी नवीन आशय ओतला आणि सखोल व्यापक केला. विश्वात शांती निर्माण होण्यासाठी मानवता, समता, विश्वबंधुत्व त्यांना हवं होतं. यासाठीच

'हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर।
किंबहुना चराचर। आपण जाहलो।।'

अशी विशाल–व्यापक अर्थाची, संपूर्ण सजीव–निर्जीवसृष्टीला एकत्र आणणाऱ्या विश्व–कुटुंबाची संकल्पना त्यांनी व्यक्त केली. संपूर्ण विश्वात शांतता निर्माण होण्यासाठी प्रथम या विश्वातील सगळे घटक शांत झाले पाहिजेत. एखाद्या राष्ट्रात शांतता–सुख–समाधान नांदण्यासाठी त्या राष्ट्रातील प्रत्येक व्यक्ती शांत–समाधानी असली पाहिजे. मनुष्याच्या अंतरंगात शांतता नाही तर तो बाहेरून समाधानी कसा असेल? गावातील माणसं लोभी असली तर गावात शांतता राहील का? आर्थिक विषमता दूर होऊन अन्न–वस्त्र–निवारा हा सर्वांना पुरेसा मिळणं आवश्यक आहेच परंतु त्याचबरोबर मानसिक शांतता–समाधान हे अत्यंत गरेजचं आहे. अर्थातच कामक्रोधलोभादि विकार अंत:करणातून नष्ट होणं आत्यंतिक महत्त्वाचं आहे आणि संतांनी यासाठीच, मनाच्या स्वास्थ्यासाठी–आरोग्यासाठी उत्तम साहित्य निर्माण केलं आहे. समाजातील विविध प्रकारच्या अनेक समस्या सोडवण्यासाठी 'ईश्वरनिष्ठ माणसांची मांदियाळी निर्माण होणं'

हा एक सुरेख मार्ग आहे.

पुढे संत एकनाथांच्या काळात तर मुसलमानी सत्तेच्या आधिपत्याखाली अत्यंत प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु नाथांनी लोकजागृतीच्या कार्यासाठी 'कीर्तन' हे प्रभावी साधन मानलं आणि कीर्तनाद्वारे व्यथा-वेदना-संकटातून मुक्ती मिळवण्यासाठी खऱ्या परमेश्वराचा अर्थ ते खेड्यापाड्यातील लोकांना समजावत राहिले.

नवल श्रद्धेचे लक्षण। ब्रह्मा मुंगी समसमान।
तरी यथोचित विधान। सर्वथा जाण चुकेना।।

समतेच्या स्वरूपाविषयी सांगताना एकनाथ म्हणतात - वागणुकीत समता आणावयाची म्हणजे माणसाला गवत घालायचे, गाईला मिष्टान्न खायला द्यायचे किंवा श्वानाला सिंहासनावर बसवून विद्वान माणसाला - संतसज्जनाला फाटक्या गोधडीवर बसवायचे हे समान वागणुकीचे गमक ठरत नसून ते अडाणीपणाचे लक्षण ठरते. फक्त संख्येची समता quantitative समतेपेक्षा qualitative समता असावी. संत तुकारामांच्या शब्दांत सांगावयाचे तर

''कोणाही जिवाचा न घडो मत्सर।
वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।''

आपली वर्तणूक निर्मत्सर असणं म्हणजेच सर्वेश्वर सर्व ठिकाणी पाहाणं होय. कोणाचाही द्वेष न करता सद्बुद्धीनं कार्य करत राहाणं हेच समानता पाळण्याचं लक्षण आहे. सर्व सुखी व्हावेत या इच्छेनं वागताना समोरच्याचं कल्याण ज्यांच्यात आहे ते करणं म्हणजे समानतेनं वागणं.

संत चोखामेळा, संत बंका, सेना न्हावी, गोरा कुंभार, कान्होपात्रा, निर्मला, जनाबाई या सर्वांना संत नामदेवांनी संस्कार-विचारांचा वसा देऊन संतांची मांदियाळी उभी केली, स्वरचित अभंगांनी वाङ्मयमंदिराची रचना पूर्णत्वाकडे नेली. या मंदिराला प्रमुख आधार दिला एकनाथी भागवत ग्रंथानं - आणि कळस घडवला व चढवला संत तुकारामांनी. कळस घडवण्यासाठी जे घाव सोसावे लागतात ते तुकोबांनी सोसले.

तुकारामांचे प्रसन्न, प्रासादिक कवित्व पाहून काही सनातनी मंडळींना त्यांचा हेवा वाटू लागला. रामेश्वर भट्ट - मंबाजीबुवा हे द्वेष-मत्सर करण्यात प्रमुख होते. परंतु

'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा।
येरांनी वहावा भार माथा।।'

असे ठामपणे - आत्मविश्वासानं तुकोबांनी या सनातनी वृत्तीच्या लोकांना सांगितलं. संत तुकारामांच्या अभंगांच्या गाथा या दुष्टांनी इंद्रायणीच्या डोहात बुडवल्या. परंतु आजही हे अभंग महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांना मुखोद्गत आहेत. लोकांच्या मनातून, हृदयातून, वाणीतून, आचरणातून नाहीसे करणं ते कुणालाही शक्य झालं

नाही. आणि म्हणूनच –

काय करिशी काशी गंगा। भितरी चांगा नाही तो।
चित्त शुद्ध तेथे शत्रु मित्र होती।
केळी आणि बोरी वसती शेजारी।
संवाद कोणेपरी घडे येथे।।

अशा सुरेख अभंगातून खेड्यापाड्यातील लोकांना जीवन जगण्यासाठी ऊर्जा मिळत गेली. व्यवहार, प्रपंच उत्तम रीतीनं कसा करावा, माणसाच्या मनामध्येच किती सामर्थ्य आहे, मैत्री करतानासुद्धा जागृत कसं राहावं, यापलीकडे जाऊन आपलं मन–अंतरंग, पवित्र–शुद्ध असेल तर शत्रूसुद्धा मैत्रीचं नातं स्वीकारण्यास कसा तयार होतो, असे माणसाच्या जगण्याला उपयुक्त ठरणारे, माणसाला प्रेरणा देणारे–बळ देणारे विचार त्यांनी आपल्या अनुभूतीतून अभंगाद्वारे व्यक्त केले.

संत तुकारामांनी रचलेल्या पाच हजार अभंगांची गाथा म्हणजे अनुभवरत्नांची खाण आहे. 'ज्ञान्याचा एका आणि नाम्याचा तुका' असं म्हटलं तरी ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ या संतत्रयींचं सर्व अनुभवामृत एकट्या तुकारामांनी आत्मसात केलं आणि त्यांना स्वतःच्या प्रचीतीची जोड दिली. संत कबीर हेसुद्धा तुकारामांप्रमाणे मुक्त चिंतक होते. कबीरांच्या वचनांचाही तुकोबांनी आस्थेनं अभ्यास केला, आणि 'अंतरीचे धांवे स्वभावे बाहेरी' या प्रक्रियेनं कबीरांचे विचार तुकारामांच्या साहित्यात उतरलेले दिसतात. लोकांच्या मनातील 'अविवेकाची काजळी' झटकण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. 'बुडती हे जन देखवेना डोळा' अशी तळमळ त्यांनी खूप वेळा व्यक्त केली. खरं तर तुकाराम हे आपल्यापैकीच एक आहेत असं वाटतं. खूप वेळा ते आपलेच विचार बोलून दाखवतात. सामान्यजनांचा वैताग, संताप व्यक्त करतात. त्याचप्रमाणे विश्वव्यापक अनुभव साहित्यातून कथन करतात. तुकारामांचं मन आणि अंतर्बाह्य जग यांत जो रात्रंदिवस संघर्ष चालू राहिला, त्यातूनच कठोर आत्मपरीक्षण, डोळस श्रद्धा, वाणीतला परखडपणा या सर्वांतून त्यांचं साहित्य अजरामर ठरलं. सर्वसामान्यांना धीर देणारं ठरलं. प्रयत्नानं, विवेकाच्या सामर्थ्यानं 'अणुरेणूहुनी थोकडा' स्वतःला समजणारे तुकाराम आकाशासारखे सर्वव्यापक होऊन भागवत धर्म मंदिराचा कळस होऊन सर्वांच्या हृदयात विराजमान झाले. एका भक्ताचा भगवंतापर्यंतचा हा प्रवास सामान्य माणसाला चैतन्य देणारा, ऊर्जा देणारा, दिशा दाखवणारा असाच आहे.

तुकारामांचं कार्य पुढे चालू ठेवणारे तुकारामांचे अधिकारी शिष्य म्हणजे संत बहिणाबाई आणि संत निळोबाराय. हे वारकरी पंथातील अखेरचे संतकवी म्हणायला हवेत. शब्दांची शस्त्रं करणाऱ्या संत तुकारामांनी तत्कालीन समाजात जागृती निर्माण केली होती. या जनजागरणाचं कार्य निळोबारायांनी विकसित केलं. अभंगांच्या

माध्यमातून भक्तीचा झेंडा फडकवताना समाजाला दिशा दाखवली. साखरेपासून गोडी वेगळी काढता येत नाही, वाद्यातील नाद वेगळा करता येत नाही, त्याचप्रमाणे 'आत्मा' दिसला नाही तरी त्याच्या अस्तित्वाची जाणीव माणसास अखंड होत राहते हे सांगताना निळोबाराय म्हणतात,

'आतु बाहेरी देखणाची दिसे।
परि तो आभासे दृश्य ये सा।।'

साहित्यिक, सामाजिक, पारमार्थिक अशा तिन्ही क्षेत्रांमध्ये आत्मभान जागृत ठेवून कार्य करणाऱ्या संत कवयित्रींनीही आपल्या साहित्यातून स्त्रियांबरोबर संपूर्ण समाजाला मार्गदर्शन, प्रोत्साहन दिलं आहे. महदाईसा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई आणि वेणाबाई, सोयराबाई या सगळ्यांनीच आत्मविश्वासाच्या बळावर समाजात परिवर्तन आणण्यासाठी संघर्ष केला. तत्कालीन समाजातील स्त्रियांना बालविवाह, विषमविवाह, हुंडा, सती, वैधव्य, केशवपन अशा अनेक दुष्ट प्रथांना बळी पडून केविलवाणं जीवन जगावं लागत होतं. अशावेळी या संत-स्त्रियांनी त्याकाळच्या समाजाच्या चाकोरीबाहेर पडून सगळी बाह्य बंधनं झुगारून देण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे स्वतंत्रपणे स्वत:च्या सामर्थ्यावर आखलेला स्वातंत्र्याचा मार्ग होता. या संत स्त्रियांनी मुक्त स्त्रीची नवी प्रतिमा उभी केली व ती जनमानसात बिंबवली.

स्वत:ला नामयाची दासी म्हणवणारी जनाई तर विकसित होता होता धीट होऊन देवालाच रोखठोकपणे सांगते,

आता भीत नाही देवा। आदि अंत तुझा ठावा।
ज्ञान, वैराग्य, विवेक सवे। ते तव खेळे आम्हांसवे।।

'ज्ञान, विरागीपण आणि सद्सद्विवेकबुद्धी आमच्यासोबत असल्यामुळे परमेश्वरा, तुझ्या जन्म-मृत्यूच्या फेऱ्याला आम्ही बिलकूल घाबरत नाही.' बहिणाबाई तर बुद्धिमान, प्रापंचिक-सामाजिक यशाची एकमेव वाटेकरी व स्वयंप्रकाशी होती. जीवनातील संघर्षांशी सामना करत 'स्वत्व' जगवण्यासाठी तिनं केलेली पराकाष्ठा तिच्या अभंगातून दिसून येते. त्याचप्रमाणे आध्यात्मिक पिंड असलेल्या बुद्धिमान स्त्रीची पदोपदी होणारी कुचंबणा तिच्या साहित्यातून जाणवत राहते.


'स्त्रियेचे शरीर पराधीन देह।
न चाले उपाय विरक्तीचा।।'

असं सांगताना प्रपंच व परमार्थ या दोन भिन्न येकांमध्ये कुतरओढ होणाऱ्या विरक्त, बुद्धिमान स्त्रीच्या शरीरयोगाचं दु:ख ती सांगते आणि प्रकाशाची वाट शोधताना तिला कळते - 'कर्म तेची ब्रह्म। ब्रह्म तेची कर्म।' म्हणजे समोर येणारे प्रत्येक कार्य-कर्म-कर्तव्य माणसानं स्वीकारून आनंदानं पार पाडणं. ते बुद्धीनं आणि मनानं आपलेसं

करणं. ‘स्त्री जन्म म्हणोनी न व्हावे उदास।’ हे सांगताना आत्मबळाच्या जोरावर स्वत:ला घडवा, विकसित करा – ‘स्वयंसिद्धा’ म्हणून नाव निर्माण करा असा सुरेख संदेश ती देऊन जाते. आजच्या स्त्रीमुक्तीच्या संदर्भातही या मध्ययुगीन मुक्तिवादी, स्वतंत्र विचारांच्या स्त्रियांचं हे यश खूप प्रेरणा, स्फूर्ती देणारं आहे. संत कवयित्रींनी उभी केलेली स्त्रीप्रतिमा नवीनतेबरोबरच साधना, अनुशासन, संघर्ष यातून मिळवलेल्या आत्मबलानं एक लखलखती तळपती शलाका बनली आहे. स्त्री-पुरुष समानतेचं ध्येय सहजीवनातून संपूर्ण संपन्न करणारी ही संत कवयित्रींची चळवळ नव्या आणि जुन्या समानतेच्या, स्वातंत्र्याच्या कल्पनांचा समन्वय साधणारी आहे. याचबरोबर मराठी स्त्रीच्या अस्मितेची, कर्तृत्वाची आत्मजाणिवेतून निर्माण झालेली, सर्वांनाच प्रेरणा देणारी, सृजनशीलता घडवणारी, समर्थ कथा सांगणारी आहे.

अभंग, ओव्या, भारूड, गौळणी इत्यादी विविध साहित्यरचनांच्या माध्यमातून या सगळ्याच संतांनी आत्मसाक्षात्कारातून प्राप्त झालेलं अनुभवविश्वाचं भांडार सर्वांसमोर खुलं केलं आहे. प्रपंच आणि परमार्थाची सांगड घालताना माणसानं सदाचारानं वागावं, चांगल्या गुणांची जोपासना करावी आणि विश्वातील सर्वांशी समानतेनं वागावं हाच संदेश दिला आहे. अज्ञानाचा, अविवेकाचा अंधार दूर होऊन सद्धर्माचा सूर्यप्रकाश अंत:करणात निर्माण होण्यासाठी – बंधुभाव, सहिष्णुता, प्रेम, सलोखा, मांगल्यानं सर्व जग उजळण्यासाठी असे हे ईश्वरनिष्ठ संतांचे मेळे या भूतलावर सर्वांना निरंतर भेटत राहू दे, सर्वांचं कल्याण होऊ दे.

**– रेखा रमेश नार्वेकर**
भ्रमणध्वनी – ९८२००९०२६९
narwekerrekha@gmail.com












# शब्दांच्या मरणाची कारणमीमांसा

## डॉ. केशव सखाराम देशमुख

**जनतेच्या** जिभेवरची भाषा ही जिवंत संवाद आणि व्यवहाराची भाषा होय. जिला प्रदीर्घ परंपरा आहे आणि जिचे मूल्य 'भाव-भान-भूमिका' असे त्रिस्तरीयदृष्ट्या जास्त महत्त्वाचे ठरते. वस्तुत: कोणतीच भाषा शुद्ध अथवा अशुद्ध नसते. कुणी तसे मानू नये. एकदा हे लक्षात आले म्हणजे भाषाभ्यासात गोंधळ उरत नाही. समाज, लोक, संस्कृती, सुखदु:खे, व्यवहार, सण, रीती, परंपरा, दैनंदिन दळणवळण हे सारे भाषेशिवाय शक्य होत नाही. बोली काय किंवा भाषा काय हे आम आदमीचे संवादाचे साधन होय. यात 'बोली'चे स्थान प्रवाही, जिवंत, रोचक, सहज असते. बोलीतला प्रत्येक शब्द मनात भिडत मनात जागा व्यापणारा असतो! विविध भाषाचिंतक बोलीचे काय होईल, बोलीच्या अस्तित्वाला धोका आहे, बोली बोलणारा समाज जपता यायला हवा, बोलीभूगोल अभ्यास वाढला पाहिजे, नवतंत्रज्ञानाचा वापर करून बोलीतील सगळे बारकावे, शब्द, भाषा, नामे यांचे रक्षण व्हायला हवे... याप्रकारचे यत्न जगभर सुरू आहेत. डॉ. गणेश देवी, अरुण जाखडे यांच्या भारतीय भाषा सर्वेक्षण या महाप्रकल्पाची योजना या दृष्टीने श्रेष्ठ व मौलिक मानावी लागेल. डॉ. द. ता. भोसले, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. विठ्ठल वाघ, डॉ. रावसाहेब काळे, डॉ. केशव सखाराम देशमुख, डॉ. श्रीकृष्ण काकडे, डॉ. काशिनाथ बऱ्हाटे, डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी बोलीभूगोलाच्या संशोधन/अभ्यासामध्ये केलेले काम नजरेआड करता येणार नाही. 'भाषा आणि जीवन' यासारख्या बोलीभाषेच्या खोल संशोधनाला वाहिलेल्या त्रैमासिकाची कामगिरी अर्थातच भावचिंतन खूप पुढे घेऊन जाणारी व ऐतिहासिक प्रतिष्ठेचीच कामगिरी आहे. 'फडकी'सारखे नियतकालिक किंवा 'हाकारा', 'ढोल' यांसारख्या महत्त्वाच्या पत्रिका आदिवासी समाज-संस्कृती-भूगोल-बोली यासंदर्भात जे प्राणपणाने कार्य करतात त्यांचीही नोंद वर्तमान एकूण साहित्य-संस्कृतीने घेतली पाहिजे.

'शब्दांच्या मरणाची कारणमीमांसा' करणे हा लेखाचा मुख्य गाभा आणि प्रधान

हेतू! आजोबाआजींचे शब्दधन किंवा आणखी जरा मागे जाऊन जुन्या पिढीचे शब्दधन मरणपंथाजवळ जाते आहे. ही भीती आपण नीट समजून घ्यायला हवी. 'माझ्या आईवडिलांची/माझ्या गावमातीची/माझ्या शिवारशेतांची/परंपरेची देणगी ठरलेली/पन्नास वर्षांतली 'बोलभाषा' आणि तिच्यातील शब्दधन प्रचंड वेगाने संपण्याची भीती आहे. आपण बोलींचे याप्रकारचे हजारो खंड तयार करायला घेतले नाही अथवा नवीन तंत्रज्ञानाच्या साह्याने बोलीधन जतन करू शकलो नाही तर बोलीभाषा जतन करण्यासंबंधीची प्रचंड मोठी सामाजिक-सांस्कृतिक झळ पोहोचल्याशिवाय राहणार नाही. धोक्याची ही घंटा वेळीच आपण समजून घेतलीच पाहिजे. तरच बोली आणि त्यातील धनाचा हंडा सांभाळता येऊ शकणार आहे.

आमचे अभ्यासक्रम बोलीभाषेत तयार व्हायला हवेत. सरकारी-निमसरकारी कारभारात जनतेच्या जिभेवरच्या भाषेला जागा द्यायला हवी. ज्यामुळे, बोलीचा वापर वाढेल. जनतेचा सहभाग यांत प्रचंड वाढेल आणि उत्साहात/आनंदात सामाजिक स्वरूपाची सामीलकी शंभर टक्के वाढेल. मात्र, मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कुणी? इथे सगळे अडते आहे! बोलीतील किती किती संख्येतील ''शब्दांचे धन'' आपण सहजरीत्या गमावून बसतो आहोत; याबद्दल आपल्या ज्ञान-शिक्षण-साहित्यपरंपरेने अधिक सजग होण्याची निकड आहे. भाषासंशोधकांची संख्या समाजात अनेक पटींनी वाढायला हवी, की ज्यामुळे भाषाबोलीच्या संवर्धनाची मोहीम भव्य आकार घेऊ शकेल. थांबू नये, हे व्हायला हवे. जी बोली गावंढळ समजली जाई. शहरी वर्ग जी भाषा कोणी बोलताना/ती ऐकताना हसायचा; जी बोली आम्हाला कळत नाही असा गहजब कोणे एकेकाळी केला जायचा; ती बोली बहुप्रदेश/बहुसमाज/बहुसंस्कृती/बहुभाव घेऊन आज साहित्यात 'सन्मानपूर्वक बोली' म्हणून स्थिर झाली. प्र. ई. सोनकांबळे, दया पवार, अचलखांब किंवा १९७० नंतरच्या तमाम आत्मकथनांनी बोलीभाषेचे सांस्कृतिक सौंदर्य शिखरस्थानी नेले! पुरुषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, आनंद यादव, रा. रं. बोराडे, महादेव मोरे, भास्कर चंदनशिव, सखा कलाल, द. ता. भोसले, सदानंद देशमुख, भारत काळे, विष्णू सूर्या वाघ, वाहारू सोनावणे, उषाकिरण आत्राम, भुजंग मेश्राम, कुसुम आलाप, अजीम राही, राम निकम, आसाराम लोमटे, अशोक कोळी, राजकुमार तांगडे असे पाचशेपेक्षा अधिक नवेजुने लेखक बोली-भूगोल-भाषा यांना धरून श्रेष्ठ साहित्यसाधना करतात. बोलीचा विचार करताना हा मुद्दा ध्यानात घ्यायला हवा. शिवारात कायम दिसणारी बैलगाडी किंवा औतफाटा यांच्याभोवती 'शब्दांची दौलत' जी एक होती ती शेतीच्या आधुनिकीकरणात जणू मेली/संपली. डोमाळे, खुटले, वंगण, कासरा, येसन, जू, सांटा, बिंडा, धांव, मठाठे, धुरे, पुरानी, धांद, चाव्हर, शिवळा, बेलड्या, बिरडं,

पायखुटी, दडपा, सेव, धुरजड, चाबूक, कुसा, जूपन, धांद, वारती, करळ, इळ्ळत, पास, रुमणे, आडतास, मुचके, रानसावडी : ह्या वस्तू आणि त्या वस्तूंच्या भोवती बोली–शब्दधन होते; ते आज मालवत जाऊ पाहात आहे. बोलीतील शब्दधनाचा उद्याचा भरवसा देता येऊ नये अशी भीती आज वाटते आहे. मराठवाड्यात घरोघरी काही वस्तू होत्या त्या भंगारात जाऊ पाहात आहेत. सुखदु:खे होती; त्याची अभिव्यक्ती विशिष्ट भाषेतून व्हायची किंवा खाद्यपदार्थ होते / ते आता 'गावमातीवर पेटणाऱ्या चुलींवर दिसत नाहीत.' जसे : सुगडे, माथन, मोरवं, बुटलं, डेरा, उतरंड, बिनगी, रांजोन ह्या खापरप्रधान वस्तू व ती भाषा धातूंच्या भांड्यांनी घरांत घुसखोरी केल्याने आणि वाढत्या सुविधांमुळे वजाबाकीत गेल्या. रडणे आणि पाणी पिणे ढसाढसा होते. ती भाषा आज दिसत नाही. सर्दीचा गावविश्वात भोंबारा झालेला असतो. मळमळ होऊ लागली, की गावाकडे त्याला हुल्या देणे म्हटले जाई/जाते. डोक्यातील केसांत जखमांना खवडे म्हणतात. नाकातून रक्त आले की तो घोळाना फुटतो. शिवाय हरभऱ्याची कोवळी भाजी कुटून–वाटून खातात तेव्हा त्यालापण घोळानाच म्हणतात. दुष्ट प्रवृत्तीसाठी खतेस हा खास शब्द गावभाषेत वापरला जातो तर शेतांत मोकाट जनावरांचा त्रास झाला की अशी जनावरे दंड लावून कोंडून टाकली जातात; त्या कोंडलेल्या जागेला गजेघाट असा सुंदर शब्द गावाने योजला आहे. आज हे पार बदलले असून सुधारणेच्या नावाखाली बोलीतील भाषाधन जणू एखाद्या रोडरोलरखाली चेंगरून जाऊ पाहात आहे. हे सगळे वाचले पाहिजे/जतन झाले पाहिजे.

तीस वर्षांपूर्वी मराठवाड्यात हिंगोली जिल्हा असलेल्या 'तुप्पा' नावाच्या गावात आणि भोवतालच्या पन्नास गावांत घराघरात लाभडे, अळन, खरडखिस, धिल्डे, एसोर, वळवट, उसऱ्या, शेंगोळे, धापाटे, दिंडे, सरगुंडे, बोटवे, खारोड्या, मुटकुळे, निवदं, बेलडीच्या भाकरी : असे किती किती गोड–आंबट–तिखट–खारट चवींनी व्यापलेले पदार्थ सतत होत. या चवी अजून जिभेवर आहेत, मात्र ते पदार्थ/शब्द आज हद्दपार होऊन बसले आहेत. कारण, नव्या पिढीला यांचे नसलेले अप्रूप आणि आधुनिकतेचा वरवंटा! सडका आणि हायवे यांच्या सर्व बाजूंनी ढाब्यांची झालेली गर्दी आणि शहरांमधील विविध प्रकारच्या उपाहारगृहांनी लोकांची हिरावलेली जीभ आणि चव यामुळे ''घरांतलं ते परंपरेचं रुचकर खाणं' संपले. सोबत पदार्थ व भाषापण संपली. हे सगळं अवघड व अस्वस्थ करणारे म्हटले पाहिजे. आपली परंपरा आणि भाषिकसंपदा जतन तर व्हायलाच हवी!

आपल्या एकूणच भाषेला आयाम मिळवून देणारी बोलभाषा केवढी रसरशीत आहे आणि तिच्यातील शब्दांचे अपूर्व अशा स्वरूपाचे 'धन' किती आणि केवढे!


हा सगळा प्रकार म्हणजे समुद्र उपसत राहावा आणि तो कधीच संपू नये असा. गावमाती-शिवारशेती यांना व्यापून असणारे किती नवे अप्रतिम शब्द आहेत जे आपण हळूहळू गमावून बसतो आहोत. त्यांतील काही लक्षणीय शब्दसंपदा वाचनार्थ मुद्दामहून द्यायचा मोह होत आहे. वाचा व लक्षात ठेवा. जसे : वाघाटं, बोंडं, गांडधामनं, रानकामुन्या, बिब्बे, पाटा, करटुले, धावड्या, बरबटी, टहाळ, पाड ही शिवारफळं आणि भाषा आता दुर्मिळामध्ये गणली जाऊ लागली. सराटा, काठोट, चाटू, थाटली, तवली, गुंडी, वत्तोल, कण्या, घुगऱ्या, भगोनं, भल्डा, अंबील, बुडगं, दुधानं, उल्हं हे रोजचे स्वयंपाकघरातील वस्तुपदार्थ आज घरात असतीलच अशी खात्री देता येत नाही. कारण नवे संसार उभे राहिले. त्याबरोबर नवी सुखे पण आली. खिशात पैसा अधिक वाजू लागला आणि जुने ते सोने कशासाठी, ही मानसिकता बळावली. म्हणून वस्तू-बोली-शब्द-नाव-चवी सगळे गेले. बुडाले! भाषेला बसलेली ही झळ प्रचंड मोठी आहे.

ह्या श्रेष्ठ ग्रामसंस्कृतीमध्ये : शिकवणे हे लखवणे होते. वळवणे हे कलवणे होते. आहेत म्हणताना हातं म्हटले जाते. पलीकडेऐवजी पलीकून, अलीकडेऐवजी अलीकून, पुष्कळऐवजी माकूल, इकडेतिकडेऐवजी इकूनतिकून! हा गोडवा आणि ही भाषिक मजा बोलीबिगर कुठेच सापडणार नाही. किंवा हे पाहा : उष्टे अन्न याऐवजी भंद, गल्लीऐवजी येटाळ, जागे राहाणेऐवजी चेती राहाणे, चिखलाऐवजी बेदांड, संकट याऐवजी दाडगत, अगदी सहजऐवजी सबागती, श्रीमंत माणूस याऐवजी दस्तक्या, पळवणेऐवजी खेदाडणे, अजिबातऐवजी कत्तई, सावकाशऐवजी वजंवजं, ही शब्दसंपदा गावमाणसांच्या जिभेवर चोवीस तास मध होऊन गोड झालेली असते. ग्रामसंस्कृतीमधील भाजीपाला शहरांप्रमाणे नसतो. उलट या भाजीपाल्याला भाषिक सौंदर्य आणि बोलीचा खास असा लहेजा प्राप्त झालेला असतो. उदाहरणार्थ, भोईमूंग, आल्लू, कलांगडू, धावडी, तमाटे, संबार, बरबटी, बोंडं, वाळकं, शेन्न्या, कऱ्हाळू, जांब, गांजरताळू, कुरडू, घोळ, तरोठा, हाब्रीट, गुंजावळी, नवे शब्दरूप घेऊन आलेल्या भाज्याफळे स्वतंत्र शिवारमातीचा मृद्‌गंध अधोरेखित करतात. शहरातील भाजीपाला हिंदी-इंग्रजी भाषेचा अंगरखा घालून त्या नावाने विकला जातो. गावभाजीपाल्याला इंग्रजी भाषा अजून जडलेली नाही. गावमातीत सर्पदंश होत नाही. तिथे 'पान लागते.' त्रास दिला जात नाही. त्याऐवजी 'खबाळले' जाते. वाया जाण्याला 'जानोडा' यासारखा गोड शब्द तिथे आहे. जादुटोणाऐवजी 'बाहेरबांधं' यासारखा शब्द भाषेची लज्जत स्पष्ट करतो. दुष्ट व्यक्ती 'कुचिंद' तर चटणी होते 'भुर्की'. दिवसाला म्हणतात 'इळ'. गवताचा ढीग म्हणजे 'गंजी' आणि कडब्याचा ढीग म्हणजे 'सुडी'. कुठंवर/इथंवर म्हणजे कोठरोक/इथरोक! यातला गोडवा व प्रवाहीपणा फार प्रभावी... पाळीव

प्राणिविश्व आणि त्या अनुरोधाने बोलभाषेतील शब्दघटण खास ग्रामसंस्कृतीची/मराठवाडी दर्शन घडवणारीच! जसे : म्हशीचे स्त्रीलिंगी पिल्लू म्हणजे 'वघार' तर पुल्लिंगी पिल्लू 'हालगट'. छोटी गाय म्हणजे 'कारहोड' म्हशीला 'डोबाड'. शेळीचे स्त्रीलिंगी पिल्लू म्हणजे 'पाठ'. शेळ्या हाकताना थीरथीर म्हणायचे. तर कुत्रा हाकलताना हाडहाड. कोंबड्यांना दाणे टाकताना आतीतीती-आतीतीती म्हणून हाक घालायची. बैलांना चल म्हणताना दी-दी-दी-दी-दी- अशा एकाक्षरी संबोधनाचा उपयोग करावयाचा.

हे शब्दांचे 'मरण' दिवसेंदिवस वाढत आहेत. शेती बदलून गेली. गावे बदलली. माणसांत बदल. जगण्यात बदल. सुखांत बदल. सुविधांत बदल. जुनी घरे मोडली. सिमेंट घेऊन नवी घरे बदलली. घरोघरी मातीच्या चुली ही म्हण समजून घ्यायलापण कठीण! इतका झाला बदल. गावाचे खाणेपिणे आणि त्यासोबत एक भाषागुच्छ होता; तो जसाच्या तसा आता उरलेला नाही. शेतीचे तेच. कष्ट/अवजारे बदलली. भाषा गेली. नवी भाषा आली. सण-वार बदलले. स्वयंपाक बदलला. तेथील कितीक वस्तू समृद्ध अडगळ होऊन निघून गेल्या. माणूसजगत, प्राणिजगत, सृष्टिजगत, समाजजगत यांत क्रांतिकारक बदल झाले हे छानच झाले. पण, या सर्वांना कवेत घेणारी 'भाषासंस्कृती' मात्र बदलली/बाजूला गेली/मालवली... खरी अस्वस्थ करणारी गोष्ट इथे आहे!

**– डॉ. केशव सखाराम देशमुख**
भ्रमणध्वनी : ९४२२७२१६३१
(प्राध्यापक व प्रमुख, मराठी विभाग
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड)



# पावसाळी पहाटवाट

## नीती मेहेंदळे

**रात्रीचा** शेवटचा प्रहर आपल्या झोपेतच उजाडलेला असतो पण पावसाच्या चाहुली सरळसरळ आग्रही निद्राभंग करतात. अशा पहाटेच्या निवांत वेळा अनुभवायला थोडं धाडस आणि भरपूर कुतूहल गोळा करून निघायचं थोडी अनोखी सैर करायला.

पहाट होताना बरीचशी रात्र तिनं स्वतःच आवरून ठेवलेली असते. हवेत कोंदलेला मंद गारवा सुटा होत पाय मोकळे करायला येतो. बाकी सगळं स्तब्ध जवळजवळ. कसलीतरी अपेक्षित वाट पाहत असावेत बहुधा. चांदणं जागरणानं तारवटून नुकतंच निजायला गेलेलं. त्याची थोडी प्रभावलयं मागे रेंगाळलेली पुरेशी होतात मला फिरताना. नक्षत्रांचे दिवेपण मंद होत आलेले असतात. पक्षी कूजनासाठी रियाज करत असावेत आपापल्या घरात. रांगती बाळबोध शीळ कानांवर पडते एखाद्या झाडाजवळून जाता जाता. आपणही नक्कल करून बघतो लगेच स्वाभाविक. प्राणी त्यामानानं जरा आळशीच. गाढ झोपलेले दिसतात ओसरीजवळ. रस्त्यावर. पांघरूण डोक्यावर ओढून सोंगेचं झोपणारी माणसं आठवतात मला.

गाताना एकाएकी अनपेक्षित वळण यावं तशी एव्हाना वाऱ्याची मंद शीतल असलेली लहर मधेच आक्रमक होऊ बघते. थोडा धसमुसळा होत डोक्यावरचा ढगही वाजू लागतो काळोखातली अदृश्य गाणी म्हणत. 'बरखा बहार आयी' आठवतं अशा वेळी अगदी. काळोखाचं भय विसरायला लावणारा तो पाऊस आणि सुरांतालांवर मोकळा नि एकरूप होत गेलेला तो निसर्गदेव. खरंच बहार ही! पावसानं येणारी बहार. बहारों का मौसम म्हणतात तो हाच. भरातला ऋतू. आपण तर यावरही खुश. पण खरा खेळाडू अजून पटांगणात उतरायचा असतो.

अशीच कुठनं कशी सरसरत एखादी पावसाची लकेर येते. आणि सगळी असोशी यासाठी होती हे उमजून मी उगीच ओशाळते. गप्प झाडं सचेतन होऊन मिळेल तसा–तितका वारा घुमवून घेतात अंगात. डोल डोल डुलून घेतात. जागच्या जागी थिरकत राहणं त्यांचं कथकनृत्यच. एकतानतेनं पानं लगेच सचैल न्हाऊन घेतात.

उमलायची घाई झालेली अनंताची काही चुकार फुलं ओलेती तशीच ठिबकत राहतात. त्यांचा गंध मातीत मिसळायच्या आधी वर्दी लागते पिसाटलेल्या वाऱ्याला आणि अवघा आसमंत परिमळत राहतो काही काळ. मिळेल तितकं जलधन अधाश्यासारखं पिऊन घेणारी चातकी वृत्तीची माती मात्र वर्षावृत्तीला शरण जाते अखेर. विटांच्या सापटीतून नजर चुकवून ही लाल माती संगनमत करते या आवडत्या सोबत्याशी आणि स्वत्व बहाल करत निघते कुंपण सोडून मुक्त वाहावत. वाहावणं आवडतं तिचं पण काळजी वाटते. हात धरून पळून जायची. पायाशी तिचे नाजूक लाल ओहळ लाडीगोडी लावत येतात ते उगाच नाहीत.

अंगणापासून डाव्या बाजूला लहान शहाबादी फरश्यांची शिस्त असते. चिकटून एकामागे एक लावलेल्या. ही जागा एकदम फरसबंद. शेजारच्या घराच्या भिंतीवर सहज पाहते मी एका फरशीवर उभं राहून आणि त्या भिंतीवर परवानगी न घेता फूटभर वाढलेला मत्त पिंपळपण पावसाची झड अंगावर घेताना दिसतो. मातीत असता तर इतकं वाटलं नसतं तेवढं भय चाटून जातं मनाला, आता हा पोखरायचा या भिंतीला. कुणीतरी एखादी बेपर्वा फेकलेली बी रुजून आलेली दिसते. स्वयंपाकाच्या खोलीमागे रुजलेली ही दुर्लक्षित कारल्याची वेल ठेचकाळत, पडत-सावरत काकुळतीला आल्यासारखी आणि खडकांना लपेटून सांभाळत असते आपलं इवलंसं अस्तित्व. तिचीही काळजी वाटते. एक मात्र नक्की, जो तो आपलं असेल तसं जगायचा प्रयत्न करत असतो अटोकाट, तेही पूर्ण जीव ओतून. नव्हे पणाला लावून. पावसाच्या कलाकलानं जगून बघत असावेत सगळे हिरवे सोबती. काल-परवा खोचून पेरलेल्या एका जाडसर बीचा कोंब मान खाली घातलेला अजूनतरी तसाच पाऊस जाणवून घेत असावा. उद्या हाच ताठ मानेनं टवटवीत होऊन जगायला शिकेल. एक नवं आयुष्य उमलेल.

आणि आयुष्य उमलताना कुणालाही एक गाणं लागू होतंच. पण पहाटेच्या अशा पावसाची गाणी मात्र निराळी असावीत बहुधा.

झाडं हिरवी वेल हिरवी
थेंब कोवळं सुख मिरवी

अशी काहीशी. साधीसोपी. गुणगुणता येतीलशी. मनात तरतरी जागवणारी.

डोळ्यांत साचेल तितकं भरून घेत मी पुढे चालत राहते तन्मयतेनं. भिंतीशी घट्ट वीण बांधून उभा चौकोनी फिरकीचा नळ आता भाव मिळत नसल्यासारखा बिच्चारा दिसतोय. अचानक काम नाही म्हणून आपण पाठ फिरवल्यासारखा केविलवाणा. वर लटकवलेले पाण्याचा पाईप आणि झारी दोन महिन्यांच्या सक्तीच्या रजेवर जायचं म्हणून हिरमुसलेत. नाजूक झारीतून अमृत प्यायची सवय लागलेली झाडं रांगड्या

पावसाच्या नादात आपलं तळं करून घेतात, पण म्हणतात ना प्रेमात सगळं माफ असतं. प्रेम अतोनात येतं ओघानं आणि धबधबे ओसरले की झाडं जिरवत राहतात ते प्रेम मुळाशी बघत निमूट.

आठवणींचं असंच तळं होतं कधी कधी. मनात फतकल मारून बसतं. त्यात डुंबण्याशिवाय पर्याय नसतो मग. पहाटे जाग यावी तीच मुळात पावसाच्या अस्तित्वानं. पण ते दिवस घरात राहून पाऊस उपभोगायचे नसायचे. लवकर उठून गाड्या गाठा, कचेऱ्या गाठा, मुलांचं दिवसभराचं करून जा, डबेडुबे, तांदूळ, साखर, तेलातुपात नि पिठामिठात गुंतलेले दिवस ते. सकाळपासून असा कास धरून राहिलेला पाऊस म्हणजे डोळ्यांपुढे पहिला यायचा तो नको वाटणारा चिखलामाखलातला लडबडलेला प्रवास. धबधबे शोधत डोंगरदऱ्यांत रमावंसं वाटे, पण कचेरीत नेमकं महत्त्वाचं काम माझ्या नावावर नेमलेलं असे. कचेऱ्यांमधे पोहोचता पोहोचता चिंबलेले कपडे तिथल्या वॉशरूमच्या ड्रायरसमोर सुकवताना डोळे तृप्त करणारे हिरवेगार झालेले पर्वत, घाट आठवायचे. किल्ल्यांची निशाणं फडकताना आठवायची नि मन बंड करून उठायचं. कधीतरी तीव्रच बंडखोर व्हायचं. सगळीकडून कोंडी असायची. इथेही हवे आहोत नि तिथेही. मग हाकत असलेली गाडी नजरानजर करून परत फिरवायचो. खरं तर जायला हवं पण नाही पोचू शकत म्हणायचो. म्हणतात ना when you can not get out of situation, enjoy the situation! शब्दशः जीव भांड्यात वगैरे पडायचा. पाऊस, आता दडपण न होता रम्य सुखावह वाटू लागायचा. हा खरा पाऊस! मला हवा असलेला. निवांत क्षण देणारा. त्याचं ऐकावं लागायचं असं क्वचित. पण खरंच. ऐकावं असं अधूनमधून. जिवाला काय हवं असतं आणखी! पोपटी पालव्या, गोजिरवाणी पाती, आता होता डोळ्यांदेखत आसुसलेल्या जमिनीत झिरपणारा भूतकाळ, थेंबात सांडून जाणारं ताजं वर्तमान आणि. आणि काय! भविष्य? हट्! त्याची फिकीर कोण करतो! इतक्या छान वर्तमानातून चांगलंच तर उगवणार आहे. मग चिंता का करू? मन असं निवांत करायला लागतो हा पाऊस. ही त्याची मला मिळालेली आयुष्यभराची निरपेक्ष भेट आहे. इतक्या जवळ असलेल्या या पावसानं मनात काही कमी तांडवं केली नाहीत. त्याचा जोर वाढला की अजूनही सैरभैर होते मी. अशा वेळी त्याच्यापासून विभक्त होत दुरून निरखायला पण तेवढंच आवडतं मला.

खूपच जोराची सर आली की जरा जिन्यात शिरायचं. आडोशाला पायरीच्या तळाशी उभं राहिलं की सत्तर वर्षं चढउतार भोगलेला जिना ओढाळ बोलावतो. काही जिने बघताक्षणी आपलेसे होतात. त्यांच्या पायऱ्या अजिबात टोकदार नसतात. कठड्यांच्या घसरगुंड्या आणि पायऱ्यांच्या बसकणी ही लहान लेकरांची मक्तेदारी. खूप बालपण उपभोगलेलं असलं की असा लाघवी होतो जिना. पाऊस बघत जरा

बसते मग मी त्या मऊशार, जुन्या गंधाच्या जिन्याच्या दुसऱ्या तिसऱ्या पायरीवर. म्हणता म्हणता पाऊस चांगलीच हजेरी लावतोय आता. आडोशातल्या मोजक्या कुंड्यापण जमेल तितका शिडकावा घेतातच. पाऊस कोणत्याच सजीवाला वर्ज्य नसतो हेच खरं.

पावसाला एक अखंड नाद असतो. ज्ञानेश्वर म्हणतात तसा अनाहत. व्यापक जगात भरून राहिलेला. अनेक असतात असे अनाहत नाद. सूक्ष्म. शांत, चिंतनमग्न अवस्थेत कधी कधी जाणवतात. संवेदनक्षम माणसाला समजतात ते बरोबर. अशा पावसात अशा नादात समाधीच लागते. चालता चालता सुद्धा. संततधार म्हणतो मग आपण तिला. अचानक पावसाचा नाद आवरता होतो तशी मी बाहेर येऊन बघते. ती संततधार होती इथेच घुटमळत. आता विश्रांतीसाठी थांबली असावी. '.... बरसात आहे लांबलेली' जरा दीर्घच लांबलेलं गाणं मजा आणतं. वसंतराव आर्त पोचतात आतपर्यंत. अगदी आताही भिजतो आपण. खिडकीतून बाहेर हिरव्यागार नजरेनं शोधते पावसातल्या ओल्या विश्वाला.

नारळाची खोडं आता चांगली न्हाऊन माखून चकाकताहेत.

त्याच्या पायतळी एक तान्हं पोपटी रोप लुकलुक बघताना तग धरून दिसतंय आता. बिचारं.

पाणी मातीत झिरपायची वाट बघत असावं. खालीच बघतंय. गंमत वाटते मला त्याची. रेनकोट हवा होता ना. कुडकुडत असेल का?

लहानपणी 'सांग न आई' कविता होती मला दुसरीत.

दिवसभर पावसात असून, सांग न आई?

झाडाला खोकला कसा होतच नाही!...

तसंच सूक्ष्म चष्मा घालून बघितलं की असं जाणवतं काही काही.

मोठं झाड एखादं मोठंसं पान टाकतं मग खाली. आवाजही न करता मदत येते. फलक न लावता. आवाहनं न करता. मग हे छोटं बाळरोप त्यात स्वेटरमध्ये शिरावं तसं कसंतरी पांघरून घेतंय ते स्वत:ला. आज झावळी न पडो अन् नारळ तर नाहीच नाही. एका तान्ह्या बाळाच्या जिवाचा प्रश्न... अशी इवली इवली बाळं न्याहाळायला पुन्हा मी पावसाच्या कुशीत शिरते.

नारळाच्या मागे भिंतीला बिळं दिसतात कधीतरी. चरकवणारी! एक बुजवलं की दुसरं तयार. एकदा साप निघाला होता म्हणे पावसाच्या दिवसांत. आणि त्याच्या वावरानं बिथरलेल्या साळुंक्या अशा वेळेस एकमेकींना सावध करायला अवेळी ओरडू लागतात. हे आठवलं आणि मी बारीक निरखत चालू लागते थोडी धास्तावत. अशाच बारीक नजरेनं बघता बघता एकदा एका झाडाशी स्तब्ध गोगलगाय दिसली होती. पावसाच्या आगमनाबरोबर आगंतुक येणारी ही जीवसृष्टी. ती स्तब्ध नसेलही कदाचित.

पण तिचा आविर्भाव वर्षानुवर्षं अशीच थिजून असल्यासारखा होता. माझ्या आठवणीप्रमाणे मंद चालीची परिसीमा असलेला हा लहानगा प्राणी. अशी शिकवण देणारी ती शाळकरी वयात शिकलेली गोष्ट आठवली. आपल्या लेकीच्या बाळंतपणाला तयारी करून निघालेली हिची स्वारी पार तिच्या बाळाच्या बारशाला डेरेदाखल होते. धास्तावलेल्या गोगलगायीला 'या गोगलबाई, आलात! पण लेकीच्या बाळाच्या बारशाला पोचलात' हे ऐकून किती जीव अर्धमेला झाला असेल नाही! मात्र मला वाटतं, तिच्या चालीनं रमतगमत नीट निरीक्षण करत चालण्यात पण मौज असेल. एरवी आयुष्यात आपण अनाठायी धावतपळत असताना गाळतो काही दृश्यं, तीही आवर्जून बघावीत असं पारलौकिक तर सुचवायचं नसेल तिला? गोगलगायीमागे मन मात्र किती वेगात पळून आलं. तिच्यामागे एक मोठाली कुंडी मिरचीची नवी तरातरा वाढणारी रोपं सांभाळत बसलेली दिसतेय आणि तिच्या मागे एक बेडूक तिन्ही त्रिकाळ दडलेला असतो तो मला चांगलाच ओळखीचा आहे. साफसफाई करताना गमतीत जरी कुंडी हलवली की तो बिचारा निराधार पळू लागतो इकडेतिकडे. अशा अचानक आलेल्या पावसाची पण नोंद त्याच्यापाशी असते आणि तो ओरडून सांगतोही. आपण नेहमीच कुठे घेतो त्याच्या वेधशाळेची दखल! खरं तर या निसर्गनिर्मित वेधशाळाच खऱ्या पारंपरिक आणि अजूनही तितक्याच ताकदीनं कार्यरत असलेल्या. कधीही ऐनवेळी सुट्टी ना घेणारे हे कर्मचारी आणि अचूक अंदाज बांधणारी त्यांची वेळापत्रकं कशी काय त्यांच्या डोक्यात फिट्ट असतात, नवलच आहे!

एरवी सायन्सच्या प्रात्यक्षिकांमध्ये कापावा लागलेला लिबलिबीत श्लेषमल स्पर्शाचा बेडूक आठवूनही नकोसा वाटतो. सतत क्लोरोफॉर्ममधून टणकन उडून बसेल अशी धाकधूक वाटत राहायची त्याची. असा पावसाळी वातावरणात उगाच इकडून इकडेतिकडे करणारा, वटारलेल्या डोळ्यांचा बेडूकसुद्धा सुसह्य होतो हेपण त्या पावसाचंच कौतुक बरं. पावसाळी दिवसांत अंधाऱ्या वाटेवर चालत असताना पायाला काही संवेदना होते. काय असेल? अगं बेडूक असेल एखादा. हे ऐकून निर्धास्त होण्यात त्या बिचाऱ्या जिवाचे किती आभार मानू अन् किती नको असं होतं. पिवळ्या पेट्रोमॅक्सच्या उजेडात एखाद्या बेडकाला न्याहाळावं. एखादा उंच दगड पकडून त्यावर स्वारी सावध बसलेली दिसते. त्याच्या बुळबुळीत शेवाळी रंगाच्या पाठीवर काही नक्षीरेषा पाहिल्याचं आठवतं. काठीनं थोडं हाकलू जावं, तर तो ती जगप्रसिद्ध बेडूकउडी मारत कशातरी मागे लपायच्या गडबडीत दिसतो. त्याचा फारसा असा त्रास नाही म्हणून त्याला उगाच मारावं, हाकलावंही नाही वाटत. राही ना का त्या कुंडीमागे. कायमचा. पावसाचे हे सगळे वाटेकरीच नाहीत का? सणसणीत पावसाच्या माऱ्यात कुठे बरं जात असतील हे सगळे! त्यांच्याही काही सुरक्षित जागा असतीलच. आपल्यासारख्या. एखादं छोटं घर, बीळ, बोगदा, गुहा, घरटं; काहीतरी असणारच.

आणि ते असतंही. आपल्याला उन्हाच्या तल्खलीनं वैतागून वाटतं चांगली जोरदार एक सर यावी नि सगळं थंड व्हावं. पण या छोट्या विश्वात त्या अचानक आलेल्या सरीनं किती खळबळ उडत असेल त्याची कल्पना करून पाहावी. कुणी घर बांधायला घेतलं असेल. कुणी डागडुजी करत असेल. वेळेची गणितं कधीच न समजलेल्या अबोध गोगलगायी पोटात पाय घेऊन निवांत असतील. कुणी मुलांना तरंगायला शिकवत असेल तर कुणी उडायला. घर उघड्यावर टाकून कुणी बाळांसाठी जेवण म्हणून शिकारीला बाहेर पडलं असेल. आश्चर्याचा भाग हा की आपल्याला वाटतं तसं सगळंच गाफील नसतं जग. थोडं व्यवस्थापन प्राणिविश्वातही असणारच. नाहीतर नेमाच्या किंवा अवेळीच्या पावसाच्या झडींनी कधीच ही जीवसृष्टी नष्ट झाली असती.

म्हणून बिनधास्त अशा बरसाती याव्यात, पाचोळा उडवत वर्दी देत येणाऱ्या. मी तर म्हणते, सरीवर सरी याव्यात आणि हा चिंब झिम्मा, जीव आणि जीवनाचा आयुष्य रमवणारा खेळ होऊन राहावा. जागतेपणी एखादं पहाटस्वप्न पडावं आणि एखाद्या रेशमी धक्क्यानं जाग यावी तशी पागोळ्यांचं संगीत थांबून भानावर आले. बर्फाळ प्रदेशातही खिडकीबाहेर या पागोळ्या दिसायच्या. पण कशा? थिजलेल्या, गोठलेल्या. भराभर गोठणबिंदू गाठायची घाई झालेलं पावसाचं पाणी पागोळ्यांनाही लागू होतंच. गंमत म्हणजे एकेक थेंब आता पडेल इतकं गृहीत धरता येत नसे तिथे. तोसुद्धा क्षणार्धात गोठायला लागे. त्याला धरून पुढचे थेंबही शरण जात गोठवून घ्यायचे स्वतःला. आणि बघता बघता त्यांचे घट्ट थिजलेल्या धारेचे आकार तयार व्हायचे. मग खूप दिवस त्या तशाच राहायच्या संपूर्ण बर्फाळा मिरवत. वितळायचा ऋतू पैंजण वाजवत आला की त्या हळूहळू गळून पडायच्या. जोर टिकवून ठेवलेल्या आणि अखेर शरणागती पत्करणाऱ्या कुणा कणखर स्त्रीसारख्या. खिडकीतून आपण नुसतं साक्षीदार म्हणून हे असहाय्य बघत राहायचं. पण त्यात खिन्नता अजिबात नसायची. आश्चर्य असायचं. कुतूहल असायचं. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे निसर्गाला धक्का लावावासा वाटायचा नाही. सरी याव्यात पण अगदी ओघात, सहज. त्यांचं येणं जितकं स्वाभाविक स्वीकारलं जातं तसंच त्यांचं मंद होत नाहीसं होणंही.

आणि अशी ओघाओघानं आलेली सरपण ओसरतेच कधीतरी. 'पुन्हा येते', अशी ग्वाही देत पसार होते हुरहुर लावत. वाफ्यांमधे एव्हाना लहान लहान तळी झालेली असतात. आता बसतील सगळं प्रेमाचं पाणी जिरवत पुढची बरसात येईस्तोवर. ओहळांचं कौतुक वाढवत मऊ सुखद चिखल कधी होतो पायाशी कोण जाणे! आता हा आळता मिरवू थोडावेळ असाच. पावसावर आपलंपण प्रेम आहे आणि ते मी असं विसरू देत नाही...

**– नीती मेहेंदळे**

भ्रमणध्वनी : ९१३००३९२६३

# बरसन लागी बदरिया

## चित्रा वाघ

**गच्चीचं** दार उघडल्याबरोबर वाऱ्याची झुळूक सुखावून गेली. दोन्ही हात बाजूला पसरलेल्या त्याच स्थितीत डोळे बंद करून गायत्रीनं सर्वांगावर तो गारवा अनुभवला. लगेचच दरवाजा उघडा राहावा म्हणून ठेवलेला दगड पुढे सारून ती पुन्हा सासूबाईंना आणायला अर्धा जिना उतरून खाली गेली. एका हातात काठी आणि दुसरा हात कठड्यावर ठेवून त्या टेकून उभ्या होत्या. गायत्रीनं त्यांची काठी हातात घेतली आणि त्यांना धरून सावकाश पायऱ्या चढून वर आणलं. तिथल्या खुर्चीवर त्या मटकन बसल्या. तेवढा एक जिना चढायचेही त्यांना श्रम झाले होते. पण डी व्हिटॅमिन मिळायला हवं म्हणून सकाळच्या कोवळ्या उन्हात गायत्री रोज निदान अर्धा तास त्यांना इथे घेऊन येत होती. गच्ची छान लांब रुंद होती. त्या जागेत गायत्रीचा मॉर्निंग वॉकपण होत होता, मधूनच त्यांनाही ती आग्रहानं एखादी फेरी मारायला लावायची.

चार महिन्यांपूर्वी त्या घरातच अडखळून पडल्यामुळे बऱ्याच परस्वाधीन झाल्या होत्या. एकट्यानं चालण्याचा आत्मविश्वास गमावून बसल्या होत्या. घरातील इतर कोणाहीपेक्षा गायत्रीवरच त्यांची भिस्त असल्यानं तिच्याशिवाय त्यांचं पदोपदी अडत होतं.

''आई, तुम्ही बसा इथे थोडा वेळ! मी खाली जाते, पूर्वाचा डबा व्हायचाय अजून. आजपासून सुनंदा रजेवर आहे ना, पोळ्यासुद्धा मलाच करायच्या आहेत.''

''अग, मग आज आपण गच्चीवर नसतो आलो तर काय मोठं बिघडणार होतं?''

''नको, असं काही ना काही होतच राहणार. उगीच, तेवढ्यासाठी खंड नको पडायला. मी येते अर्ध्या तासात परत.''

गायत्री घाईघाईनं जिना उतरून खाली आली. नेमकी घराची किल्ली न्यायला आपण विसरलोय हे लक्षात आलं. बेल वाजवल्यावर 'किल्ली न्यायला काय होतं तुला? दाढी करता करता मध्येच यावं लागलं मला!' अशा तक्रारीच्या सुरातच परागनं दार उघडलं. त्याला उत्तर देण्याच्या भानगडीत न पडता तिनं फ्रिजमधून कणकेचा डबा,

खोबऱ्याचा डबा, मिरची-कोथिंबिरीची पिशवी हे सगळं बाहेर काढलं. मटकीच्या टोपलीवरचं झाकण काढलं. छान मोड आले होते. टोपली वर करून पाहिलं तर प्रत्येक छिद्रातून बाहेर पडलेल्या पांढऱ्या कोवळ्या मोडांचं लुसलुशीत गवत तयार झालं होतं. हाताला सुखावणाऱ्या त्या स्पर्शाचा तिनं एखादाच क्षण आनंद घेतला आणि ओट्याखालच्या ट्रॉलीमधून ताट बाहेर काढून भराभर मटकी निवडायला सुरुवात केली.

''मम्मा, मला आज जरा लवकर निघायचंय. वीस मिनिटांत होईल का डबा?'' पूर्वानं बेडरूममधूनच विचारलं.

''अग, आधीच नाही का सांगायचंस?'' प्रेशरपॅन गॅसवर चढवत गायत्रीनं विचारलं. काहीच उत्तर आलं नाही. ''बरं, देते. तुझी तयारी होत आली का? काय करतेयस? सॅलड चिरून घेशील का तुमच्या दोघांच्या डब्यासाठी? काकडी आणि गाजरं धुऊन ठेवली आहेत.''

''ए नाही हं मम्मा! मला आता काहीही सांगू नकोस. त्यापेक्षा मी डबाच नेत नाही.'' काहीशा वैतागानंच पूर्वा म्हणाली.

''गायत्री, प्लीज माझा चहा गरम करून दे ना, फोनवर बोलत होतो तेवढ्यात थंड झाला.''

परागनं सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीत वेळ काढलेला त्याला चालत नसे. विशेषत: सकाळी ऑफिसला जाण्याच्या गडबडीत! गायत्री पटकन डायनिंग टेबलवरचा कप घेऊन आली. बिस्किटांच्या डब्याचं उघडं झाकण लावलं आणि तोही स्वयंपाकघरातल्या शेल्फवर ठेवला. मायक्रोवेव्हमध्ये चहा गरम करून त्याला नेऊन दिला आणि पुन्हा कामाला लागली. नजर पुन्हा पुन्हा धावणाऱ्या घड्याळाकडे जात होती.

तयारी करून बापलेक डायनिंग टेबलवर येऊन बसले. पूर्वानं दोघांसाठी सफरचंद कापलं. पोळ्या करता करता मध्येच गॅस बारीक करून गायत्रीनं रात्री आठवणीनं भिजत घातलेले बदाम, मनुके आणि फ्रिजमधले अक्रोड प्लेटमध्ये काढून दिले.

''आज तू का पोळ्या करतेयस?'' मोबाइलवरची नजर न उचलता परागनं विचारलं.

''सुनंदाताई एक आठवडा रजेवर आहे आजपासून!'' पूर्वानं परस्परच उत्तर दिलं.

''असं म्हणाली तरी आहे, बघू कधी येते ते!'' दोघांचेही डबे घेऊन बाहेर येत गायत्री म्हणाली.

''रात्री साधंच कर मग काहीतरी. कढी-खिचडीही चालेल मला.'' पराग बॅग उचलत म्हणाला.

''शी, किती बोअरिंग! मम्मा, त्यापेक्षा ऑर्डर करूया काहीतरी.'' पूर्वाची अपेक्षित प्रतिक्रिया आली.

''रात्रीचं रात्री ठरवूया!'' गायत्रीनं विषय बंद केला आणि दोघांनाही निरोप दिला.

घराची किल्ली आणि मोबाईल हातात घेऊन ती गच्चीच्या पायऱ्या चढायला लागली. आठच वाजले होते. अजून ऊन चढलं नसणार... मोकळ्या हवेत गच्चीत बसून आरामात फोनवरचे मेसेजेस वाचावे अशा विचारानं ती वर पोहोचली. तिला पाहिल्याबरोबर सासूबाई म्हणाल्या, ''चल बाई, कंटाळा आला बसून बसून. खाली जाऊन जरा आडवी होते.''

नेहमीप्रमाणे आपलं मत न मांडता ती त्यांना घेऊन घरी आली. त्यांना त्यांच्या बेडपाशी सोडून आपल्या खोलीत यायला निघाली. वाटेत डायनिंग टेबलवरच्या प्लेटमध्ये उरलेल्या सफरचंदाच्या दोन फोडी उचलून घेतल्या. मोबाइलवर कॉलेजच्या ग्रुपच्या गप्पा रंगात आल्या होत्या. त्याच्यावर भरभर नजर फिरवत तिनं पर्सनल चॅटवरचे मेसेज पाहिले.

'ग्रुपवर रिस्पॉन्ड का नाही केलंस?'

'तुझ्या घराजवळच आहे थिएटर, गिरिजादेवींना ऐकायला मिळत नाही सहसा'

'यू शूडन्ट मिस धिस गोल्डन चान्स!'

'मी आणि माधवी जातोय. इतरही काही जण येताहेत.'

'इगतपुरीच्या ओव्हरनाईट पिकनिकलाही येत नाहियेस, ते एकवेळ मी समजू शकतो. पण दोन-तीन तासांच्या कार्यक्रमासाठी वेळ काढायला पाहिजेस तू!'

एकेका ओळीच्या या श्रीरंगच्या मेसेजांचा काहीच उलगडा होईना. तिनं ग्रुपचा चॅटबॉक्स उघडून  सावकाश वाचायला सुरुवात केली. एकानं त्याच्या आईच्या वाढदिवसानिमित्त संगीताचा कार्यक्रम ठेवला होता. दोन दिवसांपूर्वीच सर्वांना आमंत्रण दिलं होतं. पण गायत्रीच्या नजरेतून ते सुटलं होतं.

गिरिजादेवी म्हणजे श्रीरंगचं दैवत... खरं तर गायत्रीचंही. पण तिचा संगीताशी संबंध सुटल्यालासुद्धा बराच काळ लोटला होता. दिवाणखान्यातल्या कोपऱ्यातल्या गवसणी घातलेल्या तंबोऱ्यासारखंच आपलं गाणंही गुंडाळून ठेवलं होतं तिनं. आजची ही संधी सोडू नये असं तिलाही प्रकर्षानं वाटत होतं. संध्याकाळी सासूबाईंची फिजिओथेरपिस्टची अपॉइंटमेंट होती. पण तेवढी वेळ बदलून घेणं शक्य होतं.

'मलाही आवडेल यायला. ग्रुपवर कळवते तसं. मी साडेआठला येते थिएटरवर. भेटू!' तिनं श्रीरंगला मेसेज केला आणि उत्साहात यू ट्यूबवर गिरिजादेवींची 'बरसन लागी बदरिया' ही आवडीची बंदीश लावली. आवाज थोडा कमी वाटला म्हणून पूर्वाच्या खोलीतून ब्लू-टूथ स्पीकर शोधून काढले आणि यू ट्यूबला कनेक्ट केले. आता संपूर्ण घरात देवींचे स्वर्गीय स्वर घुमायला लागले. त्या स्वच्छ-निर्मळ सुरांनी सगळी मरगळ दूर जाऊन अवघा परिसर प्रसन्न झाल्याचा भास झाला गायत्रीला. आनंदी मनानं तिने रोजच्या कामाला सुरुवात केली.

पाचच मिनिटांत आईंची हाक आली... 'गायत्री, केवढा मोठा आवाज येतोय! जरा कमी कर ग. रात्रभर मला झोप लागली नव्हती, आता जरा डोळा लागतोय!'

काहीच न बोलता तिनं स्पीकर बंद केले आणि हातातलं काम सुरू ठेवलं. पण मन रमेना. शेवटी सगळं बाजूला ठेवून स्वयंपाकघरातून बाहेर पडली आणि इअरफोन्स लावून बंदीश ऐकत बाहेरच्या खोलीत सोफ्यावर बसून राहिली. गाणं रंगात येत असतानाच फोनची रिंगटोन वाजली.

पराग बोलत होता. ''हे बघ, आज संध्याकाळी माझी मुलाखत घ्यायला एक बाई येणार आहेत. त्यांना दोन तासांची वेळ हवी होती म्हणून मी त्यांना जेवूनच जायला सांगतोय.''

''अरे, पण आज रात्री मी...''

''ओह!.. तू कढी-खिचडी करणार होतीस ना... नो प्रॉब्लेम! जोडीला काहीतरी चांगलंसं कर. भरली वांगी, भाकरी वगैरे.. यु टेक द कॉल, दॅट्स युअर डिपार्टमेंट! आणि दुपारी सी.ए.कडे जाऊन डॉक्युमेंट आणायची आहेत, विसरू नकोस!''

आता बसून राहून चालणार नव्हतं. गायत्रीने इअरफोन्स काढून गुंडाळून जागेवर ठेवले. आणि मनोमन रात्रीचा मेनू ठरवायला सुरुवात केली. गिरिजादेवींचा कार्यक्रम चुकणार याची तिला अगदी रुखरुख लागली.

आपण येत नसल्याचं श्रीरंगला कळवण्यासाठी पुन्हा फोन हातात घेतला. तर पूर्वाचा मेसेज दिसला, 'मम्मूडी, आज लंचब्रेकमध्ये सगळ्यांना तुझ्या गूळपोळ्यांची आठवण आली. या संक्रांतीला पण आणशील का असं विचारताहेत सगळे! देशील ना?' तिच्या चेहऱ्यावर सूक्ष्म आठी उमटली. त्या मेसेजवर लगेच उत्तर द्यायचं तिनं टाळलं.

एकेक कामं उरकता उरकता संध्याकाळ झाली. आज रस्त्यावर विशेष ट्रॅफिक नसल्यानं परागची मुलाखत घ्यायला येणाऱ्या बाई वेळेच्या आधीच पोहोचल्या. गायत्रीनं त्यांचं मनापासून स्वागत केलं. ती पाणी आणायला आतमध्ये गेलेल्या वेळात त्या शोकेसजवळ गेल्या. 'उद्योग-श्री', 'उद्योग सन्मान' अशा ट्रॉफ्यांच्या मागे ठेवलेल्या संगीताच्या सन्मानचिन्हांकडेही त्यांचं लक्ष गेलं. नंतर बाजूच्याच बुकशेल्फपाशी त्या रेंगाळल्या. ''अरे वा, सरांना मूर्तिशास्त्रामध्येही रस आहे का?'' गायत्रीची चाहूल लागताच त्यांनी मागे वळून विचारलं.

''नाही, ती माझी पुस्तकं आहेत.''

''आणि तो तंबोरा? तुम्ही गाता का? ते पुरस्कार...'' त्यांनी कुतूहलानं विचारलं.

''हो, मी पूर्वी गायचे. संगीतातच पोस्ट ग्रॅजुएशन केलं आहे मी. यांची साधी नोकरी होती तेव्हा वेळ मिळायचा. पण आता बिझनेस वाढल्यापासून घरचा सगळा व्याप सांभाळावा लागतो ना, त्यामुळे त्या सगळ्या आवडी बाजूला ठेवल्या आहेत मी.''

पाण्याचा ग्लास त्या पाहुणीपुढे ठेवत गायत्री हसत म्हणाली.

थोड्या वेळानं पराग आल्यावर ती आतल्या खोलीत जेवणाचं बघायला गेली. मधूनमधून त्या दोघांचं बोलणं कानावर येत होतं. परागच्या शब्दाशब्दांत ठासून भरलेला अभिमान समोरच्यावर चटकन छाप पाडत असे. त्या बाईदेखील उत्साही होत्या. स्वत:चा छोटा व्यवसाय सांभाळून हौशी पत्रकारितादेखील करत असाव्या. बाकी अशा उद्योगविषयक मुलाखतींमधल्या ठरलेल्या प्रश्नोत्तरांची गायत्रीला एव्हाना सवय झाली होती. त्यांचं बोलणं सुरू असतानाच कोथिंबीरवडीची डिश आणि चहा घेऊन ती बाहेरच्या खोलीत गेली.

''ये गायत्री, ऐक जरा... या मॅडम बघ किती काय काय करतात ते!'' ''कमाल आहे हं खरोखर तुमची! स्वत:च्या आवडी छान सांभाळताय!' परागच्या चेहऱ्यावर त्या बाईंविषयीचं कौतुक ओसंडत होतं. औपचारिकता म्हणून गायत्री थोडा वेळ तिथेच बसली. पण मनात असंख्य विचार दाटून येत होते. ती उठून स्वयंपाकघरात आली. जेवणाची तयारी जवळजवळ झालीच होती, फक्त आयत्या वेळी गरम फुलके करायचे बाकी होते. विचार करतच तिनं पोळपाट-लाटणं ओट्यावर ठेवलं. पण तिचे हात थबकल्यासारखेच झाले होते. तसाच काही क्षण विचार करून ती बाजूला झाली, मनाचा निग्रह करून पूर्वाला फोन केला.

''मी माझ्या कॉलेजच्या ग्रुपबरोबर गाण्याच्या कार्यक्रमाला जातेय. येताना पोळीभाजी केंद्रातून दहा पोळ्या घेऊन ये. बाकीचं जेवण तयार आहे. तुम्ही वाढून घ्या. मी जेवायला नाहीये. बाबांना सांग तसं.''

नव्या उत्साहानं तिनं छानपैकी तयारी केली. ''मी जरा बाहेर जातेय, पूर्वाला सांगितलंय सगळं!'' इतकंच परागला सांगून, त्याच्या चेहऱ्यावरच्या प्रश्नचिन्हाकडे दुर्लक्ष करतच घराबाहेर पडली.

रिक्षावाल्याला थिएटरचा पत्ता सांगून उत्साहानं बसली आणि लगेचच फोन बाहेर काढून तिनं इअरफोन्स कानात घातले...

सकाळी अर्ध्यातच थांबवलेल्या 'बरसन लागी बदरिया'चे सूर आता तिच्या मनावर प्रसन्न शिडकावा करत होते. त्यात न्हाऊन निघण्यासाठी ती आतुर झाली होती.

**- चित्रा वाघ**

भ्रमणध्वनी : ९८२११६९३६

# राम गणेशांच्या नाटकातील शब्दप्रभुत्व आणि भाषावैभव

अरविंद पिळगांवकर

**आपण** अभिमानाने मिरवू शकतो अशा ज्या काही गौरवशाली परंपरा आपल्याला लाभल्या आहेत त्यात नाटकांची परंपरा ही अग्रेसर आहे. साधारण दोन हजार वर्षे मागे गेल्यास संस्कृत नाटकांची परंपरा आपल्याकडे होती. त्याकाळी संस्कृत भाषा प्रचारात असल्यामुळे संस्कृत नाटकांचे प्रयोग होत असत. त्यात श्लोकगायन होत असे. संगीत हा त्या नाटकांचा अविभाज्य भाग होता. भास, भवभुती, कालिदास प्रभृती थोर नाटककार त्याकाळी होऊन गेले. कविकुलगुरू कालिदासाचे 'अभिज्ञान शाकुन्तलम्' हे सर्वश्रेष्ठ नाटक असल्याचा निर्वाळा जर्मन कवी गटे याने दिला होता. भरतमुनीच्या 'नाट्यशास्त्रा'चे लेखनही याच काळात झाले.

कालांतराने संस्कृत भाषा मागे पडून इतर भाषांमध्ये लोककलांचा उदय झाला. मराठी नाटकांनाही जवळजवळ दोनशे वर्षांची प्रदीर्घ पंपरा लाभली आहे. विविध प्रहसने, इंग्रजी बुकिश नाटकांवरून बेतलेली नाटके होत असत. हे सगळे सुरू असताना, मराठी नाटकांची डोळ्यांत भरण्यासारखी प्रगती झाली ती १८८० पासून.

अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी ३१ ऑक्टोबर १८८० या दिवशी कालिदासाच्या 'अभिज्ञान शाकुन्तलम्' या संस्कृत नाटकाचा मराठी अवतार 'संगीत शाकुंतल' या नावाने रंगभूमीवर सादर केला आणि रसिकांची मने जिंकली. किर्लोस्कर नाटकमंडळींचा श्रीगणेशा याच नाटकाने झाला. त्यानंतरच्या 'संगीत सौभद्र'ने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला.

त्याच्यानंतर त्यांचे शिष्योत्तम गोविंद बल्लाळ देवल यांनी ही परंपरा समर्थपणे सांभाळली. उर्दू आणि फारसी रंगभूमीमुळे प्रभावित झालेले श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हेही त्याचवेळी कंपनीत नाटककार म्हणून वावरत होते. त्यांच्यानंतर प्रसिद्ध पत्रकार आणि गद्य नाटकांचे लेखक कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे संगीत नाटकांकडे वळले आणि त्यांच्या 'संगीत मानापमान' या नाटकातील संगीताने एक वेगळे परिमाण रंगभूमीला दिले.

या प्रभावशाली-प्रतिभावंत लेखकांच्या प्रभावळीत प्रवेश करायचा म्हणजे

शिवधनुष्य पेलण्यासारखेच होते. ते उचलले एका नवोदित लेखकाने. १९०७च्या सुमारसा 'गोविंदाग्रज' या नावाने विनोदी साहित्य लेखक म्हणून ओळख निर्माण करण्यात यशस्वी झालेला हा लेखक, किर्लोस्कर नाटकमंडळीत दाखल झाला. 'मुलांचे मास्तर' या नात्याने आणि नाट्यगृहाच्या दरवाजावर रसिक प्रेक्षकांची सेवा करता करता कंपनीचा नाटककार झाला. त्यांचे नाव राम गणेश गडकरी. आपल्या समर्थ लेखनाच्या जोरावर ज्यांनी शब्दप्रभू आणि भाषाप्रभू ही बिरुदे मिरवली, त्यांच्या नाटकातील सौंदर्यस्थळांचा शोध घेण्याचा हा एक नम्र प्रयत्न.

अर्थात, अशी स्थळे पानापानागणीक आढळतील. ती सर्व देणे अशक्य! त्यामुळे त्यातील मोजक्याच उदाहरणांचा समावेश या लेखात केला आहे.

किर्लोस्कर नाटकमंडळीत प्रवेश करताना आधीच्या थोर नाटककारांनी जे नाट्यविश्व उभारले होते, जी प्रभावळ निर्माण केली होती. तीत प्रवेश करण्याची आपली पात्रता नाही हे गडकरी जाणून होते. म्हणून स्वत:विषयी ते म्हणतात–

यावज्जीवहि काय मी न कळले, आप्तांप्रती नीटसे,<br>
मित्रांतेहि न कळे न गूढ, न कळे माझे मलाहि तसे

राम गणेशांचा लेखनाचा पिंड हा तात्यासाहेब कोल्हटकरांच्या लेखनशैलीच्या जवळपास जाणारा असल्यामुळे त्यांना गुरुस्थानी मानून गडकऱ्यांनी आपला लेखनप्रपंच केला. 'संगीत वेड्यांचा बाजार' हे त्यांचे पहिले (अपूर्ण) नाटक असले तरी 'प्रेमसंन्यास' या नाटकाने त्यांना लोकप्रियता मिळवून दिली. त्यानंतर लिहिलेल्या 'पुण्यप्रभाव', 'एकच प्याला' आणि 'भावबंधन' या नाटकांनी त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन बसवले. अपूर्ण राहिलेल्या 'राजसंन्यास'ने लोकांच्या जिवाला चटका लावला. त्यांचे 'गर्वनिर्वाण' हे नाटक सरकारी रोषाला बळी पडेल अशी भीती वाटल्यामुळे त्यांनी ते लपवून ठेवले. 'तोड ही माळ' या नाटकाचे कथानक दुसऱ्या एका नाटककाराने चोरून त्यावर नाटक लिहिले म्हणून गडकऱ्यांनी ते नाटक लिहिलेच नाही.

मी रंगभूमीवर काम करायला सुरुवात केली तेव्हा गडकऱ्यांची 'प्रेमसंन्यास' आणि 'राजसंन्यास' ही नाटके अत्यंत तुरळक प्रमाणात चालू होती. हळूहळू ते प्रयोगही बंद पडले. त्यामुळे त्यात भूमिका करण्याचा योग आला नाही. त्यांच्या 'पुण्यप्रभाव', 'एकच प्याला' आणि 'भावबंधन' या नाटकांनी मला जो आनंद दिला, त्यातील गडकऱ्यांचे शब्दप्रभुत्व आणि भाषावैभव आजच्या लेखातून मांडण्याचा मानस आहे.

'प्रेमसंन्यास' हे नाटक विधवाविवाह आणि प्रेमविवाह या विषयांमुळे कालांतराने कालबाह्य ठरले असले तरी त्यातील गोकुळ वृंदावन विसरभोळे ही व्यक्तिरेखा कोण विसरेल. हा मनुष्य अत्यंत विसराळू! सांगितलेल्या कामांची आठवण व्हावी म्हणून उपरण्याला गाठ मारण्याची सवय, पण कुठली गाठ कुठल्या कामासाठी मारली हेच

विसरायचा. महाराष्ट्र नाटकमंडळी या नाटकाचा गद्य प्रयोग करत असे. किर्लोस्कर कंपनीकडे आल्यानंतर त्यात पदे घालण्यात आली ती वसंत शांताराम देसाई यांनी रचली होती. नाटकात संगीत असावे असे गडकऱ्यांना मुळीच वाटत नव्हते. त्यांच्या नाटकाचे गद्य एवढे प्रभावी काव्यमय आणि कोटिबाज; त्यामुळे त्याला संगीताची फारशी आवश्यकताच नव्हती. या नाटकातील खलनायक कमलाकर हा अपेक्षाभंग झाल्यामुळे सुडाने पेटून उठतो आणि अनन्वित अत्याचार करतो. त्याबद्दल त्याला पश्चात्ताप तर होत नाहीच, पण सूड उगवल्याचा आसुरी आनंद होतो. असा खलनायक इतका प्रभावी ठरतो की तो नाटकाचा नायकच वाटतो. हे गडकऱ्यांचे पहिलेच नाटक असल्यामुळे ते थोडेसे मेलोड्रामाकडे झुकले होते.

'पुण्यप्रभाव' नाटकाची रचना करताना मात्र गडकरी पूर्णपणे नाटक-तंत्रावर मजबूत पकड बसवण्यात यशस्वी झालेले दिसतात. नाटकाच्या सुरुवातीचे ईश्वर या पात्राचे वाक्यच या गोष्टीची साक्ष देते.

तो म्हणतो, 'माझ्या प्रेमसंन्यासानं मात्र हा पुण्यप्रभावाचा मार्ग दाखवला नसता तर माझं मन अजूनही त्या वेड्यांच्या बाजारातच रमत राहिलं असतं.'

'पुण्यप्रभाव' हे गडकऱ्यांचे एकच नाटक असे आहे की ज्यातील नांदीपासून भरतवाक्यापर्यंत सर्व पद्यरचना त्यांची स्वत:ची आहे.

१९१६ साली रंगभूमीवर आलेल्या या पुण्यप्रभावचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या नाटकाचे गद्य प्रयोग महाराष्ट्र नाटकमंडळी आणि संगीत प्रयोग किर्लोस्कर नाटकमंडळी करत असत आणि दोन्ही प्रयोग सारखेच लोकप्रिय होते.

या नाटकाच्या दुसऱ्या अंकातील दुसरा प्रवेश हा गडकऱ्यांच्या काव्याचा आणि काव्यमय गद्याचा उत्कृष्ट नमुना आहे.

नायक भूपाल आणि नायिका वसुंधरा रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी बागेत बसले आहेत. जवळच त्यांचा बाळ दीनार पहुडलेला आहे. अशा चांदण्या वातावरणात गडकऱ्यांच्या काव्याला भरती येते. आकाशातल्या तारकांकडे पाहून वसुंधरा म्हणते-

'कृष्णपक्षातला हा तारकालोप पाहिला की मला एकच कल्पना आठवते...

नाचत ना गगनात नाथा। तारांची बरसात।
आणित होती माणिक मोती। वरतुनिं राजस रात।
नाव उलटली, माव हरपली। चंदेरी दरियात।
ती ही वरची देवाघरची। दौलत लोक पहात।।'

गडकऱ्यांची रात्र ही नुसती रात्र नाही ती राजस रात आहे. नावेतून माणिक-मोती आणताना नाव उलटते आणि त्यातील माया चंदेरी दरियात हरपते. ती देवाघरची दौलत आपण पाहातो. आकाशातील चांदण्यांना पाहून ही कल्पना गडकरी काव्यात

उतरवतात. यानंतर.. (दीनाराकडे पाहून)

वसुंधरा म्हणते, ''आपण फुलांचा वास घेत आहोत आणि आपला चिमुकला आकाशातल्या तारांकडे टक लावून पहात आहे.''

भूपाल म्हणतो, ''नुकतेच देवाजवळून आलेल्या निष्पाप बालकाचे स्वभावत:च वरती पहाणारे डोळे, आल्याघरच्या ओळीने तारांकडे पाहतात.''

वसुंधरा : ''या एवढ्याशा मुलाला तारांकडे पाहून काय वाटत असेल बरे?''

भूपाल : ''तारांच्या अज्ञेय अंतरामुळे त्यांच्याकडे पाहताना लहान मुलांत आणि मोठ्या मनुष्यात विशेष भेद असत नाही. दोघेही सारख्याच प्रमाणात भांबावून जातात. ही नक्षत्रे म्हणजे आकाशाच्या उघड्या माळावर तत्त्वज्ञानाची बीजेच परमेश्वराने पेरून ठेवली आहेत. अंतरिक्षातील कोणतीही वस्तू मनुष्यबुद्धीला कुंठित केल्यावाचून राहात नाही. काळाचे हे हजारो डोळे कोणत्या अर्थाने लुकलुकत असतात हे आम्हाला कळेल तर कितीतरी निराशा आधीच टळतील! आमच्या भावी संकटांच्या विचारानेच तर काळ असे डोळे मिचकावीत नसेल ना? ताऱ्यांच्या या चमकीचा काय बरे अर्थ असावा?''

या प्रवेशातच बोलता बोलता भूपाल अत्यंत आनंदाच्या क्षणी मरण यावे अशी कल्पना बोलून दाखवतो. गडकऱ्यांना मरणाचे विलक्षण आकर्षण होते असे त्यांच्या नाटकातून-साहित्यातून जाणवते. म्हणूनच 'जगण्यासारखं जोपर्यंत जवळ काही आहे तोपर्यंतच मरण्यात मौज आहे' हे त्यांचे ब्रीदवाक्य होते.

याच नाटकातील एक उत्कट प्रसंग. अंक पाचवा - प्रवेश पाचवा! वसुंधरा रिकाम्या पाळण्याला झोका देत आहे. भूपाल येतो.

भूपाल : ''आर्ये, आपला दीनार कुठे आहे? आपल्या प्रीतीचा पहिला साक्षीदार.''

वसुंधरा : ''देवाचं देणं देवाघरी पावतं झालं. आपला प्रेमस्वरूप दीनार या पाळण्यात खेळत आहे.''

भूपाल : ''वसुंधरे, या रिकाम्या पाळण्यात मला दीनार कसा दिसणार?''

वसुंधरा : ''मग या रिकाम्या जगात आपल्याला परमेश्वर तरी कसा दिसणार? नाथ, असे मायावश होऊ नका.''

भूपाल : ''अहाहा, आर्ये, देवी,

पुण्यमया तव मूर्ती पाहता खनि जी केवल तेजाची।<br>
इंद्रहि झांकिल नेत्रिसहस्रा काय कथा मग इतरांची।।<br>
देवी त्रिपुरेश्वरी प्रतिष्ठा करि का देही या साची।<br>
दर्शनमात्रे जाळुनि टाकी विश्वें सारी पापांची।।

आर्ये, देवी – नाही, अपरिचित शब्दांनी तुला संबोधल्याबद्दल मला पुरुषजातीने दोष दिला तरी चालेल. दशपुत्रांना जन्म देणाऱ्या पत्नीला, पतीने मातृपदाने संबोधून तिचा सत्कार करावा अशी धर्माज्ञा आहे; पण एकाच पुत्राला योग्य मरण दिल्यामुळे मी तुला त्या पदी बसवीत आहे. हा पाहा, पुरुषार्थाचा भलता अभिमान सोडून दिला. माते, माते माझ्या मस्तकावर हात ठेवून मला आनंदाने निरोप दे.''

या नाटकातील सहाव्या अंकातील चौथा प्रवेश हा या नाटकाचा उत्कर्षबिंदू आहे. वृंदावन आणि वसुंधरा यांच्या अभिनयाची जुगलबंदी पाहून प्रेक्षकांच्या कानांचे आणि डोळ्यांचे पारणे फिटते.

या नाटकाच्या वाचनाच्या वेळी गडकऱ्यांचे परममित्र बालकवी ठोमरे हजर होते. वसुंधरा वृंदावनाच्या म्हणण्याला संमती देत नाही. तेव्हा तो दीनाराचा प्राण घेण्याची धमकी देतो. यावेळी वृंदावनाची पत्नी कालिंदी ही स्वत:चा मुलगा केतन याला दीनाराच्या जागी ठेवते आणि वृंदावन स्वत:च्या मुलाचीच हत्या करतो. हा प्रसंग वाचताना बालकवी अत्यंत भावविवश झाले आणि म्हणाले, ''गडकरी, अहो त्या कालिंदीच्या मुलाची हत्या करू नका. काय हवं ते करा, पण केतन जिवंत राहिला पाहिजे.'' तेव्हा गडकऱ्यांनी केतनऐवजी ईश्वर हा एक मेलेले मूल आणून ठेवतो आणि केतनचा प्राण वाचवतो असा बदल केला.

झालेल्या अपमानाचा बदला घेण्याच्या इराद्याने वृंदावन आपला मित्र भूपाल आणि त्याची पत्नी वसुंधरा यांचा छळ करतो; परंतु अंतिम क्षणी त्याचे हृदयपरिवर्तन होऊन तो पश्चात्तापदग्ध अंत:करणाने सर्वांची क्षमायाचना करतो. यामुळे तो खालनायक न राहता नाटकाचा नायकच ठरतो. मूळ विषयाचा गंभीर ताण कमी करण्यासाठी गडकऱ्यांनी केलेली विनोदी पात्रांची योजना नाटकाला पोषक अशीच आहे. त्यात गडकऱ्यांच्या विनोदी शैलीचे दर्शन घडते.

पुण्यप्रभावच्या यशाने प्रेरित होऊन गडकऱ्यांनी 'एकच प्याला', 'भावबंधन' आणि 'राजसंन्यास' या नाटकांच्या लेखनाला सुरुवात केली. १९१७ सालच्या नोव्हेंबर महिन्यात 'एकच प्याला' हे नाटक संपूर्ण लिहून झाले, पण त्यातील पदे लिहिली नव्हती. हे नाटक गंधर्व नाटकमंडळीला द्यायचे ठरलेले होते त्यामुळे त्यात पदे असणे आवश्यक होतं. प्रकृतिअस्वस्थ्यामुळे गडकऱ्यांना पदे लिहिणे शक्य नव्हते त्यामुळे त्या नाटकातील पदरचना वि. सी. गुर्जर यांनी केली. १९१९ साली गडकऱ्यांचे निधन झाल्यामुळे तीच पदे नाटकात कायमची समाविष्ट करण्यात आली. फक्त नाटकाचे 'मंगलाचरण' (नांदी) आणि सिंधूच्या तोंडची स्त्रीगीतसदृश पदे मात्र गडकऱ्यांची आहेत. गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर एक महिन्याने 'एकच प्याला' नाटकाचा प्रयोग बडोद्याच्या महाराजांसमोर झाला.

मानी सुधाकर आणि सालस सिंधू यांच्या सुखी संसाराची ही शोकात्मिका गडकऱ्यांनी फार परिणामकारक लिहिली आहे. दारूचा खंदा पुरस्कर्ता तळीराम ही गडकऱ्यांच्या नाट्यप्रतिभेतून जन्माला आलेली एक अफलातून व्यक्तिरेखा! दारूविषयीचे त्याचे तत्त्वज्ञान किती सडेतोड आहे पाहा–

तळीराम : ''म्हणे दारू सुटत नाही! भगीरथ, विश्वविद्यालयाचे पदवीधर तुम्ही; चार दिवस परीक्षा देऊन पदवी मिळवता, आणि ती जन्माची चिकटते, म्हणून कुणी पदव्या घ्यायचं टाकलंय का? तशीच बायको! एकदा नुसती गळ्यात माळ घातल्यानं उभा जन्म बायकोचा लबेदा बिलगतोना? म्हणून कुणी बायका करायचं टाकलंय का? पदवी वाईट नाही, बायको वाईट नाही, मग दारूच तेवढी वाईट का?''

पुढे तळीराम आजारी पडतो तेव्हा त्याला तपासायला 'आर्य मदिरामंडळाचे सभासद' एक बोगस डॉक्टर आणि भोंदू वैद्य घेऊन येतात, तेव्हा तो म्हणतो–

तळीराम : ''अहो शास्त्रीबुवा, एकट्या वैद्यानं किंवा एकट्या डॉक्टरनं मी मरण्यासारखा नव्हतो म्हणून का तुम्ही या दोघांना आणलंत?'' यानंतरच्या नाडीपरीक्षेत जे काही होते ते प्रत्यक्ष रंगभूमीवर पाहणंच योग्य. हास्यरसाचा हलकल्लोळ!

मरतानासुद्धा तळीराम भगीरथाला निरोप देतो.

तळीराम : ''त्या भगीरथाला सांगा, तळीराम दारू पिता पिता मेला, परंतु शेवटपर्यंत प्रेमाच्या पकडीत सापडला नाही.''

या नाटकाचे पाच अंक आहेत आणि प्रत्येक अंकाच्या शेवटी 'एकच प्याला' हेच शब्द आहेत. चौथ्या अंकातील चौथ्या प्रवेशात, सुधाकराच्या तोंडी असलेले आठ–नऊ पानी संवाद, एकच प्याल्याचे विराट आणि उग्र स्वरूप प्रेक्षकांच्या नजरेसमोर उभे करताना गडकऱ्यांच्या लेखणीला विलक्षण धार आलेली आहे. नाटकाची नायिका सिंधू ही इतकी सोज्वळ आहे, की संबंध पाच अंकी नाटकात एकदाही 'दारू' हा शब्द तिच्या तोंडी आलेला नाही. तिच्या तोंडच्या साध्या शब्दांतही गडकऱ्यांच्या लेखणीचे सामर्थ्य दिसून येते.

सिंधू : ''दादा, अरे हेच पाय माझ्या कपाळी आहेत ना? अरे, तू चांगला शहाणा ना? वेड्या, माझ्या कपाळीच्या कुंकवासाठी मला या पापांच्या पायधुळीत राहायला नको का?''

बालगंधर्वांच्या सर्व भूमिकांमध्ये सिंधूचा पहिला क्रमांक होता. सॅम्युएल बेकेट या लेखकाने जगातील सर्व स्त्रीभूमिकांमध्ये ॲना कारनिना आणि सिंधू या सर्वश्रेष्ठ स्त्रीभूमिका असल्याचे नमूद करून ठेवले आहे. १९१८ सालच्या मार्च महिन्यापासून गडकरी असाध्य आजाराने अंथरुणाला खिळले आणि २३ जानेवारी १९१९ रोजी अनंतात विलीन झाले. त्यावेळी नाटकाच्या तालमी चालू होत्या. 'एकच प्याला'ने

गंधर्व नाटकमंडळीला अमाप लोकप्रियता आणि आर्थिक स्थैर्य मिळवून दिलं, पण आपल्या नाटकाचे यश पाहायला गडकरी मात्र हयात नव्हते.

'एकच प्याला'बरोबर 'भावबंधन' या नाटकाचे लेखनही पूर्ण झाले होते. गडकऱ्यांच्या प्रत्येक नाटकाला पाच अंक आणि प्रत्येक अंकात पाच-सहा प्रवेश आहेत. भावबंधनच्या पाचव्या अंकाचा फक्त पहिल्या प्रवेशाचे लेखन गडकऱ्यांनी केले. त्याचा शेवट वाचताना गडकऱ्यांना आणखी तीन-चार प्रवेश लिहायचे होते असे दिसते. प्रकृतिअस्वास्थ्यामुळे ते लिहायचे राहून गेले असावेत. आपला अंत:काळ जवळ आल्याची जाणीव गडकऱ्यांना झाली, तत्क्षणी त्यांनी एका पानावर शेवटचा प्रवेश लिहून बलवंत नाटकमंडळीत पाठवून दिला. अशा रीतीने नाटकाचा आणि नाटककाराचा शेवट एकाच वेळी झाला. त्यामुळे या शेवटच्या प्रवेशाला फार महत्त्व आहे.

या नाटकातही गडकऱ्यांच्या अलंकारिक भाषेचा फुलोरा आपणास अनुभवता येतो. नायिका लतिका हिच्या गालवरचा तीळ! या तिळाचे वर्णन करताना गडकरी किती रंगून जातात पाहा....

प्रभाकर : ''आता लतिकेकडे पाहा. कवितेचा व्यासंगी म्हणून कपोलकल्पित वर्णन तुला सांगत नाही. पहा या गालांकडे. बदलत्या मनोविकाराची नवी निशाणी सर्वात अगोदर गालांवर दिसू लागते.''

मनोहर : ''यावेळी किती रागाच्या नजरेनं ती तुझ्याकडे पाहत आहे. गालांवरून दृष्टी उठवून जरा नजरेकडे तर लाव; जरा वर पाहा.''

प्रभाकर : ''हो हो. गालाच्या वरची पायरी नजरेची, तर वर्णनासाठी एक पायरी वर जाऊ. गावासाठी भूगोल झाला तर दृष्टीसाठी खगोल घेऊ. या दृष्टीत मंगळाची आरक्तता आहे तर शुक्राची प्रेमळता आहे. विशाल नेत्रांना गुरूची गंभीरता आहे, तर बुधाची चंचलता आहे. ही दृष्टी रवीकिरणांप्रमाणे तेजस्वीप्रकाशदायिनी आहे, तर चंद्राची शीतलताही देणारी आहे. (गालावरचा तीळ दाखवून) तो पाहा, नेत्रांची शुभ्र किरणं अदोमुखानं उतरताना गालाच्या गुलाबी रंगाच्या उर्ध्वमुखी किरणांशी जिथे एकरूप होतात, त्या सीमारेषेवर असलेला, एकच काळसर तीळ! सौंदर्याचं हे चालतं-बोलतं काव्य सर्वांगपरिपूर्ण केल्यावर, काव्यरसाची सीमा झाली हे दाखवण्यासाठी विधात्यानं, या तिळाचा, गालावर हा सुंदर पूर्णविरामच देऊन ठेवला आहे.''

लतिका : ''आज माझ्या वर्णनात अगदी तीळ उणा पडू द्यायचा नाही असा तुमचा संकल्प दिसतो.''

प्रभाकर : ''असलं सुंदर काव्य आपल्या तोंडी असावं अशी कोणता रसिक इच्छा करणार नाही.''

करि मोहवश ना कसा। नवकाव्यागम रसिक मानसा।।
रमवि मुखि न त्या वरूनि मुखरता।
शमवि न सुरसे कवण रसरता। हृदयपिपासा।।१।।

हे पद गडकऱ्यांनी रचलेले आहे. असेच आणखी एक पद लतिकेच्या तोंडी आहे.

कठीण कठीण कठीण किती।
पुरुषहृदय बाई। स्त्रीजाती-प्रति झटता
अंत कळत नाही।।धृ.।।
रंगुनि रंगात मधुर मधुर बोलती,
हंसत हंसत फसवुनी हृद्‌बंध जोडिती।
हृदयाचा सुंदरसा गोफ गुंफिती
पदर पदर परिशेवटी तुटत तुटत जाई।।१।।

या नाटकाचे नमन (नांदी) आणि त्यानंतरची दिण्डी आणि साकी गडकऱ्यांनी रचलेली आहे. साकीमध्ये 'वंदुनि त्या श्रीपादपदांप्रती' असा आपल्या गुरूला – श्रीपाद कृष्ण कोल्हटकर – यांना आदरपूर्वक नमस्कार केला आहे. दुसऱ्या अंकाच्या शेवटच्या (सहाव्या) प्रवेशातील शेवटी मनोहरचे एक आणि मालतीचे एक अशी दोन पदे गडकऱ्यांची आणि इतर सर्व पद्यरचना त्यांचे गुरू श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची आहे.

'पुण्यप्रभाव' नाटकातील वृंदावन आणि वसुंधरा यांच्यातील अभिनयाची जुगलबंदी असलेल्या प्रवेशाप्रमाणे याही नाटकात घनश्याम आणि लतिका यांच्यातील प्रवेश अटीतटीचा आहे. या प्रवेशातील घनश्यामाच्या तोंडचे एक अप्रतिम वाक्य...

घनश्याम : (लतिकेला) ''आपला नुसता हात धरल्यामुळे आपलं हृदय माझ्या हाती लागण्यासारखे नाही, त्याप्रमाणे माझे पाय धरल्यामुळे आपल्याला माझे मस्तकही मिळायचे नाही; कारण हातापासून हृदय दोन हात दूर असेल, तर पायापासून मस्तक साडेतीन हात अंतरावर असते. लतिके, ज्या तोंडाने हे अकलेचे तारे तोडत होतीस त्याच तोंडाला असे खडे चारताना मला कल्पांतापर्यंतसुद्धा दया येणार नाही. जातो मी.''

ज्याप्रमाणे 'संगीत संशयकल्लोळ' या नाटकाचे यश पाहायला देवल मास्तर हयात नव्हते, त्याचप्रमाणे 'एकच प्याला' आणि 'भावबंधन' या नाटकांचे यश पाहायला गडकरीमास्तर हयात नव्हते. केवढा हा दैवदुर्विलास!

।।अर्पणपत्रिका।।

''इतिहास छातीला हात लावून पुढील कथा सांगतो आहे. तेव्हा विश्वासाने ती मुकाट ऐकून घ्यायला हवीच. थोरल्या छत्रपतींचा एक आवडता कुत्रा होता. हे

‘समर्थाघरिचें श्वान’ खरोखरीच सर्वांनी मान देण्यासारखेच होते. हा इमानी जीव आबासाहेबांना कधीही विसंबत नसे. अखेर प्रभूंचे शुभावसान झाल्याबरोबर या मुक्या इमानानेही चितेत उडी घेऊन त्यांना स्वर्गापर्यंत सोबत केली. आज रायगडावर त्याची भाग्यशाली समाधी राजांच्या समाधीशेजारी मांडीला मांडी लावून बसलेली, तिन्ही लोक डोळ्यांनी पाहात आहेत. त्या समाधीवर त्या चतुष्पाद पशूची पूजा बांधण्यासाठी, नरदेहाचा नसता अभिमान सोडून, माझ्या या ‘राजसंन्यासा’च्या पामर बोलांची, डोंगर–पठारीवरच्या या रानवट फुलांची पाखरण करून ठेवीत आहे.''

– राम गणेश गडकरी

‘राजसंन्यास’ नाटकाची ही अर्पणपत्रिका वाचूनच त्याच्या अलौकिकपणाची खात्री पटते. आजवर अनेकांनी आपली कलाकृती आपल्या प्रियजनांना अर्पण केली असेल, पण एका पशूला आपली कलाकृती अर्पण करणारे गडकरी हे एकमेव नाटककार ठरावेत.

नाटकाची सुरुवातच अद्भुतरम्य आहे. मराठी रियासतीभोवती जागत्या डोळ्यांनी पहारा करत असलेल्या पाच देवींच्या अस्पष्ट आकृत्या शिवनेरीच्या बाळाला निजवण्यासाठी पाळणा गात आहेत असा देखावा नजरेस पडतो. पाळणा गाऊन झाल्यानंतर देवता नाहीशा होतात आणि मालवणच्या सिंधुदुर्गासमोरील देखावा दिसू लागतो. किती नाट्यपूर्ण सुरुवात! जातीच्या नेपथ्यकाराला आव्हान देणारी.

सुप्रसिद्ध लेखक मामा वरेरकर यांच्यासोबत मालवणला गेले असताना, सिंधुदुर्गाच्या बुरुजावर उभ्या असलेल्या गडकरींना राजसंन्यासची सुरुवात तिथूनच करावी अशी स्फूर्ती झाली; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या नाटकातला शेवटचा प्रवेश त्यांनी सर्वांत प्रथम लिहिला. (अंक ५, प्र. ५ वा, दि. २३–६–१९१६) यानंतर ७ जाने. १९१७ पर्यंत त्यांनी या नाटकाचे पहिल्या अंकातील दोन प्रवेश आणि पाचव्या अंकातील पहिले चार प्रवेश लिहिले आणि नाटक अपूर्ण ठेवून इहलोकची यात्रा संपविली. हे नाटक पूर्ण झाले असते तर गडकऱ्यांची एक अप्रतिम कलाकृती पाहिल्याचे समाधान प्रेक्षकांना लाभले असते.

या नाटकासाठी वापरलेली भाषा इतिहासनिष्ठ आणि अभ्यासपूर्वक कमावलेली आहे. या नाटकातही पदे आहेत. येसूबाई आणि शिवांगी ही पात्रे गाणारी आहेत. संभाजीलाही एक अतिशय शृंगारिक लावणीसदृश पद आहे. (प्रत्यक्ष प्रयोगात ते रायाजी मालुसरे गात असे) यातील शिवांगी हे पात्र गडकऱ्यांची मानसकन्या आहे, रायाजीची वाग्दत्त वधू! पाच वर्षांनी भेटलेल्या आपल्या रायासाठी जिवाची सांडवणूक करायला तयार होते. सतीचे सोंग घेतल्यावर पाटावाची पर्वा ठेवून चालत नाही. महाराणी येसूबाईंच्या पायातल्या सोन्याच्या साखळ्या लेऊन हसत हसत मरणाला सामोरी जाते.

‘शिवांगीचे पंचप्राण, रायाजीचे दहा प्राण, वैराणात दाही दिशा वेरून टाकले. प्रेमाची दोन पाखरे वणव्यात होरपळून गेली.’

नाटकातला शेवटचा प्रवेश – जो सर्वात प्रथम लिहिला गेला – त्या प्रवेशात राम गणेशांच्या प्रतिभेचा कळस पाहायला मिळतो. मोगलांच्या छावणीत कैदेत असलेल्या संभाजीमहाराजांना सोडवायला त्यांचा इमानी मावळा साबाजी जातो, तेव्हा बाणेदारपणाने महाराज ती संधी नाकारतात. शेवटी एवढेच म्हणतात–

संभाजी : ‘‘मराठेशाहीचा हा जिरेटोप श्री राजाराममहाराजांच्या मस्तकावर ठेवा. उद्याच्या उगवत्या सूर्याला, या मावळत्या सूर्याची किरणं नेऊन पोचवा आणि रायगडच्या नव्या राजाला, जुन्या राजाची एवढीच वाणी ऐकवा की,


राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी।
राज्य–उपभोग म्हणजे राजसंन्यास।।
ना विष्णु: पृथिवीपति:।’’

गडकऱ्यांच्या या पंचाक्षरी पाचही नाटकांनी उभ्या महाराष्ट्राला भरभरून आनंद दिला. हसवले, रडवले, रिझवले! अनेक नामवंत अभिनयकुशल आणि गानकुशल कलाकारांनी यातील विविध भूमिका केल्या. गडकऱ्यांना जेमतेम चौतीस वर्षांचे आयुष्य लाभले. नाटककार म्हणून त्यांची १९११ पासून सुरू झालेली कारकीर्द जानेवारी १९१९ ला संपली. त्यांचा जन्म ‘नवसारी’ला आणि मृत्यू ‘सावनेर’ला झाला. त्यातही गावांच्या नावातले अक्षरसाधर्म्य पाहून आपण चकित होतो. लहानपणापासून हालअपेष्टांत दिवस काढलेल्या त्यांच्या अशक्त कुडीला असामान्य प्रतिभेचे देणे लाभले होते. प्रभू जातीत जन्माला आलेल्या या शब्दप्रभूला त्या ‘प्रभूचे’ बोलावणे आले आणि साहित्य–संसार अर्ध्यावर टाकून त्याला जावे लागले. त्यांच्या साहित्य–स्मृतीला साष्टांग दंडवत!

**– अरविंद पिळगांवकर**
भ्रमणध्वनी : ७६७८००१६४४



# । कविता ।



## बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर

बायका
करत नाहीत आताशा
स्वप्नांना पिन अप
त्या झुळझुळत ठेवतात
आयुष्याचा पदर
त्या बांधत नाहीत गच्च अंबाडे
माळत नाहीत पांढरेशुभ्र गजरे
तरीही त्या दरवळतात
आपणच आपल्याला गुदगुल्या करत
रेशीम होऊन सुळसुळतात

चुलीत फुंकर मारत डोळे चोळत
त्या वैरत नाहीत भात
जाऊ देतात शिटीतून हवी तशी वाफ

कंबरा मोडेपर्यंत
त्या वळत नाहीत शेवया
लाटत नाहीत पापड
सोफ्यावर ऐस पैस होत
त्या विरघळतात आपल्याच जिभेवर
होऊन कुरकुरीत वेफर्स

त्या चालत नाहीत नवऱ्याच्या मागून
त्या चालतात
स्नीकर्स घालून मस्त रुबाबात
तो  सोबत असला काय किंवा नसला काय
काहीच फरक पडत नाही त्यांना
त्या  सुसाटतात वाऱ्याला पाठी टाकत
आपलं स्टेअरिंग  आपल्याच हातात घेऊन

**– संगीता अरबुने**
भ्रमणध्वनी : ८०८०२३३९६३

## ती सहजपणे जवळ येतच नाही

तशी ती सहजपणे
जवळ येतच नाही कधी,
वेळोवेळी ती जोखून घेते
तुमची प्रतिभा
आणि सर्व कसोट्यांवर उतरल्यावर
मगच थोडंसं दार उघडते
तिच्या मनाचं...

बारकाईनं पाहात असते ती सारं –
तुमच्या विचारांचा पोत
शब्दांची ताकद
व्यक्त होण्याची पद्धत
भावनांची तरलता
वगैरे वगैरे...

लडिवाळ खेळावं लागतं
गोंजारावं लागतं तिला,
उतरावं लागतं खोल
पार तिच्या अंतरंगात,
तेव्हा कुठे ती तुमची होते
तुम्हाला समर्पित होऊन...

कविता ही अशीच असते...!

**– विजो (विजय जोशी)**
भ्रमणध्वनी : ९८९२७५२२४२

## बधिर करून संपवलं जातंय आपल्याला

वैद्यांनी आधी आपल्याला दातांचं महत्त्व सांगितलं
त्यांची निगा कशी राखावी
यावर त्यांनी फिल्म दाखवली
खूप काळजी घेतली मी
वय वाढत गेलं तरी दात किडू नये याची
तरीही दुखणं वाढतच गेलं एकेका दाताचं

वेदना जेव्हा असह्य झाल्या तेव्हा
वैद्यांनी आपुलकीचा सल्ला दिला
दात पाडून घेण्याचा
माझ्यासमोर कोणताच पर्याय राहिला नाही

मला काहीही न कळता
बधिर करून
दात उपटून वैद्याने माझ्या हातात दिला
मला तेव्हा जाणवलं
माझ्या शरीरातलं
दाताएवढं वजन जरी कमी झालं होतं तरी
मला बधिर केलं गेलं
या रुखरुखीनेच मी हळूहळू
संपायला लागलो

फसवलं जातंय आपल्याला
अशीच शब्दांची भूल देऊन
उपटून घेतला जातो
आयुष्यातला एकेक क्षण तेव्हा
आपण आणखीनच बधिर होत जातो.

**– मोहन कुंभार**
भ्रमणध्वनी : ९५११८७५१३३

## मेपल

थोडंसं चुकतंय
जरासं हुकतंय
अन खूपसं मुकतंय...

असं वाटत राहणाऱ्या संध्याकाळी
येशील का परतून?
त्याच त्या हिरव्यागार पिंपळवाटांतून
त्याच त्या ओल्या वळणवाटांतून

मेपलची ही तपकिरी पानं
पुन्हा बरसतील न तशीच
गुलाबी हृदय बनून आपल्यावर?
हवेतली नशा खोल खोल
उतरत जाईल
बेधुंद वारं आत आत कातरत जाईल
अन् हा मेपल पुन्हा एकदा
बहरत जाईल .. जाईल न?

माझ्या श्वासांचा पदर
फडफडत राहील तुझ्या
नजरेच्या भारदस्त छातीवर
शरमेच्या बटा रुळत राहतील
संयमाच्या मानेवर...

थोडंसं चुकतंय, जरासं हुकतंय
असं वाटत असतानाच
हा मेपल कवेत घेईल
ही संध्याकाळ
अन् संध्याकाळ विरघळत
असेल त्यात...
..आत... आतल्या आत...

**– कीर्ती पाटसकर**
भ्रमणध्वनी : ९८१९९२७५६८

## हत्यारा

कित्येक वर्षांपूर्वी
माझी हत्या करण्यात
आली होती

हत्या करणारा हत्यारा
सापडत नव्हता
सर्वत्र शोधूनही

वर्तमानपत्रामध्ये
दूरदर्शनवर बातमी
देऊनसुद्धा
पोलिसांना
हेरांना
आणि
मलाही

अखेर आज
तो मला सापडला
भल्या पहाटे
प्रार्थनालयात
माझ्या मुक्तीसाठी
प्रार्थना करताना

**– विलास गावडे**
भ्रमणध्वनी : ९४२११५८१८८

## शेवट

एकदा
आजीच्या चेहऱ्यावरील सर्व सुरकुत्या नीट मोजून घ्याव्यात
आजोबांच्या थरथरत्या हाताला काही क्षण आधार द्यावा
आईच्या पायाला शेवटचा स्पर्श करून घ्यावा
बाबांच्या फोटोला शेवटची अगरबत्ती ओवाळून घ्यावी
मुलाच्या पाठीवरून शेवटचा हात फिरवावा
मुलीच्या गालाचा गोड गोड पापा घ्यावा
बायकोच्या थकल्या देहाकडे डोळेभरून पाहून घ्यावं
घरातल्या आवडत्या जागेवर दोन क्षण बसून घ्यावं
पुस्तकाच्या कपाटाजवळ काही वेळ नुसतं थांबावं
एकेका आवडत्या पुस्तकाला नुसत्या नजरेनंच ओवाळावं
कवितेच्या वहीला मात्र छातीशी घट्ट घट्ट कवटाळावं...

मग सूर्यास्ताच्या दिशेनं
चालावं.... चालावं.... खूप चालावं
अगदी क्षितिज येईपर्यंत...

क्षितिज आलं की मग एकदा मागे वळावं
'नक्षत्राऽऽऽ मी निघालोय ग.......'
अशी एक शेवटची तीव्र हाक मारावी

आणि पुन्हा
क्षणभरही मागे वळून न पाहता
एकेक पाऊल पुढे टाकत
समुद्राच्या खोल तळाशी
ज्ञानोबासारखं समाधीस्थ बसून
कायमचं
अदृश्य होऊन जावं...!

लादलेल्या दुःखद मरणापेक्षा
स्वीकारलेलं सुखद मरण
केव्हाही चांगलंच ना...!

**– संजय शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८९२२७६८३१

## शोध

कसा गा शोधावा अंतरीचा देव
गाभाऱ्याचा ठाव नाही कोठे!
जीव तळमळे घ्यावी झेप कोठे
क्षितिजाचा गाव गवसेना!
होते तगमग, सोसेना ही आग
मनीचा कल्लोळ शांतवेना!
शोधू कुठे सांग, अमृताचा घोट
मरणाचे भय पाठी लागे!
हवा तो विसावा, साथ चांदण्याची
माया हाती असो, माऊलीची!
शब्दाचिया हाती, सोपवते मन
कैवल्याचे धन शोधावया!

**– सुजाता पाटील**
भ्रमणध्वनी : ९८२२५४८५७५

# पुस्तक परिचय

## राजीव जोशी




### सृजनाचं फुलपाखरू

पुणे-मुंबई आणि एकूणच महाराष्ट्राच्या परिघाबाहेर, बेळगावात राहणाऱ्या हर्षदा सुंठणकर या तरुण कवयित्रीच्या कविता मौज, दीपावली, गंधाली, रणांगण, सृजन, कवितारती अशा नामवंत नियतकालिकांतून नेहमीच लक्ष वेधून घेत आलेल्या आहेत. 'कपडे वाळत घालणारी बाई' या रसिकांच्या पसंतीस उतरलेल्या तिच्या कवितेने मराठी कवितेत वेगळा ठसा उमटवलेला आहे. याच कवितेच्या शीर्षकाचा एकूण ५७ कवितांचा संग्रह नुकताच 'ग्रंथाली'कडून प्रसिद्ध झालेला आहे. शीर्षकाला सूचक असं मुखपृष्ठ सतीश भावसार यांचं आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावना अंजली कुलकर्णी यांची लाभलेली आहे. या संग्रहातील हर्षदाचं मनोगत, विशेषतः पहिले चार परिच्छेद, म्हणजे कवयित्रीची जीवनविषयक नितळ भूमिका, तिच्या काव्यव्यक्तिमत्त्वाचा क्रक्स आहे, तिच्या कवितेचा रक्तगट आहे. 'मुळात सजीव म्हणून अस्तित्व असणं हेच किती सुंदर आहे' यातून तिची परिपक्वता दिसून येते. ती म्हणते, 'माणसाचा माणूस असण्याबद्दल विश्वास असला की ब्रेनडेड झालेला माणूस इतरांना आपले अवयव देऊ शकतो, गंभीर आजार असलेला माणूस नोबेल पुरस्कार मिळवू शकतो आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे नगण्य समजले जाणारे कितीतरी जीव निसर्गाचं चक्र सुरळीत चालावं म्हणून योगदान देत असतात.' यातून माणूस आणि निसर्गात घनिष्ठ सहजीवनाचं नातं ती सूचित करते. आपल्या मनोगतात आजकाल दिसणाऱ्या एका विशिष्ट मानसिकतेवर, मनोवृत्तीवरचं भाष्य करताना ती म्हणते, 'ठरवलेल्या क्षेत्रात, ठरवलेल्या निकषांवर, ठरवलेली पात्रता सिद्ध करणं म्हणजे यश नव्हे. खूप प्रसिद्धी, पैसा कमावणं म्हणजेही यश नव्हे, प्राप्त परिस्थितीत जमेल तितकं समाधानी बनण्यासाठी प्रयत्न करणारी प्रत्येक व्यक्ती यशस्वीच असते, मग समाजाचं यशाचं मोजमाप काहीही असो, जगण्यातला प्रत्येक क्षण समरसून जगणं जास्त महत्त्वाचं..' ही समंजस भूमिका आणि परिपक्व मानसिकता तिच्या कवितांची टॅग लाइन आहे असं संग्रहातल्या कविता वाचत असताना वारंवार वाटत राहतं.

खरं तर शतकानुशतकं कपडे वाळत घालण्याची कृती स्त्री निगुतीनं करत आलेली

आहे. कपडे धुपाटणं, वाळत घालणं केवळ सवयीनं आलेल्या कृती वा उपचार नाहीत तर त्या कृतीत जवळच्या, आपुलकीच्या, प्रेमाच्या व्यक्तीशी निगडित विशिष्ट आठवणींचा उजागर तिच्या मनात चाललेला असतो, आणण्यापासून दिसण्यापर्यंत मनोमन उजळणी असते. कपडे वाळत घालण्याचं कोणतंही श्रेय किंवा क्रेडिट बाई स्वत:कडे घेत नाही. ते तिच्यात उपजत असलं तरी त्यातून स्त्रीमधल्या जन्मजात असलेल्या आणि आजवर दखल न घेतलेल्या व्यवस्थापनकौशल्याची कवयित्री जाणीव करून देत आहे. हर्षदाच्या कवितेतल्या स्त्रीने या जन्मजात गुणांचा जसा स्वीकार केलेला आहे तद्वत होत गेलेलं दुर्लक्षही विनातक्रार स्वीकारलेलं आहे. यातून कवयित्री स्त्रीच्या उदात्त मानसिकतेचं दर्शन घडवते असं म्हणायला हवं. किंबहुना, हर्षदाच्या कविता वर्षानुवर्षं चालत आलेल्या स्त्रीच्या जगण्याच्या प्रातिनिधिक कविता आहेत. म्हणूनच हर्षदाची कविता सभोवताली वावरणाऱ्या, नात्याच्या – आई, आजी, बहीण, काकी, मामी असलेल्या– तसेच कळत– नकळत शेजारपाजारच्यांनाही डोळ्यांसमोर उभं करते. 'झोप' या कवितेत म्हटल्याप्रमाणे पापणी आणि बुबुळांत खूप उशिरापर्यंत अव्यक्त पहारा देणारा अश्रूंचा पडदा आणि बुबुळांवर तिच्या झोपण्याची वाट न पाहता समजूतदार होऊन निजून गेलेली स्वप्नं दिसत राहतात. या कवितेत, स्वतःला विसरून प्रपंचात बुडून गेलेल्या स्त्रीच्या अस्फुट अशा वेदना आहेत. समाजाच्या स्त्रीकडून भरमसाट अशा, आवश्यक आणि अनावश्यक अपेक्षा असतात. तिनं झगमगीत, चकचकीत दिसावं, सुगंधित, मादक असावं, दिसावं वगैरे. कवयित्री स्त्रीला जाणीव करून देते की लिपबाम, लायनर, फेसवॉश, आयशॅडो वगैरे सारं काही वापरून समाजाचे सौंदर्याचे निकष पाळले तरी सगळ्याच्या आत दडलेला तुझा आणि तुझ्यापुरताच असलेला एक चेहराही आहे आणि केवळ तो आणि तोच खरा आहे, ही जाणीव 'बये' या कवितेत करून द्यायला विसरत नाही.

स्त्रीवादी कवितांतून पुरुषसत्ताक समाजरचनेवर, शतकानुशतकं स्त्रीवर झालेल्या आणि अजूनही होणाऱ्या अन्यायावर कवयित्री व्यक्त होत आलेल्या आहेत. स्त्री–पुरुष संसाराची दोन चाकं आहेत याचा स्वीकार करूनही, अन्यायाबद्दल चीड व्यक्त होत राहिली, कडवटपणा येत राहिला. हर्षदा नव्या पिढीच्या स्त्रीचं प्रतिनिधित्व करते, पुरुषी वर्चस्वाबद्दल ती भाष्य करते; पण ते तिच्या स्टाइलनं..'तुम्ही काय करता? काहीच नाही, घरीच असते' हा खरं तर उपहास आहे व्यवस्थेचा तर 'स्वप्नं स्वतःच निजून जातात निमूटपणे' यात संयम असला तरी अगतिकता आहे.


आधीच म्हटल्याप्रमाणे हर्षदाची कविता स्त्रीची, तिच्या संवेदनशीलतेची कविता आहे, समाजातल्या, कुटुंबातल्या, रूढी, परंपरा, इच्छा, आकांक्षा, अपेक्षा, संकेत अशा विविध पेचांत तिच्या मनाचा कोंडमारा होत असतो, बऱ्याच गोष्टी व्यक्त करताही येत नाहीत आणि मग कुठेतरी, विशेषतः पुरुषावर खापर फुटतं. 'खापर' ही कविता म्हणजे

स्त्री–पुरुष संबंधातला तरल पेच आणि स्त्रीनं दाबून ठेवलेल्या नैसर्गिक भावभावनांचं पुरुषावर फुटलेलं खापर आहे. इतकी स्त्रीमनाची घालमेल, अचूक व प्रगल्भपणे, कथेत एकवेळ झालेली दिसत असली तरी, फार कमी कवितांतून व्यक्त झालेली आहे. गंमत म्हणजे स्त्री–पुरुषसंबंधातला तरलपणा, धूसरता हर्षदा सूचकतेनं मांडते. विस्मरणाच्या खपल्या, गतवर्षांची चळत, मनावर साठत गेलेला स्थितप्रज्ञाचा थर, वयानुसार आलेली शिष्टपणाची वलय या सगळ्या गर्दीची नजर चुकवून निसटलेल्या आभाळाच्या इवलाशा तुकड्यात भेटतोच मला चंद्र आणि सगळ्यांची नजर चुकवून भेटतात मला तुझ्या आठवणी.. 'वय' कवितेत वयाचं अंतर मापणाऱ्या समाजात आणि आपल्यात, 'तुझ्या–माझ्या वयाच्या लाखो पटीहून जास्त अंतर आहे' असं सांगतांना 'वय तुझं जास्त नाही, वय समाजाचं कमी आहे' असं समाजाचंच मोजमाप आहे. एक स्त्री म्हणून हर्षदाने स्त्रीच्या जगण्याविषयी लिहावं, पुरुषसत्ताकात होणाऱ्या अन्यायाविषयी लिहावं हे साहजिक आहे, पण म्हणून तिची कविता केवळ स्त्रीच्या जगण्याची नाही, संसार म्हणून ती नाण्याच्या दुसऱ्या बाजूचाही विचार करते. 'पुरुष' या कवितेत ती म्हणते, पुरुष कळत नाही, वळत नाही, पण जळत मात्र राहतो, स्वतःच्या धगीत, 'जन्मभर'. म्हणूनच एकांगीपणे व्यक्त न होता, काहीसं सूचक तरीही बोल्डपणे व्यक्त होणारी ही कवयित्री नव्या पिढीची प्रतिनिधी वाटते.

संवेदनशीलता, परिपक्व वैचारिकता आणि चिंतनशीलता यामुळे हर्षदाचा काव्यप्रवास आत्मपर वैयक्तिकतेकडून मानवी पातळीवर समष्टीकडे जाताना वेगळंच मूल्य शब्दांना आणि शब्दातल्या सूचक अर्थांना देतो. हर्षदाची कविता म्हणजे शब्दांच्या पलीकडे वाचकांच्या मनात अर्थाची रुंजी घालणारी, अर्थाचं मूल्यवृद्धी करणारी कविता आहे. कधी कधी कविता वाचून उलटल्यावर साधलेल्या उपहासाचे अर्थ विचार करायला मजबूर करतात. एक मात्र वाटत राहिलं की इतकं गुणात्मक मूल्य असताना 'झालं का?' अशा काही कविता सहजच गळता आल्या असत्या. असं असलं तरी कवयित्रीकडे नक्कीच स्वतःकडे आणि कवितेकडे पाहण्याची तटस्थता आहे. वांझोटं दुःखच कवितेला जन्म देतं आणि वेदनाच असतात कवितेचा गाभा या प्रगल्भतेतूनच ती स्वतःला विचारते, क्षणाक्षणाला मरणं याशिवाय कविता असतेच काय? एक मात्र खरं की सृजनाचं फुलपाखरू या कवयित्रीच्या हातात आलंय आणि ते एकमेव सगळ्यांपेक्षा वेगळं आहे.


**कपडे वाळत घालणारी बाई**
कवयित्री : हर्षदा सुंठणकर
प्रकाशक : ग्रंथाली
मुखपृष्ठ : सतीश भावसार
पृष्ठे : ९७, मूल्य : रु.१५०

## शब्दसामर्थ्याची श्रीमंती : शब्दांची नवलाई




अक्षरांची फुले, आभाळाचा फळा, खरंच सांगतो दोस्तांनो, गंमत गाणी, तळ्यातला खेळ, पंख पाखरांचे, बोधाई, मज्जाच मज्जा, हसरे घर, सवंगडी, मजेदार गाणी, आनंद झुला अशा बारा बालकविता संग्रहाबरोबरच बालकुमारांसाठी जवळपास तीस पुस्तकांनी ज्या कवीला बालकुमारवर्गानंच नव्हे तर त्यांच्या सुजाण पालकांनीसुद्धा आपल्या हृदयात स्थान दिलं, पसंतीची पावती दिली त्या एकनाथ आव्हाड यांचा 'शब्दांची नवलाई' हा अतिशय आणि बालकुमार वाचकांना आकर्षित करून घेईल असा नवा व तितकाच देखणा संग्रह पुण्याच्या दिलीपराज प्रकाशनानं अलीकडेच प्रकाशित केलेला आहे. मुलांना आकर्षित करणारं मुखपृष्ठ, आतील चित्रं आणि मांडणी संतोष घोंगडे यांची आहे.

अलीकडच्या कवींमध्ये एकनाथ आव्हाड हे आगळं-वेगळं व्यक्तिमत्त्व आहे. मुळात ते उत्तम शिक्षक आहेतच, मुलांशी एकरूप होण्यासाठी लागणारा निरागसपणा, लोभसपणा, आईची माया-ममता हे त्यांचे अंगभूत विशेष आहे. साठ-सत्तरच्या दशकातल्या मुलांचं बालपण चांदोबा, चंपक अशा साहित्यावर तसंच जादू आणि जादूगार, पऱ्या, राक्षस यावर पुष्ट झालं. आता एकविसाव्या शतकातल्या डिजिटल युगात बालकुमारांच्या कल्पनेची क्षितिजं, इंग्रजी भाषा आणि इंग्रजी माध्यमांमुळे विस्तारित साता-समुद्रापार गेलेली असताना मुलांना आकर्षित करू शकणारं, इथल्या मातीतलं, देशी परंपरेतलं, संस्कारातलं तरीही वेगळं म्हणजे मुलांच्या भावविश्वात प्रवेश करणं हे लेखक-कवींसाठी मोठं आव्हान आहे. गंमत म्हणजे मुळात एक आदर्श शिक्षक असल्यामुळे, मुलांना घडवण्याचा लेखक-कवी असल्याचा अभिनिवेश न आणता आव्हाडसर लेखन हे व्रत मानणारे आहेत. एखाद्या आईला मुलांवर प्रेम करायला जसं शिकवावं लागत नाही त्याचप्रमाणे जातिवंत शिक्षकाला विद्यार्थ्यांवर प्रेम करावं हे शिकवावं लागत नाही. आव्हाडसर हे असे जातिवंत, मातृहृदयी आहेत. मुलांबरोबर त्यांचं इथल्या मातीवर, मातृभाषेवर नितांत प्रेम आहे.

'शब्दांची नवलाई' हा आव्हाडसरांचा कवितासंग्रह म्हणजे बालगटातून कुमार अवस्थेत प्रवेश करणाऱ्या बालकुमारांना आणि त्यांच्या पालक/शिक्षकांसाठी भाषिक

समृद्धी आहे, श्रीमंती आहे. बालकुमारावस्था कोणत्याही भाषेची गोडी निर्माण करण्याचा, अभिरुचीसंपन्न करण्याचा काळ. या वयात बिंबवलेली मूल्यं भावी जीवनाची शिदोरी असते. आव्हाडसर केवळ शिक्षक नाहीत तर द्रष्टे आहेत म्हणूनच भाषेतील, व्याकरणातील अनेक संकल्पना, सौंदर्यस्थळं, समानार्थी, समूहवाचक शब्द, वाक्प्रचार, दैनंदिन वापरातील म्हणी, एक शिक्षक म्हणून नाही तर कौटुंबिक पर्यावरण उभं करून दाखवतात. भाषेला फुलवतात या, नव्या-जुन्या म्हणी, भाषेची गोडी वाढवतात, या अनुभवांच्या खाणी खात्रीपूर्वक कवी 'अनुभवांच्या खाणी' या कवितेत सांगताना, कोल्ह्याला द्राक्ष आंबट, खाण तशी माती, शितावरून भाताची परीक्षा, दगडापेक्षा वीट मऊ अशा म्हणींची एक कहाणी गुंफतात. व्याकरण म्हणजे पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्‌गारचिन्ह, क्रियापद, नाम, विशेषणं, भल्याभल्यांसाठी किचकट भाग. चिन्हांचा खेळ, उत्स्फूर्त उद्‌गार, अशा कविता व्याकरणातील क्लिष्टता घालवतात, तर क्रियापद आणि हेतू यातला अंतस्थ संबंध 'बाबा म्हणतात' या कवितेतून ते सहजपणे दाखवतात. 'घरांची नवलाई' या कवितेत कवी प्राणी आणि पक्ष्यांच्या घरांची - सुगरणीचा खोपा, घुबडाची ढोली, पोपटाचा पिंजरा, मुंग्यांचं वारूळ, घोड्याचा पागा, कोंबडीच खुराडं - गुंफण करतो, संग्रहातल्या कवितांचं वाचन आणि त्याचे बालमनावर होणारे परिणाम 'की'ची करामत या कवितेतून मी माझ्या साडेतीन वर्षांच्या नातवावर प्रथम अनुभवले. 'दाराची बहीण कोण, तिला म्हणतात खिडकी, मातीची भांडी कसली, ही तर आहे मडकी' हे वाचून दाखवल्यावर तो आपोआप शब्दांची करामत करू लागला. याचा अर्थ असा नव्हे की शब्दांची नवलाई यात केवळ व्याकरण आहे, 'आई म्हणते'सारख्या अनेक कविता सहज आणि सोप्या भाषेत जगण्याचं मर्म सांगतात. एकनाथ आव्हाड यांच्या आपल्या रसाळ वाणीचं बालकुमारवर्गावर, त्यांच्या पालकांवर विशेष गारूड आहे याचं कारण आव्हाडसरांना बालकुमारांच्या डोळ्यांत त्यांचा भविष्यकाळ दिसतो आणि हेच त्यांच्या कवितेच्या लोकप्रियतेचंही मर्म आहे.


**शब्दांची नवलाई**

कवी एकनाथ आव्हाड

प्रकाशक : दिलीपराज प्रकाशन, पुणे

मुखपृष्ठ - संतोष घोंगडे, पृष्ठे : ६४, मूल्य : रु. १५०

# विजोच्या अंतरंगातले तरंग




'अंतरंगाचे तरंग' हा कवी विजय जोशी (विजो) यांचा नवीन कविता संग्रह डोंबिवलीच्या अथर्व प्रकाशनाद्वारा नुकताच वर्षारंभाला प्रसिद्ध झालाय. संग्रहाचं सुंदर मुखपृष्ठ कवी आणि चित्रकार रामदास खरे यांचं आहे. संग्रहाला कवी प्रसाद कुलकर्णी यांची छोटीशी पण मोजक्या शब्दात मोलाचं सांगून जाणारी प्रस्तावना लाभलेली आहे. चांगला कवी होण्याएवढेच चांगला माणूस असणे महत्त्वाचे आहे, हे सांगताना त्यांनी विजो यांच्या व्यक्तिमत्त्वात आणि त्यांच्या काव्यव्यक्तिमत्त्वातली कॉमन लय व स्वभावतः ऋजू, निर्मळता यांचा तंतोतंत मेळ घातलाय, अद्वैतच सिद्ध केलंय. ज्यांना विजो माहिती आहे त्यांना व ज्यांना विजोच्या कविता माहीत आहे त्या सर्वांना हे चांगलंच परिचयाचं आहे.

'अंतरंगाचे तरंग' या संग्रहात एकूण नव्वद कविता, तीन विभागांत आहेत. वृत्त-छंदविभागात बावन्न, गझलविभागात दहा आणि मुक्तछंद विभागात अठ्ठावीस कविता आहेत. क्रिकेटच्या भाषेत बोलायचं झाल्यास, विजो टी-२०, वन-डे (पन्नास-५०) आणि कसोटी या तिन्ही प्रकारांत लिहिणारा कवी आहे. 'अंतरंगाचे तरंग'मध्ये वृत्तछंद विभागात ५२ कवितांचा एकसंध संच विविध वृत्तांतला आहे. आज कवितेतून छंद, वृत्त कालबाह्य होण्याच्या काळात कवीचा छंद-वृत्ताचा वापर आणि अभ्यास किमान स्वागतार्ह आहे. पहिल्याच 'आम्ही साहित्यिक' या कवितेत 'तुम्ही लेखू नका कधीच हलके आम्हास साहित्यिका' असं झणझणीत अंजन आहे. या ठिकाणी केशवसुतांच्या 'आम्ही कोण' या कवितेची आणि विशेषतः शेवटच्या ओळी 'आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे'ची रचना आणि ॲटिट्यूडच्या अंगाने आठवण होते. मी कंपू केला नाही असं छातीठोकपणे हा कवी सांगतो आणि म्हणूनच साहित्यक्षेत्रातल्या गटातटावर, त्यातल्या त्यात कवितेतल्या गटबाजीवर, 'अहो रूपम अहो ध्वनी' या वृत्तीवर 'कंपूशाही' कवितेत थेट भाष्य करताना कवी म्हणतो इकडूनतिकडून, ओढूनताणून, जोडती रला ट, तत्पर देती टाळ्या, त्यांचेच भाट. त्याचबरोबर काहीतरी सवंग काहीतरी लिहून, पुरस्कार मॅनेज करून साहित्यिक म्हणवणाऱ्यांचा कवींचा समाचार घेताना म्हणतो, 'एक-दोन पुस्तके, सोबती पुरस्कार बुद्रूक, वाटे सारे विश्व ठेंगणे, समजे साहित्यिक'. वृत्त-छंदबद्ध कवितांमध्ये प्रेम, विरह, व्याकुळता, निसर्ग, फुलं, बालपणाचे, विशेषतः गावाकडच्या आठवणी आदी विषयात मुक्त संचार आहे.

किंबहुना, 'सजवत जाऊ कवितेला' या कवितेत कवीनं म्हणूनच ठेवलंय की 'प्रेम असो की निसर्ग, सुंदर सूर्य असो वा चंद्र-तारका, बंधन नाही विषयाला' किंवा 'अक्षरछंदी अभंग, ओवी, वृत्तकाव्य अन् गझल देखणी खेळ खेळू या शब्दांचे'. कवीनं विविध विषयांचं जसं स्वातंत्र्य घेतलंय, तसंच 'व्याकरणाचे नियम पाळूनी, भाषेचे सौंदर्य जपोनी' असं म्हणताना व्याकरणातही स्वातंत्र्य घेतलंय. असं असलं तरी, कौटुंबिक विषयांपासून सदाचार-समुपदेशन, समाजकारण, राजकारण असे विविध विषय या प्रकारात सक्षमपणे कवी हाताळतो. 'मदन मनोहर शामल सुंदर, देवकीनंदन कृष्ण सखा' (जीवनमंदिर) विष्णू सहस्रनामावली वाटत असताना, एकरेषीयकडून एकदम 'दूरवर पर्वत चर्च मठातून मंदिर मस्जिद स्थापियला' हा कवितेचा प्रवास अनुभव, शिक्षण, चिंतन, सद्गुण, जीवन अशी विलक्षण वळणं घेत 'क्षणक्षण उत्तम सुंदर मंगल मार्ग सुखावह ध्यास धरू' अशी दमछाक करतो. विजो यांच्या तरल आत्मपर कवितांतून संवेदनशील मनाचा आविष्कार आहे, यातूनच कधी ते निसर्गात गुरू पाहतात. त्यासाठी मुंग्यांचा दृष्टांत देतात. काहूर, मिठीत घ्या अशा रचना लावणीकडे झुकणाऱ्या आहेत.


संग्रहात एकूण दहा गझला आहेत. त्यामध्ये 'नेते' आणि 'गांधी' या गझलांमधले शेर साहजिकच सामाजिक अंगानं जाणारे आहेत, समकालीन वास्तवावर कोरडे ओढणारे आहेत. 'पुतळ्यांमधून चौकापुरते उरले गांधी आणि लाच पाहुनी नोटेमधुनी हसले गांधी' असा उपहास एका शेरात कवी करतो त्याचवेळी सत्य अहिंसा तत्त्वे 'साऱ्या जगास कळूनही, मला न कळले गांधी' अशी प्रांजळ कबुलीही देतो. मात्र ती केवळ कवीची खंत नसून नव्या पिढीची ती व्यथा आहे असं कवीला सुचवावसं वाटत असावं. एखाद्या क्रिकेटपटूसाठी हुक, लाँग ऑन, लाँग ऑफ असा आवडता शॉट असतो. तसाच काव्यप्रकारात 'बायको' हा विजोचा स्पेशलाइझ मनमोकळेपणा आहे. समजून घ्या समजून घ्या, कशी आहे आपली बायको, लग्नापूर्वी स्वप्नं रंगवली, तेवढी सोपी नसते 'बायको' असं पहिल्या विभागातल्या 'बायको' या कवितेत सांगतो तर दुसऱ्या विभागात, 'बायको' या गझलरचनेत 'का सदा-सारखी बोलते बायको? का विनाकारणी भांडते बायको?' असं सुरुवातीच्या शेरात म्हणताना, 'जर कधी बोललो उलटून मी तिला, सर्व माझ्या चुका वाचते 'बायको', असं उत्तरही देऊन टाकतो आणि हाच तो स्पेशलाइझ मनमोकळेपणा.

मुक्तच्छंदातल्या कवितात कवीच्या भावना, मनासारखी देखणी, कवी मरू द्याचा नव्हता म्हणून, कारण तू कवी आहेस, कवितेचं झाड, आदी कवितांत कवितेविषयी चिंतन आहे. तू सांगून आला असतास तरी, मी नाही म्हटलं नसतं, फक्त एवढंच की, थोडं थांब म्हटलं, असतं ही कविता 'काळ' या संकल्पना आणि प्रत्यक्ष जगण्यातील अपुरेपण, अपेक्षा याबद्दल वाचकाच्याही अंतरंगात हात घालणारी आहे. या विभागात रोजचं जगणं आणि भोवतालचं समाजकारण, राजकारण या विषयांचं मुक्त चिंतन आहे. 'राम-अल्ला-येशू एकरूप होऊन एकाच प्रार्थनास्थळी बसू लागले' असं पहाटेचं स्वप्न

आहे, प्रश्नपत्रिका या कवितेत जीवनाची जटिल उत्तरे शोधण्याचा प्रयत्न आहे. या कवितेत कवी म्हणतो, या साऱ्यांची उत्तरे, शोधायची असतात, संदर्भासहित स्पष्टीकारणानं हे अगदी खरंय, संदर्भ, भाषेचे असो वा इतिहास-भूगोलातले, देशी असो वा जागतिक सांस्कृतिक असो वा धार्मिक-आध्यात्मिक, त्याच्याशी कवीनं प्रामाणिक राहणं, तटस्थ असणं, त्याची छेडछाड न करणं अपेक्षित असतं.

**अंतरंगाचे तरंग**<br>
विजय जोशी (विजो)<br>
अथर्व प्रकाशन, डोंबिवली<br>
मुखपृष्ठ : रामदास खरे<br>
पृष्ठे - १२६, मूल्य - रुपये २००/-

## जगणं सुगंधित करणारी अंजली सावले यांची 'मनमोगरी'




साधं तिनेक तासांच्या प्रवासासाठी जायचं म्हटलं तर किती तयारी करावी लागते आणि प्रवास लांबचा, आठ-दहा दिवसांसाठीचा असला तर विचारायलाच नको. अशाच एका लांबच्या प्रवासाला कवयित्री निघालीय, सगळी तयारी बरोबर हवी असं मनाला निक्षून बजावतेय.. हे राहिलंय, ते राहिलंय उगाच चुटपूट चालायची नाही, जीव अडकवून ठेवायचा नाही, प्रवास लांबचा आहे, सगळी तयारी करून सुद्धा बरोबर काही घ्यायचं नाही, ओझं उगाच वाहायचं नाही आणि शेवटी म्हणते, अगदी शरीर सुद्धा.. वाचक सुन्न होतो. विचार करायला प्रवृत्त होतो. सुन्न अवस्थेतून बाहेर आल्यावर प्रवासाचा पल्ला, आवाका जेव्हा डोळ्यांपुढे उभा राहतो, तेव्हा कवयित्रीची मानसिक तयारी, परिपक्वता थक्क करून जाते. 'प्रवास' शीर्षकाची ही कविता कवयित्री अंजली सावले यांच्या अष्टगंध प्रकाशनाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'मनमोगरी' या कविता संग्रहातील आहे. संग्रहाला प्रस्तावना ज्येष्ठ कवी नारायण लाळे यांची लाभलीय. हिंदुस्थानी संगीतातले ज्येष्ठ गायक पंडित अजय चक्रवर्ती याचे गाण्यासंबंधीचे विचार त्यांनी प्रस्तावनेत उधृक्त केलेले आहेत - हवेला

दिलेला आकार म्हणजे गाणे, आपला उच्छवास म्हणजे गाणे - हाच धागा पकडून ते म्हणतात की शब्दांना दिलेला आकार म्हणजे कविता. किती अर्थपूर्ण आहे हा विचार. खरं तर कवी शब्दांमध्ये प्राण फुंकत असतो. सप्तशतीमध्ये असं म्हटलंय की शब्द ज्ञानरूपिणी होतांना प्राणांना प्रतिष्ठा देतात. कवयित्री अंजली सावले यांच्या 'मनमोगरी' संग्रहातील कविता, कवयित्रीने शब्दांत पंचप्राण फुंकल्यामुळे चिन्मयानंदाचा अनुभव देतात.

कवयित्री अंजली सावले यांचे पाच कवितासंग्रह प्रकाशित आहेत आणि मनमोगरी' हा त्यांचा सहावा कवितासंग्रह. त्यांना कवितेबरोबरच चित्रकलेचीही आवड आहे. कवितेतून उतरतं ते शब्दचित्र आणि कुंचल्यातून येतं चित्रकाव्य, एकाच व्यक्तिमत्त्वात दडलेलं शब्द-चित्राचं अद्वैत. म्हणूनच 'मनमोगरी' या संग्रहातल्या कविता म्हणजे सहस्रचंद्रदर्शनासाठी निघालेल्या कवयित्रीच्या प्रतिभेचा कळस आहे. या संग्रहात एकूण सत्तर कविता आहेत. कविता अल्पाक्षरी आहेत. त्या कधी आयुष्याला, कधी निसर्गाला, कधी स्त्रीजाणीवांना गवसणी घालतात तर कधी मीरेच्या समर्पित भावनेने निळ्यासावळ्या कान्हासमोर आत्मार्पण. निसर्गाच्या अनेक प्रतीमात त्या सर्वसामान्य स्त्रीच्या, गृहिणीच्या जाणिवांचं प्रतिबिंब पाहतात. कविता त्यांची  सखी आहे, सुख आहे, स्वर्ग आहे. 'नाचून गाऊन रिझवते, प्रेमे मला जोजवते/देऊन पंख आशेचे उंच नभी घेऊन जाते' (कविता सखी). कवितेबद्दलची अपार आत्मीयता असल्यामुळेच आशावाद, सकारात्मकता हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. त्यांच्या कविता वाचतांना मनात येतं, कुठून आली सकारात्मकता. खरं तर आपलं सगळं जगणं आपल्या अनुभवाचा अर्क असतं, 'मातीचे बळ' या कवितेत त्या म्हणतात 'फुटली लाट खडकावर, दु:ख  कुणा सांगत नाही, उठली कळ अंतरात, दृष्टीस कोणा पडत नाही/जावी आत विरत विरत, डोळा पाणी आणू नये, जिरले पाणी आत ते, पुन्हा लाट होत नाही/ सरल जीवन त्याची खंत, माती केव्हा करत नाही, मातीचे बळ मानस येता, सराई ती सरत नाही' केवढ मोठं तत्वज्ञान या ठिकाणी कवयित्री नोंदवतेय.

'पाटी' या कवितेत कवयित्रीचं काव्यव्यक्तिमत्व बहिणाबाईच्या कवितेइतकं साधं-सोज्वळ वाटत राहतं. संपूर्ण कविता म्हणजे जीवनाच्या जात्यातून दळलेलं अनुभवाचं पीठ. सुरुवात करतांनाच त्या म्हणतात : एकदा सांगितलं ना, पुसून टाक ती पाटी, गिरवतेस कशाला? ही अधिकारवाणी अनुभवातून आलेली आहे. त्या म्हणतात, या पाटीवर, दु:खद आठवणी गिरवून गिरवून आता काहीच दिसेनासं झालंय, बाहेर गळणाऱ्या पागोळ्याखाली धरून आण ती. तुझ्या हातात ज्ञानाची पाटी आहे, बुद्धीची पेन्सिल आहे. पाटी धीराने स्वच्छ पूस, चैतन्याच्या उन्हात धर.. या उन्हात जीवनाचं कोणतही चित्र काढू शकतेस. कवितेतल्या साऱ्या प्रतिमा दररोजच्या आहेत,

धीराने आनंद वेचायला शीक'. पाटीच्या प्रतीकातून सकारात्मकतेचा मोठाच संदेश कवयित्री देत आहे. संसार म्हणजे आहे तरी काय - एक भातुकलीचा खेळ. यातली चूल, बोळकी, बाहुला-बाहुल्या सारं खोटंच, पण याचा वास्तव जीवनाशी संबंध जोडत, स्त्री जाणीवेने, कवयित्री म्हणते, पुरे जाहली भातुकली गं, आवर आता खेळाला, लुटुपुटूचे आहे सारे, जाऊ आपल्या घराला. या ठिकाणी मायेत अडकणं व्यर्थ आहे असं सूचित करतांना, प्रतिमा आणि प्रतीकांचा वापर करताना, 'चट्टामट्टा' शब्दातून व्यर्थता अधिकच गडद करतात. अशाच प्रकारे, पतंग या प्रतीकातून कवयित्री मृत्यूकडे आनंदाने पाहण्याचं जसं सूचित करते त्याचप्रमाणे पतंग उडवण्यामधले सर्व तपशील म्हणजे, मांजा, फिरकी, ढील हे वापरत असतांना विचारांचा दोर, भावनेचा पतंग, मनाचे आकाश, देहाची फिरकी अशा प्रतिमांनी पतंगाच्या खेळातली गंमत वाढवतात, पतंगाच्या प्रतीकातून कविता वेगळ्याच उंचीवर नेतात, आयुष्य म्हणजे पतंग बदवणे, विचारांच्या दोराचा मांजा, मनाच्या आकाशात भावनेचा रंगबिरंगी पतंग, कधी ढील देऊन खाली तर कधी कधी उंच उंच बदवायचा आणि मग देहाची फिरकी खाली ठेवायची..

सावले यांची कविता प्रतिमा आणि प्रतीकातून जीवनविषयक तत्त्वज्ञान सहज-साधेपणे, मानवी भाववृत्तीशी, सुखदुःखाशी समरसून मांडते, संग्रहाच्या 'मनमोगरी' शीर्षकावरूनच कवयित्री निसर्गाशी जोडली गेल्याचे सूचित होते. साहजिकच जाई-जुई, निशिगंध, चमेली, सुरंगी, बकुळ, कमलिनी अशा नानाविध फुलांचा उल्लेख त्यांच्या 'उतरती उन्हे' सारख्या इतर अनेक कवितांना सुगंधित करून जातो. कवयित्री आपल्या कविता लेखनात जितक्या सहज आहेत, तितक्याच सजगही आहेत. 'विठ्ठल' या कवितेत, 'आपण असतो माठ मठ्ठ, विठ्ठल असतो पाणी पुष्ट' असा शब्दांशी खेळ करतात. 'वाट रुपेरी' या कवितेत त्या नकळत योग मार्गातल्या, कुंडलीनिशी संबधित 'नवद्वार' या संकल्पनेचा, मिथकाचा वापर करतात आणि तो संदर्भ ध्यानात येताच, माऊली आठवते, आत्मपर कविता 'विश्वात्मके देवे' अशी अनुभूती देऊन जाते. झाडं भेटली म्हणजे मला आपलं कुणी भेटल्यासारखं वाटतं' असं 'अपार सुख' या कवितेत सावले म्हणतात. त्यांच्या सोज्वळ व्यक्तिमत्त्वासारखेच त्यांचे शब्द वडिलधाऱ्याने समजावून देलेले जीवनाचे अर्थ वाटतात आणि म्हणूनच, सावले यांची कविता म्हणजे साध्या-सोप्या शब्दातून, जीवनाचा घेतलेला शोध आणि बोध आहे.

**मनमोगरी**

अंजली सावले, अष्टगंध प्रकाशन

मुखपृष्ठ : शिवकुमार, पृष्ठ : ८४, मूल्य - रुपये १५०/-

## अभिप्राय

Received three copies of the Diwali issue you had sent.
The issue is excellently brought out.
You deserve full credit as its editor.

**डॉ. गणेश देवी**

---

मा. श्री. नारायण लाळे
संपादक, साहित्य - दिवाळी २०२१
बोलीभाषा विशेषांक,
आदरपूर्वक नमस्कार.

मुंबई मराठी साहित्य संघाचा 'साहित्य' दिवाळी २०२१चा सर्वांगसुंदर बोलीभाषा विशेषांक मिळाला. मालवणी, अहिराणीदी मराठीच्या विविध बोली आणि बोलींतील साहित्याने उजळलेला अंक कुणालाही आवडेल असाच आहे. बोलींच्या रंगात रंगलेल्या साहित्य विशेषांनी मन आनंदित झाले.

बोलींचा हा 'मंडप' आपण विशेष मेहनत घेऊन उभा केला आहे. बोलींवरील दर्जेदार अंक म्हणून 'साहित्य' दिवाळी २०२१ कायम संग्रही राहील.

आज महाराष्ट्रात नव्हे तर जगभरातील अनेक बोलींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अशा विपरीत परिस्थितीत आपण काढलेल्या बोलीभाषा विशेषांकाचे महत्त्व असाधारण आहे.

कोणतीही बोली आपापली सांस्कृतिक परंपरा दाखवत येते. ही परंपरा त्या त्या बोलक समाजाचा स्वतःचा असा इतिहास, भौगोलिक तसेच व्यावसायिक पैस अशा अनेक गोष्टींशी नाते सांगत असते. मराठीच्या विविध बोलींच्या अभ्यासातून महाराष्ट्राची सूक्ष्मदर्शी ओळख होऊ शकते. पण त्यासाठी प्रथम बोली जगल्या पाहिजेत. बोलीभाषांची काळजी घेणारी एखादी संस्था असावी, हे आपले म्हणणे रास्त आहे. 'साहित्य'चा दिवाळी अंक ही आपण त्या दिशेने केलेली महत्त्वाची कृती आहे. डॉ. गणेश देवी यांचे बोलींवरील योगदान मोठे आहे.

डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. हरिश्चंद्र बोरकर आणि अशा अनेक अभ्यासकांनी आपापल्या लेखांमधून वेगवेगळ्या बोली बोलणाऱ्या बोलकांच्या समाजजीवनाबद्दलचे तसेच आसपासच्या प्रादेशिक भाषिक भवतालाबद्दलचे कुतूहल शमवले आहे. निखिल

बेल्लारीकर यांच्या लेखाने तंजावरच्या मराठी बोलीची छान माहिती दिली आहे.

मनीष पाटील यांचा 'बोलीभाषेतील कथाविश्व' हा वेगळ्या अंगाने धांडोळा घेणारा लेखही लक्षवेधी वाटला. मराठीच्या सांकेतिक आणि गुप्त बोलींची माहिती रंजक आहे. अंकात ठिकठिकाणी दिसणाऱ्या चौकटींमधील माहिती वेधक वाटली.

लेखांमधील विविधता आणि विषयपरत्वे असलेले वेगळेपण व महत्त्व पाहिले तर आपल्या संपादनकौशल्याला मनःपूर्वक दाद दिलीच पाहिजे. आपण हा अंक खूपच सुंदर रीतीने सजवला आहे म्हणण्यापेक्षा घडवला आहे, असे मी म्हणेन.

या अंकातील बोलींमध्ये वाडवळीचा समावेश मला खूप आनंद देत आहे. वाडवळीवरील तिन्ही साहित्यविशेष आवडले. 'गंधाली'कार म. के. वर्तक यांचा अभ्यासपूर्ण लेख अंकाची शोभा वाढवत आहे

वाडवळी लेखनासाठी आपण मला सहभागी करून घेतल्याबद्दल आनंद झाला. मी अंतःकरणपूर्वक आपली आभारी आहे.

'साहित्य'चा हा बोलीभाषा विशेषांक पुस्तकरूपाने प्रसिद्ध व्हायला हवा. बोलींवर प्रेम करणाऱ्या तसेच बोलींचा अभ्यास करणाऱ्या अनेकांना तो लाभदायी ठरेल यात शंका नाही.

लोभ आहे, तो वृद्धिंगत व्हावा. या प्रकारची संधी आपण मला यापुढेही द्यावी, अशी विनंती करते.

धन्यवाद.

**प्रा. स्मिता पाटील,** केळवे

---

नमस्कार, 'साहित्य'चा बोलीभाषा दिवाळी अंक फार चांगला झाला आहे. वेगवेगळ्या अंगांनी विविध भाषांचे रंग-अंतरंग त्यातून उलगडले गेले आहे. महत्त्वाचा नि संग्रही ठेवावा असा अंक वाटला. मनापासून अभिनंदन तुमचे नि नारायण लाळे यांचे!


**– मोनिका गजेंद्रगडकर**

---

**वाचक, वर्गणीदार यांना नम्र विनंती**

'साहित्य' त्रैमासिक दर्जेदार लेखनाला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करत आले आहे. यातील सातत्य टिकवण्यासाठी लेखनाची जशी गरज असते तशी वाचकाचीही गरज असते- विचार व साहित्यकला यांच्या सृजन-संवर्धनासाठी आपल्यासारख्या वाचकांची, वर्गणीदारांची 'साहित्य'ला गरज आहे - वर्गणी कुठल्याही अंकापासून भरता येते.

# पुरस्कार / अभिनंदन / नवे काही




## अक्षरबंध फाउंडेशन पुरस्कार

अक्षरबंध फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय दिवाळी अंक २०२१ स्पर्धेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला आहे. वाचन चळवळीत शतकोत्तर परंपरा असलेल्या दिवाळी अंकाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कोरोनाकाळातही आपण दिवाळी अंकाची परंपरा यशस्वीरित्या चालवली, त्याबद्दल प्रथमत: आपले हार्दिक अभिनंदन! आपल्या साहित्यसेवेचा गौरव व्हावा म्हणूनच अक्षरबंध परिवाराने या उपक्रमाची सुरुवात केली आहे. महाराष्ट्रातील विविध दिवाळी अंकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आम्हाला आपणास कळविताना आनंद होतो आहे की, आपल्या 'साहित्य' दिवाळी अंकाची मान्यवरांनी उत्कृष्ट विषय दिवाळी अंक म्हणून निवड केली आहे. त्याबद्दल संपादक म्हणून आपले व साहित्य संघाचे अक्षरबंध परिवारातर्फे मन:पूर्वक अभिनंदन.

---

संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार, समृद्धी प्रकाशन, 'विदर्भ-साहित्य आणि ऊर्जा' या ललितसाहित्य संग्रहास प्राप्त.

**सौ. रेखा नार्वेकर**

---



सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मराठी भाषा विभाग

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

### स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२०

स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार या योजनेअंतर्गत **बाल** विभागातील **कविता** या वाङ्मय प्रकारासाठी दिला जाणारा **बालकवी** पुरस्कार **'शब्दांची नवलाई'** या साहित्यकृतीसाठी **श्री. एकनाथ आव्हाड** यांना प्रदान करण्यात येत आहे.

**हार्दिक अभिनंदन !**

**सुभाष देसाई**
**मंत्री,**
**मराठी भाषा**

**सदानंद मोरे**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**

**विश्वजीत कदम**
**राज्यमंत्री,**
**मराठी भाषा**

मुंबई,
दिनांक : २७-०२-२०२२

## प्रा. प्रतिभा सराफ यांची नवी ग्रंथसंपदा, पुरस्कार आणि सन्मान

१. कवितासंग्रह : उमलावे आतुनीच..., प्रकाशक : ग्रंथाली
(प्रकाशन दिनांक २५ डिसेंबर २०२१)
२. बालवाङ्मय : (बालकथासंग्रह): मिठू मिठू..., प्रकाशक : व्यास क्रिएशन्स
(प्रकाशन दिनांक : ३ डिसेंबर २०२१)
३. बालवाङ्मय: (बालएकांकिकासंग्रह): आनंद, प्रकाशक: डॉ. निशिगंधा वाड एज्युकेशन कल्चरल ट्रस्ट आणि भरारी प्रकाशन
(प्रकाशन दिनांक : १८ जानेवारी २०२२)
४. 'नाती' या कथेवर आधारित नाटकाला लेखनाचे दुसरे पारितोषिक १३ डिसेंबर २०२१
५. शब्दवेल साहित्यसंमेलनाध्यक्ष, अमरावती (२६ डिसेंबर २०२१)

## कलाश्रमचा 'अव्वल पुरस्कार' प्रदान

स्वातंत्र्यसैनिक डॉ. परशुराम पाटील कलाकेंद्राच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या 'कलाश्रम'च्या वतीने देण्यात येणारा 'अव्वल पुरस्कार' ज्येष्ठ नाट्यकर्मी उपेंद्र दाते यांना एका सोहळ्यात प्रदान करण्यात आला. रंगभूमीवर त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाचा सन्मान म्हणून त्यांना या पुरस्काराने यंदा गौरवण्यात आले. पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाला बी.वाय. पाध्ये पब्लिसिटीचे संचालक विजय पाध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.
(श्री. उपेंद्र दाते हे मुंबई मराठी साहित्य संघ-नाट्यशाखा सदस्य आहेत.)

## 'साहित्य' त्रैमासिकासाठी साहित्य पाठवण्याबाबत सूचना

- 'साहित्य'करिता लेखन पाठवताना, टंकलिखित अथवा संगणकाद्वारे मुद्रित केलेले असावे. लिखित स्वरूपात असल्यास, सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले असावे.
- लेखन narayanlale@gmail.com अथवा sahityasangha@gmail.com किंवा संपादकीय पत्त्यावर पाठवावे.
- सृजनात्मक, संशोधनात्मक लेखनाचे तसेच दर्जेदार, वैचारिक, ललित लेखनाचे स्वागत आहे.

**मुंबई मराठी साहित्य संघ**
**साहित्य शाखा सभा**
**दिनांक २२ जानेवारी २०२२**
**स्थळ : झूमद्वारे**

# इतिवृत्त

गेल्या दीड वर्षात कोरोनामुळे साहित्य शाखेची सभा घेता आली नाही. कार्यक्रमही 'ऑफलाइन' करू शकलो नाही व अजूनही कार्यक्रम होतील की नाही माहीतही नाही. त्यामुळे साहित्य शाखेची ही पहिलीच सभा आहे असे सांगून डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांनी सर्वांचे स्वागत केले. कोरोनाच्या काळात खूपच मान्यवरांचे निधन झाले आहे. त्या सर्वांची नावे आता सांगता येणार नाहीत. पण मुंबई मराठी साहित्य संघाच्या श्रीमती कीर्ती शिलेदार व श्री. रायकर व इतर मान्यवरांना श्रद्धांजली वाहून सभेला सुरुवात करण्यात आली.

गेल्या वर्षी ऑफलाइन कार्यक्रम करता आले नसले तरी ऑनलाइन कार्यक्रम केले. त्यासाठी साहित्य शाखेचे सदस्य प्रा. प्रतिभा बिस्वास, प्रा. प्रतिभा सराफ, श्री. एकनाथ आव्हाड, डॉ. अनुपमा उजगरे तसेच प्रा. नरेंद्र पाठक या सर्व सदस्यांनी कार्यक्रम करायला मदत केली. कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे आपल्याला अजूनही ऑनलाइन कार्यक्रम घ्यावे लागतील. पुढील ऑनलाइन कार्यक्रम करण्यासाठी एक समिती नेमली त्यात जी तरुण लोक आहेत, ज्यांनी ऑनलाइन कार्यक्रम केले आहेत त्यात तीन नावे पुढीलप्रमाणे :

१. श्री. एकनाथ आव्हाड
२. श्रीमती प्रतिभा बिस्वास
३. श्रीमती प्रतिभा सराफ

या नावांव्यतिरिक्त इतर नावे सुचत असतील तर ती सुचवावीत कारण यापुढील सहा महिने, महिन्याला एक कार्यक्रम करावा व सर्वानुमते कार्यक्रम ठरवून डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांना कळवावा, असे ठरले. या कार्यक्रमाबाबत सर्व सदस्यांनी आपापली मते मांडली. प्रा. प्रतिभा बिस्वास याचे असे म्हणणे की एक ग्रुप तयार करून त्यावर चर्चा करावी. या ग्रुपमध्ये उषाताई व उज्ज्वलाताईपण असतील. ती चर्चा सर्वांनाच समजेल. या समितीतील प्रत्येक सदस्याने कार्यक्रम करावा. श्रीमती रेखा नार्वेकर यांच्या मते

गुगल मीटचा प्रत्येकांनी ॲप घ्यावा. त्यावर लोक ऐकू शकतात व त्याला झूम ॲपसारखं पंचेचाळीस मिनिटांचे बंधनही नसते. श्रीमती प्रतिभा बिस्वास म्हणाल्या, झूम ॲप सोयिस्कर पडते. त्यांच्याकडे चोवीस तास झूम आहे. साहित्य संघाचे कार्यक्रम त्यावर करता येतील. श्री. आव्हाड म्हणाले, गुगल मीट मोफत आहे. आपण त्यावरसुद्धा ध्वनिमुद्रण करू शकतो.

या सर्व मुद्यांवर समितीत चर्चा करण्याचे ठरले. डॉ. अश्विनी म्हणाल्या, आपण ध्वनिमुद्रण केलेले कार्यक्रम यूट्यूब, फेसबुक व वेबसाईटवर घालू शकतो.

यासंदर्भात चर्चा करून श्री. प्रकाश पागे यांना खर्चाचा अंदाज देण्याचे ठरले.

पन्नास टक्के लोकांच्या उपस्थितीची अट असल्यामुळे महानगर संमेलन किंवा महाविद्यालयीन संमेलन यावर्षी आपण घेऊ शकणार नाही.

'साहित्य' दिवाळी अंकाची जबाबदारी श्री. नारायण लाळे यांनी घेतली व ती जबाबदारी घेऊन त्यांनी अतिशय उत्तम रीतीने अंक काढला. म्हणूनच त्यांना साहित्य अंकाची जबाबदारी घेऊ शकाल का, असे विचारले. त्यांनी जबाबदारी घेण्यास होकार दिला. त्यांचे कार्यवाहांनी आभार मानले. त्यांचा दुसरीकडे कार्यक्रम चालू असल्यामुळे ते सभेला उपस्थित राहू शकले नाहीत. या कामासाठी त्यांना एक मदतनीस द्यावा असे ठरले. याबाबत श्रीमती रेखा नार्वेकर यांचे नाव सुचवण्यात आले. याला सर्वांची संमती मिळाली.

कोरोनाच्या काळात साहित्य शाखेच्या सदस्यांनी खूप कार्यक्रमांत भाग घेतला. काहींनी स्वत: कार्यक्रम केले, तसेच अनेकांनी पुरस्कारही मिळवले. यात प्रा. प्रतिभा सराफ, प्रा. प्रतिभा बिस्वास, श्री. एकनाथ आव्हाड व श्रीमती अनुपमा उजगरे या सर्व सदस्यांचे डॉ. मेहेंदळे यांनी मनापासून अभिनंदन केले. तसेच, या कठीण काळात प्रा. सुहासिनी कीर्तिकर व जयकरबाईंनी अमराठी वर्ग यशस्वीरीत्या चालवले. त्यांचेही अभिनंदन केले. या दोन्ही महत्त्वाच्या गोष्टी ऑनलाइन चालू राहिल्या.

१ एप्रिलपासून अखिल भारतीय साहित्य महामंडळ आपल्याकडे येत आहे. त्यासाठी डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांच्या नावाला मान्यता दिली. त्यामुळे साहित्य शाखेच्या कार्यवाहांनी पदाधिकाऱ्यांशी बोलून ज्येष्ठतेच्या दृष्टीने श्री. अशोक बेंडखळे यांचे नाव सुचवले. या नावाला कोणाची हरकत आहे का विचारले असता, या नावाला सर्वांनी मान्यता दिली.

सौ. रेखा नार्वेकर यांनी गडकरी यांचे साहित्य आपण गोळा केले आहे, त्या संदर्भात लोक आपल्याला विचारात आहेत. श्री. लाळे यांच्याशी यावर बोलून श्रीमती

रेखा नार्वेकर, प्रा. उषा तांबे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे व श्री. नारायण लाळे यांची सभा ठरवून बोलू व त्यात गडकरींवर कार्यक्रम करायचे ठरले. बोलीभाषेचे आपल्याकडे किती अंक आहेत? त्याचे वाटप कसे करता येईल? कारण ते जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचले पाहिजेत असे डॉ. अश्विनी म्हणाल्या. ते अंक वाचनीय आहेत, ते वाचनालयाला पाठवले पाहिजेत. तसेच, 'बालसाहित्य स्वरूप आणि व्याप्ती' ही पुस्तकेसुद्धा वेगवेगळ्या वाचनालयांना व कॉलेजांना दिली पाहिजेत कारण अभ्यासात तो एक विषय आहे, असे डॉ. मेहेंदळे म्हणाल्या. श्री. आव्हाड म्हणाले, की बालसाहित्याचे पुस्तक आपण विद्यापीठाच्या मराठी विभागाला पाठवले पाहिजे. त्यांनी चौकशी केली असता बालसाहित्याचा अंक साहित्य अकादमीलासुद्धा मिळाला नाही असे समजले. हे अंक कोणाला पाठवायचे आहेत, त्यांचे पत्ते सांगितले तर ते कार्यालयातून पाठवायची व्यवस्था करू असे ते म्हणाले. तसेच, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या बऱ्याच शाखा आहेत त्यांनाही आपण पाठवू शकू.

सौ. रेखा नार्वेकरांच्या मते शांता शेळके यांचा कार्यक्रम ऑनलाइन करायला हरकत नसल्याचे सांगितले. त्यांच्यावर दीड तास कार्यक्रम होऊ शकतो. त्यांचे साहित्य खूपच आहे. त्यांच्या कविता घेऊनसुद्धा त्यावर एक तास कार्यक्रम करण्याचे ठरले व हा कार्यक्रम आपणच केल्यामुळे मानधन न घेता करू शकतो. श्री. पागे यांच्याशी डॉ. मेहेंदळे यांचे बोलणे झाले असता थोडेफार मानधन देऊ शकतो, असे सांगितले. फेब्रुवारीमध्ये हा कार्यक्रम करण्याचे ठरले.

डॉ. अनुपमा उजगरे म्हणाल्या, की आपल्याकडे प्रकाशनविश्व डायरी आहे व त्यात सर्व साहित्यिक, प्रकाशक, वाचनालये, कवी यांचे पत्ते व फोननंबर आहेत. त्याआधारे आपल्याला सर्व अंक पाठवता येतील.

डॉ. अश्विनी भालेराव यांनी सूचना केली की आपण सर्वांनी साहित्य संघाचे यूट्यूब चॅनेल सबस्क्राइब करावे. तसेच, फेसबुक, वेबसाइट यांचीसुद्धा लिंक सर्वांना पाठवावी, जेणेकरून आपले कार्यक्रम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचतील.

शेवटी डॉ. मेहेंदळे यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपवली.

**– सौ. उज्ज्वला मेहेंदळे**
कार्यवाह–साहित्य शाखा

# साभार पोच

● **मनमोगरी**
अंजली सावले, अष्टगंध प्रकाशन, मीरा रोड, ठाणे - ४०११०८
मुखपृष्ठ - शिवकुमार, पृष्ठ - ८४, मूल्य रु. १५०/-

● **कपडे वाळत घालणारी बाई**
हर्षदा सुंठणकर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई -४०००१६
मुखपृष्ठ - सतीश भावसार, पृष्ठ - ९९, मूल्य रु. १५०/-

● **बाई शेवंती फुललेली (चंदगड परिसरातील लोकगीत)**
गोपाळ गावडे, मनोकामना प्रकाशन, सांगली
मुखपृष्ठ - मिलिंद यादव, पृष्ठ - १७६, मूल्य रु. २००/-

● **नाही गिरवता येत कुठलीच लिपी**
डॉ. सौ. स्मिता पाटील, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई - ४०००१६
मुखपृष्ठ - शिरीष घाटे, पृष्ठ - १०२, मूल्य रु. १५०/-

● **अंतरंगाचे तरंग**
विजय जोशी (विजो), अथर्व प्रकाशन, डोंबिवली
मुखपृष्ठ - रामदास खरे, पृष्ठ - १२६, मूल्य रु. २००/-

● **पांढरे कावळे**
साहेबराव ठाणगे, संवेदना प्रकाशन, पुणे - ४११०३३
मुखपृष्ठ - सतीश भावसार, पृष्ठ - ८०, मूल्य रु. १२५/-

● **सोयरे सकळ**
साहेबराव ठाणगे, संवेदना प्रकाशन, पुणे - ४११०३३
मुखपृष्ठ - संतोष घोंगडे, पृष्ठ - १५०, मूल्य रु. २००/-

● **रानपाखरं**
मालती सेमले, यशोदीप पब्लिकेशन, पुणे - ४११०३०
मुखपृष्ठ - प्रदीप खेतसकर, पृष्ठ - ४३, मूल्य रु. १२५/-

● **जगण्याचे आर्त**
विजय सावंत, प्रभा प्रकाशन, कणकवली - ४१६६०२
मुखपृष्ठ - संदेश भंडारे, पृष्ठ - १११, मूल्य रु. १६०/-

● **शब्दांची नवलाई (बालकवी पुरस्कार प्राप्त - २०२०)**
एकनाथ आव्हाड, दिलीपराज प्रकाशन, पुणे
मुखपृष्ठ - संतोष घोंगडे, पृष्ठ - ६४, मूल्य रु. १५०/-

● **.... आतल्या विस्तवाच्या कविता**
संजय चौधरी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई - ४०००१६
मुखपृष्ठ - अन्वर हुसेन, पृष्ठ - १२३, मूल्य रु. १५०/-

● **शब्द जायबंदी होण्याचे दिवस**
योगिनी सातारकर-पांडे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
मुखपृष्ठ - चारुदत्त पांडे, पृष्ठ - १२०, मूल्य रु. १५०/-

● **सोन्याचा धूर (वैभव प्राचीन भारताचे)**
नितीन लाळे, विद्या-वैभव प्रकाशन, पुणे ४११०३०
पृष्ठ - ३६४, मूल्य रु. ४००/-

● **मेळघाटच्या कविता**
श्रीकृष्ण राऊत, संवेदना प्रकाशन, पुणे ४११०३३
मुखपृष्ठ - जयंत गायकवाड, पृष्ठ - १०४, मूल्य रु. १५०/-

● **वेदनेची वीणा**
भाऊ विशे, सृजन संवाद प्रकाशन, ठाणे ४००६०२
मुखपृष्ठ - अश्विनी खटावकर, पृष्ठ - ८८, मूल्य रु. १७५/-

# मुंबई मराठी साहित्य संघ

**विश्वस्त** : श्रीमती विजया दिवेकर, श्री. प्रवीण काटवी,
श्री अभिजित गजेंद्रगडकर, श्री. अभय भालेराव

**अध्यक्ष** : श्रीमती अचला जोशी

**उपाध्यक्ष** : श्री. माधव खाडिलकर, श्री. अशोक कोठावळे,
श्री. गंगाराम गवाणकर, श्रीमती रजनी जोशी,
डॉ. मधुकर केशव वर्तक, श्री. जयंत सावरकर

**नियामक मंडळ सदस्य** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे,
श्री. सुभाष भागवत, प्रा. सुहासिनी कीर्तिकर,
श्री. अशोक बेंडखळे, श्री. चंद्रशेखर गोखले,
श्री. स्वामीकुमार बाणावलीकर, श्री. पद्माकर शिरवाडकर,
प्रा. प्रतिभा बिश्वास, श्री. एकनाथ आव्हाड, प्रा. नरेंद पाठक,
श्री. प्रमोद पवार, प्रा. प्रतिभा सराफ, श्रीमती सावित्री हेगडे,
श्री. दिलीप भाटवडेकर, श्रीमती शकुंतला मुळ्ये,
श्री. विलास म्हामणकर, श्री. सुधीर ठाकूर,
डॉ. अश्विनी भालेराव गांधी, श्री. रोहिदास पांगे,
श्रीमती रेखा नार्वेकर, श्रीमती शैलेजा म्हात्रे, श्री. मनोहर सोमण,
श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, श्री. यशवंत भिडे,
डॉ. अनुपमा उजगरे, डॉ. दीपक पवार, डॉ. सुरेखा सबनीस,
श्री. नारायण लाळे, श्री. अनंत दाभोळकर, श्री. सतीश सामंत,
श्री. अनिल गचके, श्री. सारंग दर्शने, श्री. सिद्धार्थ पारधे,
श्री. दिवाकर नातू, श्री. ज्ञानेश पेंढारकर

**स्वीकृत सदस्य** : श्रीमती मीनाक्षी जयकर, श्री. आमोद उसपकर

**सन्माननीय सल्लागार** : श्री. जयराज साळगावकर, श्री. दिनकर गांगल, श्री. प्रसाद कांबळी

**कार्यकारी मंडळ** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. अश्विनी भालेराव गांधी,
श्री. सुभाष भागवत, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. प्रमोद पवार,
प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. मनोहर सोमण,
श्री. अशोक बेंडखळे, श्री. रोहिदास पांगे,
श्री. सुधीर ठाकूर, श्री. एकनाथ आव्हाड

# गंधाली

अ - ९, दहिसर दर्शन, मराठा कॉलनी, देसाईजी रस्ता, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८
भ्रमणध्वनी - ९७०२७५२५२१



सप्रेम नमस्कार,

**'गंधाली' वार्षिक आयोजित 'गिरिजा कीर कथास्पर्धा-२०२२'**

सुप्रसिद्ध साहित्यिका गिरिजा कीर या गंधाली दिवाळी वार्षिकाच्या पहिल्या अंकापासून, म्हणजे गेली तेहतीस वर्षे लेखिका होत्या. कथा, कादंबरी, ललित, गद्य असे विविध स्वरूपाचे लेखन त्यांनी गंधालीसाठी केले आहे. साहित्यातील त्यांचे योगदान सर्वश्रुत आहे. अशा सिद्धहस्त ज्येष्ठ लेखिकेचा सन्मान करण्यासाठी आम्ही ही योजना कार्यान्वित करीत आहोत.

स्पर्धेसाठी कथा पुढील नियमावलीला अनुसरून ३० एप्रिलपर्यंत आमच्या हाती यावी.

- कथा फुलस्केप कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेली असावी.
- कागदाच्या दोन्ही बाजूंना समास सोडलेले असावेत.
- कागदावर एक ओळ सोडून कथा लिहिलेली असावी. दोन्ही ओळींमध्ये एक ओळ कोरी असावी. लिखाण शुद्धलेखनाबरहुकूम असावे.
- कथेची मूळ प्रत पाठविणे. झेरॉक्स प्रत/कार्बन प्रत पाठवू नये.
- साहित्यासोबत विनंतीपत्र आवश्यक. त्या पत्रात लेखकाचा पूर्ण पत्ता व पाठवीत असलेली कथा या अगोदर कुठेही प्रकाशित झालेली नाही ह्याची हमी असावी.
- स्पर्धेसाठी कथा ३० एप्रिलच्या आत मिळावी.
- सोबत दोनशे रुपयांचा धनादेश 'गंधाली' या नावाने असावा.
- शब्दमर्यादा १५०० ते २००० असावी.
- कथा भाषांतरित, रूपांतरित वा अनुवादित नसावी.
- कथा स्वरचित व स्वतंत्र असावी. विषयाचे बंधन नाही.
- कथास्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना गंधाली दिवाळी वार्षिक २०२२ चा अंक पाठविला जाईल.

**पुरस्काराचे स्वरूप**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | : | पारितोषिक रु. दोन हजार + मानपत्र + मानचिन्ह |
| द्वितीय क्रमांक | : | पारितोषिक रु. दीड हजार + मानपत्र + मानचिन्ह |
| तृतीय क्रमांक | : | पारितोषिक रु. एक हजार + मानपत्र + मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ | : | दोन कथांना प्रसिद्धी मानपत्रासह + मानधन |

पारितोषिकप्राप्त कथांना गंधाली दिवाळी वार्षिक २०२२ अंकात प्रसिद्धी मिळेल. पारितोषिक समारंभपूर्वक प्रदान करण्यात येईल.

आपला,
**डॉ. मधुकर केशव वर्तक**
संपादक

# श्रद्धांजली

बाबासाहेब पुरंदरे, सिंधुताई सकपाळ, कीर्ती शिलेदार,
ज्येष्ठ लेखक अनिल अवचट, सुरेंद्र रघुनाथ आपटे (निधन : २९-१-२०२२),
रमेश देव (कलाकार), लता मंगेशकर (गायिका),
प्रवीणकुमार (कलाकार, भीम-महाभारत मालिका),
संतोष कोचरेकर (ज्येष्ठ नाट्यनिर्माते), राहुल बजाज (उद्योगपती)
बप्पी लाहिरी (गायक, संगीतकार), शेन वॉर्न (क्रिकेटपटू, ऑस्ट्रेलिया)
प्रवीण काटवी (विश्वस्त), अरुण जाखडे (पद्मगंधा प्रकाशन)

# तिसऱ्या पिढीचे आत्मकथन

## २

संपादन

उज्ज्वला मेहेंदळे






मराठी भाषेविषयी आस्था असणा-या प्रत्येक मराठीप्रेमी वाचकाने वाचायलाच हवा असा ग्रंथ.
मुंबई मराठी साहित्य संघाचे अष्टदशकपर्वातील प्रकाशन.

## इये मराठीचिये नगरी.

संपादनः अशोक बेंडखळे,डॉ.उज्ज्वला मेहेंदळे
प्रस्तावना:मधू मंगेश कर्णिक

संत ज्ञानेश्र्वर,संत नामदेव,संत एकनाथ,मुस्लिम संत,
स्वा.सावरकर,ब्रिटिश राजवट,कुसुमाग्रज,बहिणाबाई
आणि शिलालेख यांचे मराठी भाषेला योगदान.

सहभागी लेखकः व्याख्याते डॉ.सुधाकर देशपांडे,
डॉ.अरुण टिकेकर,डॉ. यु.म. पठाण, डॉ. कुमुद गोसावी,
प्रा. म.रा.जोशी,विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर,
ज्यो.जयंतराव साळगावकर,डॉ.निशिकांत मिरजकर,
डॉ.द.ता.भोसले

प्रकाशक: मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ.भालेराव मार्ग,गिरगाव,मुंबई ४. फोनः२३८७६१५८
वितरक : ग्रंथाली, वुलन मिल म्यु.स्कूल,जे.के.सावंत मार्ग,माटुंगा(प.),मुंबई१६